वर्ष - २०१४

संपादक : डॉ. विलास ज. पवार

# सुरक्षा अभियान

(Reg. No. MAH/MAR/23893/TC)



WITH BEST COMPLIMENTS FROM

VPT ENTERPRISES

---

WITH BEST COMPLIMENTS FROM

Kiran Construction

---

WITH BEST COMPLIMENTS FROM

Subhash Enterprises

# सुरक्षा अभियान

(REG. NO. MAH/MAR/23893/TC)

## २०१४

**-: संपादक :-**

**डॉ. विलास ज. पवार**

**प्रकाशक : ओम पब्लिकेशन**

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२

**स्वागत मूल्य - ६०/-**

**'सुरक्षा अभियान' एक चळवळ आहे. सुरक्षा या विषयात ज्यांना रस आहे, ज्यांना या क्षेत्रात काम करायचे आहे त्यांनी अवश्य संपर्क साधावा.**

ओम पब्लिकेशने 'सुरक्षा अभियान' हा वार्षिक विशेषांक संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, ठाणे. फोन. - २५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| १ | रस्ते सुरक्षा | - सुरेश गोविंद देहेरकर | ५ |
| २ | फुटपाथ, फेरीवाले व रहदारी | - चारुलता कुळकर्णी | ९ |
| ३ | रस्ते आणि अपघात | - मयूर प्रकाश ढोलम | ११ |
| ४ | चालका सुरक्षितता तुझ्याच हाती | - गजानन शंकर देव | १४ |
| ५ | नशापान करुन ड्रायव्हिंग! | - ॲड. महेश आनंद वाघोलीवर | १७ |
| ६ | वाहतुकीचे तीन तेरा | - अरुण भालेराव | २० |
| ७ | वर्षा ऋतूतलं ड्रायव्हिंग | - ॲड. महेश आनंद वाघोलीवर | २१ |
| ८ | नाते तुमचे आणि वाहन चालकाचे | - ॲड. महेश आनंद वाघोलीवर | २२ |
| ९ | सुरक्षा अभियान रस्ते सुरक्षा | - पुष्पा कृ. करोड | २४ |
| १० | रस्ते अपघात टाळण्यासाठी | - राजश्री रामचंद्र खरे | २६ |
| | **रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात आणि रस्ते अपघात व माझी भूमिका या विषयावरील स्पर्धेतील पारितोषक पात्र व काही निवडक लेख** | - मंगेश त्रिं. त्रिंफळे (प्रथम) | २९ |
| | | - अंजली बापट (व्दितिय) | ३३ |
| | | - रमेश विठ्ठल मोरे (तृतिय) | ३७ |
| | | - घनश्याम बाळू शेंडगे (उत्तेजनार्थ) | ४० |
| | | - लीना वालावलकर (उत्तेजनार्थ) | ४४ |
| | | - किशोर ना. श्रीवर्धनकर | ४७ |
| | | - सुहास सावंत | ४९ |
| | | - जनार्दन जोशी | ५२ |
| | | - निकीता सुधाकर तुंगारे | ५६ |
| | | - विद्या अशोक परब | ५९ |
| | | - अशोक पाडूरंग धुमाळ | ६४ |
| | **कविता** | - | **६९** |

संपादकीय...

# ‘रस्ता सुरक्षा’

## व्यक्तिगत चळवळ व्हायला हवी...

आपण सर्वजण प्रत्येक प्रश्न एकतर बिकट बनवतो किंवा नाजुक बनवतो. एखादी गोष्ट करायची ही मनाला समजावतो तरीसुध्दा ती प्रत्यक्षात करताना थोडेफार का होईना बिचकतोच.

आपल्या सर्वांना रस्ता सुरक्षा विषयाबाबत मनापासून काहीतरी करावेसे वाटते परंतु श्रध्दा काहीवेळा कमी पडते. त्यामुळे ज्या कोणाला **‘रस्ता सुरक्षा’** हा विषय श्रध्देने अंमलात आणायचा त्यांनी मात्र रस्ता सुरक्षा विषय गांभीर्याने घ्यायला हवा आहे. त्यांनी **‘रस्ता सुरक्षा’** विषय तपशिलात जाऊन अभ्यास करायला हवा.

दैनंदिन गरजा भागवताना आपण अनेकवेळा अनेक गोष्टी विसरून जातो त्यांपैकी रस्ता सुरक्षेचे नियम हे महत्वाचे असून सुध्दा आपण पाळत नाही किंवा त्यांकडे दूर्लक्ष करतो आणि याचा परिणाम आपल्याला वाईट आणि वाईटच भोगावा लागतो. कारण ज्यावेळी कोणती घटना घडते तेव्हा मात्र घडणारी घटना ‘व्यक्ती’ कोण आहे पाहून घडत नसते. ती व्यक्ती जर आपल्या जवळची असल्यावरच आपण विचार करणार का? अस नको कारण ज्यावेळी दुर्घटना घडते त्यावेळी त्या घटनेचा फटका ज्यांना बसला आहे ते दुर्दैवी लोक त्यांची कारणमिमांसा करण्याच्या स्थितीत नसतात. म्हणूनच जेव्हा विचार करण्याच्या स्थितीत आहोत त्याचवेळी आपण रस्ता सुरक्षेचा विचार करायला हवा. प्रत्येकानेच रस्ता सुरक्षेचा विचार करायला हवा आहे कारण प्रत्येकजण आणि प्रत्येकाचा कोणीतरी रस्ता सुरक्षा या विषयाच्या परिघात येतो. लहान मुलांपासून वृध्दापर्यंत आज रस्ता सुरक्षेशी सर्वांची बांधिलली असायलाच हवी आहे अशी स्थिती निर्माण झाली आहे कारण आज ‘रस्ता’, ‘वाहन’, ‘वाहतूक’ या सर्वांचे आपल्या आयुष्यात अविभाज्य स्थान निर्माण झाले आहे.

रस्ता सुरक्षेसाठीही चळवळ निर्माण करणे आज ही व्यक्तिगत गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे मी, तुम्ही आणि आपण सर्वांनी मिळून रस्ता सुरक्षा हा विषय व्यक्तिगत ते वैश्विक स्थरावर नेण्याची शपथ घेऊया. सुरक्षित राहू या, रस्ता सुरक्षेचे नियम पाळूया.

## 'All For Safety, Sefety for All’

***With Best Compliments From :***

# Jai Bharat Constructions

**APPROVED GOVT. CONTRACTORS**

ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY

SPECIALIST IN : ASPHALT ROAD

**Add. :-** B - 19/20, 1st Floor, Woodland Complex,
Furniture Bazar, Ulhasnagar - 421 003. Dist. Thane
**Ph.:** (O) 0251 - 2562225, **Telefax :** 2563335
**E-mail :** jaibharatconstructions@yahoo.co.in

***With Best Compliments From :***

# Devs Enterprises



# रस्ते सुरक्षा

**सुरेश गोविंद देहेरकर**

या लेखाचे नाव जरी 'रस्ते सुरक्षा' असे आहे तरी प्रत्यक्षात मात्र आपल्या भारतात जवळपास सगळीकडे 'रस्ते दुर्दशा' च पहावयास मिळते. 'रस्ते सुरक्षा' दोन प्रकारात मोडते. पहिला प्रकार म्हणजे आदर्श बांधकाम असलेले नीटनेटके व लांब - रूंद बांधलेले आखीव रेखीव सुंदर तसेच स्वच्छ सुरक्षित, खड्डेमुक्त व कुठल्याही प्रकारची घाण नसलेले, उतार - चढाव जास्त नसलेले सपाट व दोन्ही बाजूला झाडे लावलेले चालण्या- फिरण्याचा आनंद देणारे सुरक्षित रस्ते तर प्रवाशांच्या जीविताची व मालमत्तेचे रक्षण करण्याकरता व चोर लुटारू यांच्याकडून त्यांना त्रास होऊ नये, ते लुटले जाऊ नयेत म्हणून रस्त्यावरून जाणाऱ्या - येणाऱ्या वाहनांना देण्यात येणारी सुरक्षा. अतिरेकी वा दहशतवादी यांच्याकडून राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गवरील मोठेमोठे पुल, बोगदे घातपाती कारवाया करून उडून दिले जाऊ नेयत म्हणून घेण्यात येणारी काळजी व सुरक्षा ही दुसऱ्या प्रकारची सुरक्षा होय.



रस्ते सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. मग ते राष्ट्रीय महामार्ग असोत किंवा राज्य महामार्ग असोत. रस्त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न खंरच ऐरणीवर आला आहे. या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे अनेक मार्ग आहेत. परंतु जे शासक आहेत त्यांच्याकडे प्रबळ इच्छाशक्तीचा अभाव आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते. वास्तविक सुंदर, स्वच्छ टिकाऊ रस्ते व रस्त्यांची सुरक्षा ही बांधकाम खात्याशी निगडीत आहे. परंतु शासनयंत्रणा सुस्त अजगरासारखी असल्याने अजिबात हालचाल करताना दिसत नाही; परिणामी रस्ते सुरक्षा धोक्यात आली आहे. रस्त्यांच्या सुरक्षिततेसंबंधात निर्णय घ्यायला व तातडीने उपाय योजना करायला अजिबात वेळ लागता कामा नये हे त्यांना जेवढे लवकर कळेल तेवढे बरे!

मोठमोठ्या शहरातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्य सरकारचे रस्ते यांना सुरक्षित ठेवण्याकरता नाक्या नाक्यावर असलेले सिग्नल्स, पोलीस चौक्या, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आवश्यक आहेतच पण केवळ या गोष्टींनी व ट्रॅफिक पोलिसांनी रस्ता सुरक्षा राबवली जाईल अशा भ्रमात न राहता जनतेनेही दक्षता, व जागरूकता दाखवून सरकारी यंत्रणेला मदत करायला हवी, नाहीतर अतिरेकी रस्त्यावरून चालत आहे व बॉम्बस्फोट करून आरामात निघून गेले, असे होईल. संशयित व्यक्ती व बेवारस वस्तु रस्त्यात दिसल्यावर सरकारी यंत्रणेला ताबडतोब कळविले पाहिजे. एवढे केले तरी घातपाती कारवायांपासून रस्त्यांची सुरक्षितता जपता येईल. रहदारीचे नियम पाळणे, फुटपाथचा उपयोग करणे, सिग्नल तोडून पुढे न जाणे, गाडी भरधाव न चालवणे, ओव्हरटेक न करणे

या व इतर गोष्टींनी आपण रस्त्यांची सुरक्षा राखू शकतो.

सुरक्षित रस्ते म्हणजे आखीव रेखीव, लांब रूंद, ऐसपैस रस्ते. असे रस्ते बांधण्याचा व जे आहेत ते नीटनेटके व व्यवस्थित ठेवण्याचा तसेच वेळच्यावेळी त्यांची देखभाल करण्याचा भार सरकारी यंत्रणांनी उचलायला हवा. रस्ते डांबरी असोत वा काँक्रीटचे असोत, ते ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तक्त्याप्रमाणे बांधले गेले असतील तर त्यांचे आयुष्यमान नक्कीच जास्त असते. पण जर का निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरून, रस्ते तज्ज्ञांचे म्हणणे न ऐकून, बांधकाम साहित्यात भेसळ करून बांधले तर पहिल्या पावसातच ते वाहून जातात व रस्त्यांवर खड्डेच खड्डे दिसू लागतात. अशा खड्डयात मग गाड्या अडवून, आपटून, पडून उलटून अपघात होतात. असे झाले तर जिवितहानी होऊ शकते. गंभीर जखमाही होऊ शकतात. सुरक्षित रस्ते हवे असतील तर गैरप्रकार करणाऱ्यांना शिक्षा व्हायला पाहिजे. जुन्या जमान्यातील लोक आजही म्हणतात की ब्रिटीशकालीन रस्ते चांगले होते पण आजचे रस्ते मात्र पाहवत नाहीत एवढे वाईट आहेत. उन्हाळ्यात बांधलेला रस्ता पावसाळ्यात पाहिल्यावर, 'हा माझा मार्ग चुकला' असे वाटायला लागते.



असुरक्षित व निकृष्ट दर्जाचे रस्ते बांधले जाण्याचे मुख्य कारण भ्रष्ट सरकारी अधिकारी, सरकारी व निमसरकारी (खाजगी) कंत्राटदार यांचे एकमेकांशी असलेले साटेलोटे व संगनमत. रस्त्यांच्या प्रश्नावर लोक जरी रस्त्यावर आले तरी पण आम्ही काही सुरक्षित व चांगले रस्ते बांधणार नाही असे त्यांनी मनाशी पक्के ठरवून टाकलेले असते.

स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली तरी देखिल आपण पावसाळ्यात टिकून राहणारे, नीट-नेटके, सुंदर व स्वच्छ, लांब-रूंद व ऐसपैस, मजबूत व टिकाऊ रस्ते बांधू शकत नाही याला काय म्हणावे? वास्तविक काँक्रीटचे असू देत नाहीतर डांबरी असू देत, रस्ते बांधताना किती वाळू (रेती) किती सिमेंट, किती खडी या सर्वांचे योग्य प्रमाण ठरलेले असते. पण भेसळयुक्त सिमेंट व निकृष्ट दर्जाचे इतर बांधकाम साहित्य वापरले गेले असेल तर तो रस्ता कसा असेल हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरज नाही. रस्त्याची लांबी रूंदी व जाडी तसेच किती खडी व डांबर हे सर्व पाहिले जाते. पण भ्रष्ट सरकारी अधिकारी व सरकारी व खाजगी कंत्राटदार यांची अभद्र युती, संगनमताने साऱ्या गोष्टी करत असल्याने त्यांनी तयार केलेले रस्ते पहिल्या पावसातच वाहून जातात. रस्त्यावर असंख्य खड्डे पडतात. मग अशा खड्डयात गाड्या अडवून व उलटून अपघात होतात. प्रवासी जखमी होतात व काही प्रसंगी जिवितहानी ही होते. वास्तविक असे रस्ते बनवणाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला पाहिजे. तसेच कंत्राटदाराचे लायसन्स रद्द व्हायला पाहिजे. पण असे काहीही होत नाही व त्या कंत्राटदाराला पुन्हा रस्त्याचे कंत्राट दिले जाते. कधी त्याच्या मित्राला, कधी नातेवाईकाला, ना कुणाला शिक्षा ना कुणाला सजा.

महामार्गांवरचे मोठे पुल नेहमीच अतिरेक्यांचे टार्गेट राहिले आहे.नक्षलवादी असोत नाहीतर अतिरेकी वा दहशतवादी असोत. ते लोक आपल्या उद्दिष्टा करता बॉम्बस्फोटाने पुल उडवून द्यायला मागेपुढे पहात नाहीत. प्रवासी गाड्या असोत नाहीतर खाजगी गाड्या

असोत.

बॉम्बस्फोट करून त्या उडवितात त्यांना काहीच वावगे वाटत नाही आणि म्हणून पुलांचे संरक्षण करणे, रस्त्यांची सुरक्षा ठेवणे या करता महामार्गावर गस्तीपथक ठेवणे अनिवार्य झाले आहे. अतिरेकी व नक्षलवादी यांच्याकडून होणारे घातपात जसे आहेत तसे पुलाचे निकृष्ट काम केल्यामुळे होणारे अपघातही आहेत. रोजच्या वर्तमान पत्रात एकतरी बातमी अमका तमका पुल कोसळून एस. टी. दरीत कोसळली व मोठ्या प्रमाणात जिवितहानी झाली अशा स्वरूपाची असते. लोकांनाही आश्र्चर्य वाटते की, एक वर्षापूर्वी बांधलेला पुल असा कसा कोसळला ? मेलेल्या प्रवाशांचे नातेवाईक सरकारला शिव्या घालतात. रडतात, चिडतात, आयुष्यभर दु:ख करत बसतात. पण याला जबाबदार असलेले अधिकारी इंजिनीयर, कंत्राटदार मजेत फिरतात. ना कुणाला खंत ना कुणाला खेद. मरणारे मरतात हे लोक पैसे कमावतात. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचाच हा प्रकार.



रस्ते आणि पुल, बोगदे यांची सुरक्षा जशी महत्वाची, तिच गोष्ट रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रवासी गाड्यांची राष्ट्रीय महामार्ग व राज्यातल्या महामार्ग व इतर रस्त्यावरून प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या गाड्या रात्रीच्या वेळी लुटण्याचे बरेच प्रकार घडलेले आहेत व घडतात आणि म्हणून रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास भयमुक्त, सुरक्षित, निर्धोक व आरामदायक होण्यासाठी रस्ते सुरक्षा महत्वाची आहे. त्याकरता पोलिसांच्या गस्ती गाड्या तसेच बिनतारी संदेश यंत्रणा कार्यरत ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. अपघात स्थळी तातडीने वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पोलीस यंत्रणा व सरकारच्या बांधकाम खात्याची आहे. त्याकरता संबंधितांमध्ये समन्वय आवश्यक आहे व तो त्यांनी ठेवला पाहिजे. पोलीसांची संपर्क यंत्रणा सतत कार्यरत राहिली तर आपतकालीन यंत्रणोला अर्थ आहे नाहीतर 'येरे माझ्या मागल्या' असा प्रकार व्हायचा. ट्रॅव्हल कंपनीने देखिल लांबच्या प्रवासाकरता व प्रवाशांच्या सुरक्षितते करता एकतरी सिक्युरिटी गार्ड आपल्याबरोबर घ्यायलाच हवा. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता जपली जाईल व रस्त्यांवर होणारे लुटमारीचे प्रकार थांबतील. प्रवासी गाड्यांत प्रवासी बनून अतिरेकी घुसण्याची उदाहरणे काही कमी नाहीत. हे सर्व टाळण्याकरता सुरक्षा महत्वाची.

सरकारने देखिल रस्ते सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नाहीतर फक्त टोल वसूल करून पैसे कमवणे एवढेच सरकारचे काम आहे असा गैरसमज दृढ होईल. सरकार जर रस्ते दुरूस्त करत नसेल, रस्ते सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत नसेल तर सरकारला टोल घ्यायचा काय अधिकार?

''आपला प्रवास सुखाचा होवो'', असा बोर्ड लिहून प्रवास सुखाचा होत नसतो. रडत खडत चालणारी, गचके खात चालणारी व सर्व हाडे खिळखिळी करणारी वाहने असल्यावर आपला प्रवास सुखाचा नव्हे तर दु:खाचाच होईल याची खात्री बाळगा. सरकारी, एस.टी. चे ब्रीद वाक्य ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' असे आहे. प्रत्यक्षात एस.टी. बसेस ज्या रस्त्यावरून धावतात त्या रस्त्यांवरचा प्रवास म्हणजे ''बहुजन दु:खाय, बहुजन पिडाय'' असा असतो.

नुसते रस्ते सुरक्षा अभियान सुरू करून रस्ते सुरक्षित राहू शकत नाही तर त्याकरता लांब-रूंद व

मोठे रस्ते, खड्डेविरहीत रस्ते, पाण्याचा निचरा होणारे रस्ते, मुसळधार पावसातही टिकून राहणारे रस्ते बांधले गेले पाहिजेत. रस्ते सुरक्षित राहण्याकरीता वेळोवेळी उपाय योजले पाहिजेत. त्याची अंमलबजावणी होते की नाही याची खात्री करून घेतली पाहिजे. कुचराई करणाऱ्याला शासन व दंडही झाला पाहिजे. तसेच रस्त्यांच्या सुरक्षिततेला व दुरूस्तीला अग्रक्रम दिला गेला पाहिजे तरच हे शक्य आहे. रस्त्यांच्या बांधकामात जे मटेरीयल वापरले जाते त्यात जर कुणी भ्रष्टाचार केला, निकृष्ट प्रतीचे बांधकाम साहित्य वापरले किंवा भेसळयुक्त सिमेंट वापरले तर अशा लोकांना तुरूंगवासाची कठोर शिक्षा व्हायला पाहिजे. नाहीतर रस्ते सुरक्षेच्या प्रश्नावर लोक रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाहीत. धोकादायक वळणे कमी करणे, रस्त्यांचे रूंदीकरण करणे, वेळच्यावेळी खड्डे बुजविणे, वन वे ट्रॅफिक पध्दतीचा सर्वत्र अवलंब करणे, वाहनचालकाला वाहतुकीचे नियम न पाळल्यास शासन व दंड करणे, वेगमर्यादेवर



नियंत्रण आणणे, ओव्हरटेक न करणे, अशा उपायांनी रस्ते सुरक्षा नक्कीच करता येईल. ज्या रस्त्यांवरून गाड्या व वाहने धावतात ते चांगलो ठणठणीत असायलाच हवेत. धोकादायक व अपघाती वळणे यावर उपाय आहे परंतु जाणून बुजून निकृष्ट रस्ते बनवणाऱ्या लोकांकरता तुरूंगवास हा एकच उपाय आहे. जर का जालीम उपाय अमलात आणला तर रस्त्यांची सुरक्षितता अबाधित राहील व प्रवासही खऱ्या अर्थाने सुखाचा होईल एवढे मात्र नक्की.

## रस्त्यातून कुत्रा आडवा का गेला?

एकदा काही कामा निमित्त मी व सुरेश सरदारजींच्या लॉरीतून (मालवाहू ट्रक) प्रवास करत होतो. आम्ही गाडीच्या केबिनमध्ये सरदारजी सोबतच बसलो होतो. काही अंतरावर गाडी आली असताना अचानक एक भला मोठा कुत्रा रस्त्यावरून गाडीला आडवा येत असलेला आम्हा सर्वांना दिसला.



कुत्रा गाडीला आडवा जातो हे पाहिल्यावर सरदारजीचे पित्त खवळले व तो गाडीतूनच कुत्र्याला त्यांच्या भाषेत शिवी द्यायला लागला व वरूनच लाथमारू लागला.

त्यावेळी त्या सरदारजीने ब्रेकवरचा त्याचा पाय उचलला होता. ते पाहून आमच्या पोटात मात्र गोळा आला. आम्हाला कळेना की सरदारजीच्या शिव्या कुत्र्याला कशा कळणार व त्यांनी वरून मारलेली लाथ तरी कशी लागणार. उलट ब्रेकवरील पाय उचलल्याने अपघात होण्याचा धोका होता.

सरदारजीच्या मूर्खपणाला हसावे की रडावे हेच आम्हाला कळेनासे झाले. मी मात्र सरेशच्या कानात पुटपुटलो ''सुरेश, सरदारजी बिनडोक असतात हे काही खोटे नाही.''

**संकलन :** - सुरेश गोविंद देहेरकर

# फुटपाथ, फेरीवाले व रहदारी

**चारुलता कुळकर्णी**

मुंबईसारख्या शहरांत कडेकडेने चालता यावे आणि भरधाव अतिवेगाने धावणाऱ्या वाहनांपासून आपल्या जिवाचे रक्षण करता यावे म्हणून रस्त्याच्या कडेला राखलेली छोटीसी अरुंद अशी पायवाट 'फूटपाथ' या गोंडस नांवाने ओळखली जाते. आजकाल फूटपाथ शोधून काढता काढता सामान्य माणसाची त्रेधा तिरपीट होते. लहान मुलं जेष्ठ नागरीक, बायका (अपंग, गरोदर) ह्यांचा विचार तर बाजूलाच! मुंबईतले



'फुटपाथ' शोधून काढणे हा मोठा गहन विषय आहे. 'फुटपाथ' हा आता मोठा संशोधनाचा विषय झाला आहे. फुटपाथवरुन लोकांनी चालायचेच असते रस्त्यांतून वाहनांनी धावायचे असते. लोकांनी रस्त्यातून चालू नये. फुटपाथ वरुन चालावे ही खरी वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती लोकं स्वतः चालणारेच विसरलेत की, त्यांना विसरायला लावलं? ह्या प्रश्नाचा मात्र मला उलगडा होत नाही! उलट लोकांना फुटपाथवरुन चालू नये असेच वाटते. त्यापेक्षा भररस्त्यांतून वाहनांना चुकवित झिरीमिरी चालणं सोपं वाटतं. मला वाटतं फुटपाथवरुन चालणं हा गुन्हा आहे. कारण फेरीवाले आपापला माल प्रदर्शनात पसरतात तसा फुटपाथवर पसरुन आरामांत 'लुट लो, लुट लो एकमे दो, लोटे लोटे फोकटमे - फोकटमे' करीत ओरडत असतात. अशा परिस्थितीत आपण काही खुशाल त्यांच्या मालावरुन चालायचे? बरं चाललोत तर आपले अवयव एक एक मोकळा करून घरी यावे तर ह्या फेरीवाल्यांनी बसायचे कुठे?

'कुठं दिसेना, शोधू कुठं?'

दिसला गं बाई दिसला, मला फुटपाथ दिसला असं म्हणत आपली करमणूक करुन घ्यायची की, त्रागा करुन फुटपाथ शोधत बसायचं? एवढा वेळ आज मुंबईकरांकडे उपलब्ध नाही त्यापेक्षा भररस्त्यांतून वाहनांना चुकवीत चालणे सोपे वाटते.

आतापर्यंत रस्त्यांवरुन भरधांव धांवणारी वाहनं मध्येच ओव्हरटेक करणाऱ्या रिक्षा, टू व्हिलर, वाहनांना चुकवित चुकवित मार्ग काढणारा मुंबईकर! हा वाहनांचा व लोकांचा हुतुतुचा खेळ हेच मुंबईतील रस्त्यांचे सौंदर्य वाटायचे पण फुटपाथलाही सौंदर्य असतं त्यामुळे रस्त्याचं सौंदर्य अधिक वाढते, फुटपाथ म्हणजे मुंबईकरांचं प्रेक्षणीय स्थळ आहे हे आतांच आम्हाला कळायला लागलं.

प्रत्येक फेरीवाल्याच्या मनांत असतं, या मुंबापुरीच्या रस्त्यांचं सौंदर्य वाढेल कसं? म्हणून ते प्रयत्न करीत असतात. विविध रंगाचे कपडे, आपल्या संस्कृतीपेक्षा बाहेर गांवची, परदेशी संस्कृति जपण्यासाठी विविध तऱ्हेचे कपडे पसरुन मुंबईचे सौंदर्य वाढवतात, संसाराला लागणारी विविध भांडी अगदी चकाचक पसरुन सौंदर्यात भांडीवाले भर टाकतात. त्यांच्याच शेजारी फर्निचर विकणारा टेबल, खुर्ची, टी-पॉय, शूज रॅक इ. वस्तु पसरवून खुर्चीवर आरामांत बसून बोंबलत

असतो. पालकांना काटकसर करता यावी म्हणून शाळेच्या वह्या, पेन्सिली, रंगपेट्या इत्यादी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या वस्तु पसरून पालकांची कीव करणारे फेरीवालेसुध्दा असतात. मध्ये मध्ये कपबशी, ग्लासेस अशा विविध कांचेच्या वस्तु मध्येच डोकं वर काढतात व रस्त्याच्या सौंदर्यात भर घालतात. खरेदी करुन करुन दमलेल्या मुंबईकरांची पोटाची व्यवस्था करणारा वडा-पाव, भेळ-पूरी, भजी विक्रेते तयार असतातच! एक सुंदरशी आर्ट गॅलरी असावी. त्याप्रमाणे सर्व वस्तु कलात्मक पध्दतीने मांडून ठेवलेल्या असतात. दिवसेंदिवस त्या सौंदर्यात भर पडतच आहे. फेरीवाले विविध माल घेऊन सौंदर्य वाढविण्यात हातभार लावतच आहेत. ह्या फेरीवाल्यांना जर फुटपाथ कमी पडले तर मला वाटते ते रस्त्यांत सुध्दा आपला माल पसरुन सौंदर्यात भर घालतील.



अलीकडे तर नो फेरीवाला झोन म्हणून कूठलाही परिसर जाहीर केला असला तरी फेरीवाले त्या परिसरावर अतिक्रमण करतातच. एवढेच कशाला तर काही ठिकाणी फुटपाथवर पदपथाचा वापर करा. असाही फलक लावलेला असतो पण प्रत्यक्षांत आईस्क्रीम, बुर्जीपाव, पावभाजी चायनीजच्या गाड्या उभ्या असतात. उदाहरण द्यायचेच तर ठाणे स्टेशन जवळील सॅटीस पुलाजवळील परिसर! रस्त्यांतून वाहनांना चुकवीत धांवावे म्हटले तरी, रस्त्यांत गर्दी असतेच असते. पुढारी वाढले त्यामुळे सत्कार समारंभही वाढलेत. मंत्री ह्या रस्त्याने जाणार म्हटले की, गर्दी जमली कारण कोणतीही गोष्ट असली तरी गर्दी करणे हे आपल्या मुंबईकरांचे खास वैशिष्ट्य! गर्दी करणारे, गर्दीत राहणारे, गर्दी करायला काहीही चालतं. मुंबईकर नेहमीच धांवत असतो. त्याला अजिबात वेळ नसतो त्याच्या बरोबर धांवून धांवून घड्याळंसुध्दा बंद पडतात. उदा. रेल्वे स्टेशनवरील घड्याळ! मुंबईकर केवळ गर्दीसाठी गर्दी करतात. का? गर्दी जमली हे कुणालाच ठाऊक नसते, पण जो येतो तो गर्दीतून पूढे जाऊन प्रत्येकाला काय झाले म्हणून विचारीत असतो सगळ्यांकडून माहित नाही हेच उत्तर मिळतं पण प्रत्येक जण गर्दीत घुसून डोकावतो! थोडक्यात काय गर्दीसाठी गर्दी होत राहाते. रोज काहीतरी होतच असतं व रहदारीच्या रस्त्यावर तुफान गर्दी उसळून रहदारी बंद पडण्याची वेळ येते. थोडक्यात काय तर आई जेऊ घालीना, बाप भीक मागू देईना. फुटपाथवर फेरीवाले, रस्त्यांवर भरधाव धांवणारी वाहनं, गर्दी त्यामुळे आमच्यासारखे जेष्ठ नागरीक काही वाहनांबरोबर हूतुतु खेळू शकत नाही.

## आवडता रोड

**सुनील** :- काय रे अनिल तुला गांधी रोड आवडतो का नेहरू रोड ?

**अनिल** :- मला गांधी रोड जास्त आवडतो

**सुनील** :- का रे, काही विशेष कारण ?

**अनिल** :- कारण आहे ना. त्या रोडवर माझी प्रेयसी राहते.

संकलन - सुरेश गोविंद देहेरकर

## कारण !

**शिक्षक** :-राजू, सांग पाहू रेल्वे येत असलेली पाहून फाटक का बंद करतात ?

**राजू** :-फाटक उघडे पाहून रेल्वे रस्त्यांवर येऊ नये म्हणून!

संकलन : - जयंत गोविंद पठाडे

# रस्ते आणि अपघात

मयूर प्रकाश ढोलम

फार पूर्वी दळणवळणासाठी लोकांना पायी प्रवास करावा लागत होता. नंतर त्याच पायवाटावर बैलगाडया, घोडागाड्या धावू लागल्या व ह्याच मातीच्या रस्त्यावर गाड्या आल्या व हे कच्चे रस्ते मग पक्के होऊ लागले. व एका शहरापासून दुसऱ्या शहराला जोडले गेले. खेड्यापासून गावाला जोडत शहरात आले. व रस्ता हे वाहतुकीचे एक मोठे जाळे बनले.

रस्त्याचे जाळे जसे सगळीकडे पसरले आहे. तसेच कच्या रस्त्याचे पक्के रस्ते व पक्क्याचे हायवे झाले. आणि मग एक्सप्रेस नी आता मेगा हायवे तयार झाला व लोकांना प्रवासासाठी एक जलद मार्ग निर्माण झाला. व त्याचबरोबर अशा रस्त्यांसाठी व लोकांच्या प्रवासासाठी, व्यापारासाठी वेगवेगळ्या गाड्याही तयार झाल्या. त्यांचा वेग वाढला. गरजेनुसार त्यांच्या मॉडेलमध्येही बदल झाले व सातत्याने होतो आहेत. जसे रस्ते वाढते. तशा गाड्याही वाढल्या व रस्त्यावर अपघातातही वाढ होऊ लागली.



जसजशी प्रगती होत गेली, तसतसे शासनांने लोकांच्या जलद अति जलद प्रवासासाठी सातत्याने रस्त्यामध्ये बदल केले. त्यांची लांबी - रूंदी वाढवली. पूल बांधले समुद्र सेतू बांधले. मेगा एक्सप्रेस हायवे तयार केले. आणि त्याचबरोबर गाड्याही वाढल्या सगळ्यात पहिले म्हणजे आपल्या इथे लाईनीची शिस्त कोणीच पाळत नाही. प्रत्येकाला वाटते माझ्याकडे गाडी मलाच लवकर जायची घाई व मग गाड्याचे वेग वाढतात व स्पर्धा लागल्यासारखे एकमेकांच्या पुढे जाताना गाड्या दिसतात. आणि ह्याच स्पर्धेतून मग अपघात होतात.

काही रस्त्यावर वेगाची मर्यादा आहे. पण ती मर्यादा पाळताना कोण दिसत नाही. सरकारनी जसे रस्त्यावर टोल वसूल करण्यासाठी टोल नाके बसवले आहेत तसेच प्रत्येक शंभर किलोमीटरमध्ये गाड्यांची वेग मर्यादा पहाण्यासाठी एक वाहतूक यंत्रणेची गाडी फिरत रहावी. त्यांनी शंभर किलोमीटरच्या रस्त्यात कोठेही उभे राहून गाड्यांची वेग मर्यादा तपासावी व जास्त वेगाने जाणाऱ्या गाड्यावर दंड बसवावा व त्यावर एकदा वेगमर्यादा तोडल्याचा स्टिकर त्यांच्या काचेवर चिकटवावा व असेच त्यांनी पुन्हा केले तर त्यांच्यावर दुसऱ्यांदा नियम तोडल्याने डबल दंड व आणखी एक स्टिकर चिकटवावा व हे स्टिकर असे असावे की जे काढण्याचा प्रयत्न केल्यास गाडीच्या काचेवर त्यांचा डाग तसाच राहील. व प्रत्येक एका चुकीनंतर दंड वाढत राहील. पण ह्यात भ्रष्ट्राचार नसावा. ह्यासाठी वाहतूक यंत्रणेची जी गाडी गस्त घालत असेल तिच्यावर सी.सी. कॅमेरा असावा व दिवसभराचा सगळा कारभार त्यात नोंद व्हावा नाही तर त्यात ही भ्रष्ट्राचार होईल!

आज मुंबईतून गावाकडे जाणाऱ्या गाड्या व गावातून मुंबईत येणाऱ्या गाड्या मुख्यत्वे ट्रॅव्हल आज इतक्या ट्रॅव्हल वाढल्या आहेत व त्यांचे अपघातही वाढत आहेत. ट्रॅव्हलवाले एकतर जुन्या खराब गाड्या वापरत असतात त्यात मर्यादेबाहेर बोझा ट्रॅव्हलवर लादतात. तो त्या प्रवाशाचाही नसतो. त्याचा पैसा वेगळा घेऊन तो फक्त त्यांना ट्रान्सपोर्ट करायचा असतो. पण आतील बसलेल्या प्रवाशाच्या जीवाशी ते वाहक खेळत असतात.

ट्रॅव्हलच्या सीट फुल झाल्या की, केबीनही हवे तसे भरतात. त्यांना प्रवाशांच्या जीवाशी काहीच घेणे देणे नसते. त्यांना फक्त पैसा कमवायचा असतो. मग त्यातूनच अपघात घडतात; कारण महाराष्ट्रात सगळ्यात जास्त वळणदार चढउतार असणारे व घाट रस्ते आहेत. त्यात एखाद्या चालकाचा गाडीवरचा ताबा सुटला की अपघात अटळ आहे व ह्यात कित्येक प्रवाशांना आपला प्राण गमवावा लागतो. ह्यासाठी टोल नाक्यावर जसे इतर ट्रान्सपोर्ट करणाऱ्या गाड्यांचे वजन केले जाते किंवा टोल नाक्यावरच गाडी शहरातून बाहेर जाण्याच्या आधीच तिचे वजन करावे. व त्या गाडीच्या वापरातील वर्षानुसार व कंडीशननुसार तिला वजनाचे बंधनच असावे. त्यापुढे जर वजन असेल तर तिला पुढचा प्रवास करायला देऊच नये. तरच अशा अपघातावर आळा बसेल. तसेच मेघा हायवे एक्सप्रेस हायवे वर रात्रीच्या प्रवासात ट्रॅव्हलवाले गाड्या नुसत्या पळवतात व मग अपघात घडतात. ह्यासाठी प्रत्येक ट्रॅव्हलला वेगाची मर्यादा असावी. अमुक एका मर्यादेनंतर त्या ट्रॅव्हलचा वेग लॉक करावा. तिच्या वेग मर्यादेत वाढ होता कामा नये. कारण कोणत्याही रस्त्यावरील अपघाताला ती कारणीभूत आहे. वेग व त्या वेगालाच बंधन असावे. कारण प्रवाशांच्या जीवाचा ही विचार केला जावा.



तसेच मालाची ने-आण करणाऱ्या गाड्या वाहतूक चौकीला टोल नाक्याला चिरीमिरी देऊन वाटेल तसे सामान त्यावर भरतात. कित्येक मालवाहतूक गाड्या तर मर्यादेबाहेर त्यांचे सामान बाहेर आलेले असते व गाड्या वळणावर नाहीतर अचानक ब्रेक मारल्याने मागच्या गाड्यांसाठी कायमच अपघाताला कारण ठरत असतात व त्या रस्त्यावर पलटल्या तर मोठ्या वाहतुक कोंडीलाही कारण ठरतात. ह्यासाठी मालवाहतूक करणारी प्रत्येक गाडी तिचे वजन मालाची मर्यादा गाडीची क्षमता पाहूनच टोल नाक्यावरून पुढे सोडावी अन्यथा तिला जाऊच देऊ नये.

मुंबई व पुणेसारख्या शहरात नशा करून गाडी चालवणाऱ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे त्यात पुरूषाबरोबर महिलाही तितक्याच अग्रेसर आहेत. काही लोक तर दारू पिऊन गाड्या चालवतात व मग त्यांच्या गाडीच्या वेगाला जोर चढतो व नाहक रस्त्यावर चालणाऱ्यांचा जीव घेतात व इतर वाहनाला ठोकतात. कधी तर ह्या अशा अपघातात त्यांचा स्वत:चाही जीव जातो. पण अशी नशा करून गाडी चालवणारी व्यक्ती जेव्हा पोलीस पकडतात तेव्हा त्यांची गाडी चालविण्याची मान्यताच सहा महिने बंद करावी. त्यांचा परवाना व गाडीचे पेपर जप्त करून ते त्यांना सहा महिन्यांनी द्यावे. कारण नशा करून गाडी चालविणे हा फार मोठा गुन्हा आहे. कारण त्यात अपघात झाल्यास नाहक कुणाचा तरी बळी जातो. पण असे अपघात ज्यांच्या हातून घडतात. त्याचा तर परवानाच रद्द करावा व तो त्यांना परत कधीच मिळू नये ह्याची दक्षता घ्यावी. त्यांना पुन्हा कधीच गाडी चालवता आली नाही पाहिजे. तसेच त्यांच्यावर मनुष्यवधाचाच गुन्हा लावून त्यांना शिक्षा झाली पाहिजे व अशा अपघातात एखाद्या कुटुंब प्रमुखाचा मृत्यू झाला असेल तर त्याच्याकडून त्या कुटुंबाला एक रक्कम ठरवावी व ती त्या कुटुंबाला द्यावी. कारण अपघातात मृत्यू पावलेला एकतर गरीब असतो, अपघात करणाऱ्या गुन्हेगारावर दारूची आणि वेगाची नशा चढली असते. त्यासाठी त्याला क्षमा करू नये तसेच मुंबईसारख्या शहरात हल्ली मोटारसायकल स्वाराचाही त्रास तेवढाच वाढला आहे. एक तर कितीही चक्का जाम असू दे, हे आपली मोटारसायकलमध्ये मध्ये घुसवून पुढे जाण्याचा मागे असतात व आणखी चक्का

जाम करतात. त्यात सगळ्यात जास्त अपघात मोटारसायकलचे व त्यांच्यामुळे इतरांचे होतात व अशा अपघातात मोटारसायकलस्वारांना प्रथम त्यांनी लाईनीची शिस्त लावावी व स्वतःच्या रक्षणासाठी हेल्मेटही कायम वापरावे सगळ्यात जास्त म्हणजे मोटारसायकलस्वारानी स्वतःच्या व दुसऱ्याच्या जीवाचा विचार करावा; कारण त्याच्या दुचाकीच्या मध्ये मध्ये घुसण्याने रस्त्याच्या बाजूने पाद्चारी चालतात. त्यांना धक्का देत देत चालण्याने पादचाऱ्यांना मात्र कायम त्रास सहन करावा लागतो व मग गाडीच्या ठिकाणी पादचारी व मोटार सायकल स्वारामध्ये कायम भांडण होताना दिसतात. तसेच धूम चित्रपटानंतर बहुतेक मोटार सायकलस्वारांना धूमसारखी दुचाकी चालवण्याचा मोह आवरेनासा झाला व त्यामुळे शहरातच नाही तर गावातही अपघात घडतात. त्यासाठी आधी धूम सारखी मोटार सायकल चालविणाऱ्यांची मोटारसायकल जप्त करावी.

तसे पाहिल्यास रस्त्यांसाठी जे नियम आहेत ते गाड्या व रस्त्यावर चालणाऱ्या दोघांनाही बरोबर पाळणे गरजेचे आहे. त्यामुळेच रस्त्यावरील अपघात रोखले जातील. घाई प्रत्येकाला असते. पण अशी घाई काय कामाची ज्यात स्वतःचा नाहीतर काही निष्पाप लोकांचा जीव जाईल! ह्यासाठी प्रत्येक वाहन चालकाने रांगेची शिस्त व वेगाला मर्यादा ठेवणे गरजेचे आहे. तरच अपघात टळतील. कधीकधी पादचाऱ्यांची ही चूक असते. तेही गाड्या न बघताच रस्ता ओलांडतात व मग गाडीवाल्यांना दोष लावला जातो ते चुकीचे आहे. जिथे सिग्नल यंत्रणा नसेल तेथे समजू शकतो. जेथे सिग्नल यंत्रणा कार्यरत आहे व झेब्रा क्रॉसिंग आहे तेथे शक्यतो त्याचाच वापर पादचाऱ्यांनी करावा. तसेच आता रस्ता ओलांडण्यासाठी पूलही बांधले आहेत त्यांचा वापर करावा ह्यामुळे रस्ता ओलांडताना होणारे अपघात टाळता येतील. सुरक्षितता ही सगळ्यांची जबाबदारी आहे. ती त्या लोकांनी पाळली पाहिजेच.

**वेगाला आवरा, जिवाला सावरा ।**

**रांगेची शिस्त, प्रवास अस्त ।।**


*With Best Compliments From :*

# Global Gallerie Agencies Pvt. Ltd.

# चालका, सुरक्षितता तुझ्याच हाती !

गजानन शंकर देव

जिथे देऊळ आहे तिथे देव असेलच असे नाही पण जिथे स्वयंचलित वाहन आहे तेथे अपघात, असुरक्षितता असते असे म्हटले तर काही चुकीचे विधान होणार नाही. स्वयंचलित वाहन शेवटी यंत्र आणि एका ठराविक क्षमतेनंतर त्याच्यावर नियंत्रण ठेवणे हे निर्मात्यालाही अशक्य होते. तो फक्त परिणामांचा साक्षीदारच होऊ शकतो.

काही दिवसासपूर्वी दैनिक 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये रस्त्यावर होणारे अपघात आणि त्याचे वाढते प्रमाण त्यापासून होणारी जिवित हानी, आर्थिक हानी याची आकडेवारी दिली आहे. त्यावरून, गेल्यावर्षी म्हणजे २०१२ साली सुमारे दिड लाख माणसे फक्त भारतात मृत्यू पावली. गंभीर जखमी, अपंग, अन्न निराधार यांची मोजदाद निराळीच. त्याच्यातीलच पुढचा भाग पाहिला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. भारत जगातील अधिक अपघातग्रस्त देश आहे. त्यात महाराष्ट्राचा क्रमांक वरचा आहे आणि त्यातूनही पुणे, ठाणे, व मुंबई नवी मुंबई यांनी प्रातिनिधीत्व सोडलेले नाही.



नववर्षाचा पहिला आठवडा महाराष्ट्र सरकार सुरक्षितता सप्ताह म्हणून पाळते. ते कसे मंडप बांधतात, पोलिस अधिकारी गावातल्या प्रतिष्ठितांना बोलवतात, सुरक्षिततेचे भाषणे ठोकतात चहापान खानपान होते, कार्यक्रम संपला सुरक्षितता पहिले पाढे पंच्चावन, पुढे या अपघातांचे वर्गीकरण दिले आहे. त्याहीपेक्षा या अपघातांना माणसाच्या चुका ८०% जबाबदार आहेत असे नमूद केले आहे. तसं पाहिलं तर पृथ्वीतलावर ज्या घटना घडतात त्याला मानवी कृतीच जबाबदार असते, हे अगदी उघड सत्य आहे. परिणाम चांगला असेल तर कर्त्याची वाहवा होते आणि परिणाम वाईट झाले तर त्याला भोगावे लागातात तर अपघाताच्या बाबतीत नेमके हेच झाले आहे. आपले अयोग्य वर्तन कारणीभूत झाले आहे.

ही स्वयंचलित वाहने चालविण्यासाठी काही नियम करण्यात आले आहे जेणेकरून अपघात होणार नाहीत आणि जिवित व आर्थिक हानी होणार नाही. नियम अगदी साधे सोपे आणि सहज आचरण्यासारखे आहेत. वाहन रस्त्याच्या डाव्या बाजूने चालवावे. शक्यतो वाहने एका मागे एक (lane) अशी चालवावीत. जर पुढे जायचे असेल तर पुढच्या वाहनाच्या उजव्या बाजूने मागील वाहनास सांकेतिक खूण करून जावे. वेगावर मर्यादा असावी. दोन वाहनांमध्ये अंतर ठराविक असावे. मद्यपान करून वाहन चालवू नये. रस्त्यावर दाखविलेल्या इतर मार्गदर्शक खुणांचा वापर करावा चौकातील दिव्याचे मार्गदर्शक यांचा पण तसाच वापर झाला पाहिजे. एक ठराविक वय पूर्ण झाल्याशिवाय दुचाकी, चारचाकी गाडी चालविण्यास कायद्याने बंदी

आहे. पण सगळे नियम धाब्यावर बसवून सर्रास गाड्या चालविल्या जातात. याचे एक उदाहरण रोज मी अनुभवतो, ठाण्यात उन्नति गार्डन नावाचे एक गृह संकूल आहे. त्याच्या आसपास आणखी गृहसंकुले आहेत व त्यांना पोखरण रोडला योगासाठी एकच मार्ग आहे. त्यामध्ये एक विस्तृत वाहतुक बेट (Traffic Island) आहे पण या भागातील गाडीवाले आणि बाईकवाले त्याचा योग्य वापर करीत नाहीत. त्यात तरूण आहेत, मध्यमवयीन, वयस्क आहेत, स्त्रिया आहेत पुरूष आहेत आणि यांचे बघून या भागांत येणारे चालकही त्यांचा कित्ता गिरवितात.

तेंव्हा सर्वामध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याची शिस्त आणि रस्ते वहातूक सर्वासाठी सुरक्षित अशी परिस्थिती निर्माण करणे गरजेचे तर आहेच पण अवघड पण आहे. आजच्या तरूण मंडळींना सांगायला गेलो तर ते सांगणाऱ्याचे बोलणे कानामागे टाकतील, काही दुरूत्तर करतील पण जर याचा चांगला कायमस्वरूपी परिणाम साधायचा असेल तर अगदी लहान वयापासून मुलांवर याचे सुसंस्कार घडवायला पाहिजे.



१)शाळेत रोज एक तास त्यांच्या मनांवर वाहतुकीच्या नियमांचे वाचन करणे व त्यांच्या मनांवर ते बिंबविणे.

२)शाळेत एक व्राहतुक बाग Traffic garden तयार करून रोज काही मुलांना छोटया सायकली देऊन त्या गार्डनमधून वाहतुक नियमांचे पालन करून सायकल चालविण्यास देणे व ते योग्य वागतात की नाही यावर लक्ष ठेवणे हळू हळू ही देखरेखीची कामे विद्यार्थ्यांकडे देणे.

३)आठवड्यातून एकदा घडलेल्या अपघाताची चित्रफीत त्यांना दाखवणे जेणेकरून अपघातातील जखमी माणसे, त्यांची परिस्थिती, त्यांचे दुःख याचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम होऊन ती मुले वाहतूक नियम काटेकोरपणे पाळण्याचे ठरवतील.

४)एखादी अपघातग्रस्त व्यक्ती मुलांसमोर आणून त्याचे अनुभव मुलांपुढे कथन करण्यास सांगावे.

५)पोलीस काही नियम मोडणारे गुन्हेगार पकडतात, काही अपघात करणारे पकडतात. त्यांनाही या मुलांसमोर आणून त्याच्या गुन्हयांची कबुली देण्यास सांगावे.

६)कोणी कथाकार बोलावून अपघातामुळे होणारे दुष्परिणाम याबद्दल काल्पनिक पण परिणामकारक कथा सांगण्यासाठी बोलवावे.

७)रूग्णालयात जाऊन काही अपघातग्रस्त त्यांना दाखवावे, जे बोलण्यासारखे असतील त्यांचे बरोबर अगदी थोडा संवाद साधावा.

८)जरा मोठी मुले असतील त्यांना रूग्णालयात जाऊन अपघात पिडीतांना मदत करण्यास त्यांचे जवळ तास - अर्धातास थांबण्यास सांगावे.

अशाप्रकारे शाळेतील अगदी प्राथमिक वर्गापासून ते १०वी, १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम असावा.

आज सगळीकडे मोठाली गृहसंकूले उभी रहात आहेत गाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. गृहसंकुलात विस्तीर्ण जागा असते मोटारींची ये जा चालू असते तसेच लहानमुले दोन चाकी तीन चाकी सायकली फिरवित असतात. प्रत्येक गृहसंकुलात वाहतुक सुरक्षिततेची आवड आणि निवड असलेला

एखादा माणूस तरी असणारच त्याने संकुलातील सोसायटीचे सचीव अध्यक्ष यांच्या मदतीने असे वहातुक बेट रस्त्याचे द्विभाजक रेषा ओढून करावे आणि मुलांना याची गरज सांगावी. इथे पण अपघातांच्या फिल्म्स दाखविणे अपघात ग्रस्तांना बोलावून अनुभव कथन करणे आदी गोष्टी होऊ शकतात. संकुलातला अपघातग्रस्त असेल तर त्याला मदत करण्यास जाणे हे ही करता येईल. रस्ता सुरक्षा क्लब निर्माण करून लोकांनीच लोकांमध्ये रस्त्यावरील सुरक्षेबद्दल विचार करून ते प्रचार फेरी, दूरदर्शनवर जाहिराती, चर्चासत्र व सभाद्वारे लोकांपर्यंत पोहोवचता येतील. आपल्याकडे धार्मिक उत्सव, जयंती उत्सव असे अनेक कार्यक्रम असतात तेथे मोठ्या प्रमाणात फलकाद्वारे विचार प्रसारीत व्हावयास पाहिजे. वाढदिवसाच्या शुभेच्छा तसेच सुयशाच्या शुभेच्छा देताना शतायुषी भव बरोबरच सुरक्षित, निर्धोक, आयुष्य जावो अशा प्रकारचे आशिर्वाद प्रचारात यावेत. गेल्या काही महिन्यात शाळकरी विद्यार्थी त्यांच्याच शाळेच्या बसखाली चिरडले गेले असे का व्हावे ? अशी बस मागे घेताना दुसरा माणूस बसच्या मागे येऊन चालकाला मार्गदर्शन करतो पण तसे न झाल्याने हे अपघात झाले.




आपले नगरसेवक, आमदार, खासदार यांचा पण या सुरक्षिततेशी संबंध जोडला पाहिजे. बेकायदेशीर घटनांना त्यांनी पाठीशी घालू नये. चित्रपट तारे चार चार माणसे चिरडून खुले आम फिरतात आणि पोलीस त्यांचेकडून मिळणाऱ्या पैशाच्या लाचारीत गरिबांना न्यायापासून वंचित करतात त्यांना त्वरीत शासन झाले पाहिजे. तसेच त्यांनी आपल्या मतदारसंघात सुरक्षिततेबाबत सभा, चर्चासत्र असे कार्यक्रम करून चालकांचे प्रबोधन केले पाहिजे.

गाडी चालवायला शिकविणारी अनेक केंद्रे आहेत. त्यांनी शिकणाऱ्या व्यक्तीला अनेक वेळा सुरक्षिततेची शपथ घ्यायला लावली पाहिजे तसेच एक कॅसेट करून ती शिकणाऱ्यांच्या गाडीत लावली पाहिजे, ज्यात मजकूर असेल चक्रधरा चालका तुझ्यामागे बसले आहेत ना! त्यांना तू त्यांच्या इच्छित स्थळी आनंद साजरा करण्यासाठी सुखरूप पोहोचविणार आहेस आणि परत सुखरूप परत त्यांच्या घरी आणणार आहेस. त्यासाठी तुला तुझ्या मनावर ताबा ठेवायला पाहिजे अन गाडीच्या वेगावर वाटेत भूक लागली तर खा पी पण दारू अजिबात नाही बर का. घरी तुझी पत्नी, मुलं, आई, वडील तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत मुलं बाबा खाऊ घेऊन येणार म्हणून वाट पहात आहेत. तू कोणालाही नाराज करणार नाहीस, हो ना? चालक गाडीत बहुतेक कोणतातरी देव असतो. त्याबरोबर चालकाने छोट्या मुलाचा फोटो ठेवावा. भक्तीसंगीताचा मंद सूर चालू ठेवावा. बऱ्याचवेळा स्वतःचीच गाडी असते, चालक मालकच असतो. तेव्हा त्याने पण शपथ घेतली पाहिजे, मागे बसलेले माझे बाबा, दादा, काका, आई, वहिनी व इतर नातेवाईक माझेच आहेत. माझी जर चूक झाली तर सगळ्या आनंदावर विरजण पडेल तेंव्हा मला स्वतःवर बंधन ठेवले पाहिजे. ताबा ठेवला पाहिजे म्हणजेच गाडीवर ताबा ठेवायचाय. तो ठेवलाच पाहिजे.

निसर्गोपचारांत एक तत्त्व सांगितलं जातं की, आजार स्वयंपाकघरात सुरू होतो अन् स्वयंपाक घरातच संपतो. स्वयंपाकात झालेली चूक अनारोग्यास म्हणजेच आजारास कारणीभूत होते अन् ती सुधारण्यासाठी अन्नामध्येच बदल करावे लागतात तसेच चालक हा सुरक्षिततेचा केंद्रबिंदू आहे. सुरक्षितता आणि असुरक्षितता दोन्ही त्याच्याच हातात असते तेव्हा त्याच्यावर चांगले संस्कार करून त्याला नेहमी चांगलीच सुरक्षितता अंगी बाणण्यासाठी मनापासून तयार केले पाहिजे.

# नशापान करून ड्रायव्हिंग!

ॲड. महेश आनंद वाघोलीकर

मी सेवानिवृत्त झाल्यावर अल्टो कार घेतली. ४० वर्षाचं माझं स्वप्न साकार झालं. ड्रायव्हिंग शिकलो. पक्के लायसन्स काढले. लांबचा प्रवास करावा अशी खूप इच्छा होती. शेवटी शिर्डी- शनि शिंगणापूरला जायचे ठरविले. ड्रायव्हिंगचा जास्त अनुभव नव्हता; पण एका नातेवाईक चालकाला सह-चालक म्हणून बरोबर घेतले व शिर्डीच्या प्रवासाला निघालो.

सहचालक म्हणून माझ्याजवळच्या नातेवाईकाला व त्याच्या फॅमिलिसुध्दा बरोबर घेतले. त्याला ड्रायव्हिंगचा ९ -१० वर्षाचा अनुभव होता. तो शिर्डीला ५- ६ वेळा जाऊन आलेला होता. आतापर्यंत मी शिर्डीला ३-४ वेळा गेलो होतो पण बसने.



आम्ही प्रथम शनि-शिंगणापूरला निघालो. शिर्डी वरून शनि-शिंगणापूरला जाणारा रस्ता अत्यंत धोकादायक आहे, कारण याच रस्त्याने ऊस वाहून नेणाऱ्या बैलगाडया जात असतात. तसेच स्थानिक वाहन चालक आपल्याच मस्तीत, मगरूरीने वाहने कोणतेही नियम न पाळता चालवित असतात. विशेषतः प्रवासी वाहतूक करणारे खाजगी वाहन-चालक वाटेल तशी वाहने चालवित असतात. जागा नसताना ओव्हरटेक करून आपल्यासमोर येतात. बाहेरचे वाहन-चालक भांडणे नको म्हणून स्वतःचे वाहन मागे घेतात. अशा परिस्थितीत एका स्थानिक  वाहनाची समोरासमोर होणारी टक्कर सुदैव म्हणून वाचली. कसेबसे आम्ही शनि-शिंगणापूरला पोहोचलो. तेथे दर्शन घेऊन लगेचच शिर्डीच्या रस्त्याला लागलो. रात्र झाली, या रस्त्याला विजेचे दिवे नाहीत. आजूबाजूला ऊसाची शेते व रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेली झाडे, यामुळे रस्त्यावर सर्वत्र अंधार पसरलेला होता. अशा परिस्थितीत मी हळू हळू ड्रायव्हिंग करीत होतो. समोर चाललेल्या वाहनाच्या मागोमाग मी वाहन चालवित होतो.

एकदाचे शिर्डीला पोहचलो. तेथे प्रथम बाबांचे दर्शन घेतले. नंतर जेवण केले. मी थकलो होतो. मन - शरीर थकले असेल तर बिलकूल ड्रायव्हिंग करू नये. शक्य झाल्यास मुक्कामच करावा. थकल्या मनाने शरिराने ड्रायव्हिंग केले तर अपघात हा होणारच. असे बरेचसे अपघात ड्रायव्हरला डुलकी लागल्याने झाले आहेत. आम्हाला शिर्डीला मुक्काम करायचा नव्हता कारण आम्ही नाशिकला लॉज बुक केले होते.

माझ्या नातेवाईक मित्राला मी म्हणालो, प्रदीप, तू आता ड्रायव्हिंग कर, मी पोटभर जेवलो आहे. तो होय म्हणाला, बाजरीची भाकरी, पिठलं, शेंगदाणा मिरचीचा ठेचा, मेथीची भाजी असे गावरान जेवण केले होते. मी मागील सीटवर बसलो. प्रदीपने कार स्टार्ट केली. साईनाथ महाराज की जय, सर्वांनी साईबाबांच्या नावाचा जयजयकार केला. मला डुलकी लागली. वाघोलीकर टोल नाका आला. टोलचे पैसे द्या, प्रदीपच्या हाकेसरशी मी जागा झालो. काच खाली करून पाहिले तर टोल नाका होता. 'अरे प्रदीप, आपण

सिन्नरहून शिर्डीला येताना टोल नाका नव्हता? मी त्याला विचारले. तो म्हणाला, वाघोलीकर, तुमच्या लक्षात राहिले नसेल टोलनाका होता. मी त्याला टोलचे पैसे दिले. कार थोडी पुढे गेली व खड्डयात इतक्या जोराने आदळली की, कारमधले सर्वजण आतल्या आत उडून सीटवर आदळले. प्रदीपने कार थांबविली. अर्ध्या रस्त्याचे काम सुरू होते व सर्वत्र खडी पडलेली होती. थोडे पुढे गेल्यावर आम्हाला एक नदी लागली. त्या नदीवर लोखंडी कमानीचा ब्रीज होता.

मी विचार करू लागलो, सिन्नरहून शिर्डीला येताना ही नदीही नव्हती, खड्याचा रस्ताही नव्हता. मग अचानक या मार्गावर अनोळखी गोष्टी कशा काय? प्रदीपने रस्ता तर चुकवला नाही ना? मी त्याला वैतागून विचारले.

वाघोलीकर मी रस्ता कसा काय चुकेन? मी खूप वेळा व्हाया सिन्नर शिर्डीला आलो आहे त्याच्या उत्तराने मी गप्प बसलो. शिर्डी ते सिन्नर १।। - २ तासाचा रस्ता आहे. पण २।। तास होऊन गेले तरी सिन्नर आल्याचे दिसत नव्हते. सिन्नर - शिर्डी वर




येताना लागणारी गावे- हॉटेल्सची नावे दिसत नव्हती. निश्चितच काही तरी गडबड झाली होती. जेवणापूर्वी प्रदीप पेरू आणायला जातो, म्हणून गेला होता. कदाचित हा २ -३ पेग मारून आला असावा व दारूच्या नशेत याने शिर्डीनंतर दुसऱ्याच कोणत्या तरी रस्त्याने कार आणली असावी या विचारांमध्ये असतानाच आम्हाला तीन रस्ते जेथे एकमेकांस मिळतात तो नाका लागला. या तीन हात नाक्यावर निफाड पोलीस नाका बंदी असा फलक होता. हा फलक पाहिल्यावर माझी निश्चितच खात्री झाली की, प्रदीपने रस्ता चुकविला आहे. रात्रीचे दोन वाजले होते, आम्ही शिर्डीवरून १०।। वाजता निघालो होतो.

प्रदीपने त्या नाक्यावर कार उभी केली. बाजूला निफाड पोलिसांची जीप होती. जीपमध्ये ३-४ पोलीस हातात काठी धरून पेंगत होते. अहो इन्स्पेक्टर साहेब, आम्हाला नाशिकला जायचे आहे. नाशिकला जाणारा रस्ता कोणता? रात्रीच्या काळोखात जीपमध्ये हवालदार, शिपाई, इन्स्पेक्टर कोण आहेत हे दिसत नव्हते.

इन्स्पेक्टरलाच हवालदार म्हणून संबोधले तर नको तो उपद्‌व्याप व्हायचा म्हणून इन्स्पेक्टर या नावानेच हाक मारली. एकाने वायरलेस जीपमधली लाईट लावली. माझ्या हाकेने सर्व जागे झाले. त्यातला एक खाली आला. आमच्या कारमध्ये त्याने डोकावून पाहिले. आम्ही परिवारासह आहोत हे पाहून त्याने विचारले. तुम्ही कोठून आलात? आम्ही शिर्डीवरून आलो आहोत, या माझ्या उत्तराने बाकीची पोलीस मंडळी हसू लागली. त्यातील एक म्हणाला, अहो साहेब, तुम्ही रस्ता चुकला आहात. शिर्डीहून निघाल्यावर १५-२० मिनिटानंतर सिन्नरला जाणारा फाटा डावीकडे जातो. पण तुम्ही चुकून उजवीकडे आला आहात. तेव्हा आता सरळ या निफाडच्या रस्त्याने तसेच पुढे जा. त्यानंतर नाशिक हायवे लागेल.

त्या पोलिसाने दिलेली माहिती ऐकून माझी मात्र सटकली होती. प्रदीप निश्चितच दारू पिऊन कार चालवित होता, हे सिध्द झाले होते. त्याने तसे तोंडाने कबूल केल्यावर मी त्याला मागे बसविले. व मी स्वतः ड्रायव्हिंग करायला बसलो. मला फक्त २-३ महिन्यांचा वाहन चालविण्याचा अनुभव होता. तरी मी नाशिकपर्यंत कार चालविण्याचा निश्र्चय केला. मी ड्रायव्हिंग करायला बसल्यावर नवशिक्या म्हणून माझी बायको व

प्रदीपची बायको सुध्दा घाबरली. मी त्यांना सांगितले, घाबरू नका मी धिम्या गतीने कार चालवितो. हा बेवडा कुठल्या तरी वाहनाला ठोकेल वा रस्त्याच्या कडेला गाडी उलटी करील.

रस्ता निर्मनुष्य होता. रस्त्यावर एकही वाहन दिसत नव्हते. आजुबाजूला रस्त्याच्या कडेस व शेतात असलेली झाडे रात्रीच्या अंधारात एखाद्या भुतासारखी वाटत होती. अशा परिस्थितीत आपली कार अडवून कोणी आपल्याला लुटले तर! एक भीतिदायक विचार मनात येऊन गेला. तसं लुटायला आमच्याकडे काहीच नव्हते. होती ती स्त्रियांची इज्जत! सिन्नर - शिर्डी रस्त्यावर रात्रीच्या बसेस सुध्दा लुटल्या जातात, या विषयीच्या बातम्या वृतपत्रांत वाचल्या होत्या. एकदा मनात एखादा भीतिदायक विचार निर्माण झाला की, मग अशा काल्पनिक भयावह विचारांची मालिकाच सुरू होते. मी हे सर्व विचार बाजूला सारले. मागे पाहिले तर प्रदीप डाराडूर झोपला होता. बायका, मुले पेंगत होती.



पहिल्यासारखी चूक मला करायची नव्हती मी योग्य त्या नाशिक हायवेच्या रस्त्यानेच जात आहे ना याची खात्री करण्यासाठी २-३ ठिकाणी चौकशी केली. गावच्या बाहेर स्मशानभूमी दिसत होती, काही लोक गावाकडे परतत होते. त्यांनी नाशिक हायवेचा हाच रस्ता आहे हे सांगितले. नंतर पुढच्या एका गावात एका मंदिरात भजन चालले होते. रस्त्याच्या कडेला कार थांबवून मी त्या मंदिरात गेलो. क्षणभर भजनी मंडळी मला पाहून टाळ वाजविण्याची थांबली. मी त्यांना माझी हकीगत सांगितल्यावर त्यातील एकाने बाहेर येऊन नाशिक हायवेची दिशा सांगितली. मी त्यांचे आभार मानून निघालो. मंदिरात परत भजन सुरू झाले होते.

सकाळचे ४ वाजले होते. नाशिक शहर आल्याचे लाईटच्या झगमगाटाने सूचित केले. प्रदीपची झोप पूर्ण झाली होती. त्याची आता उतरल्याची खात्री करून घेतली. एका धाब्यावर मस्तपैकी चहा घेतला. प्रदीपला ड्रायव्हिंगला बसविले. एका जीवघेण्या भयावह प्रवासाची सांगता झाली होती. आम्ही सहकुटुंब सहपरिवार साईबाबाच्या कृपेने नाशिकला सकाळी ५ वाजता सुखरूप पोहचलो.

या प्रसंगातून मी एक चांगला अनुभव शिकलो तो वाचकांना सांगत आहे,

१) ज्याला रोज संध्याकाळी दारू पिण्याची सवय आहे अशा चालकाला ड्रायव्हिंग करण्यास सांगू नका. तसेच त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवा.

२) स्वतःही दारू पिऊ नका व संध्याकाळची, रात्रीची ड्रायव्हिंग करू नका.

३) तुम्हांला ज्या रस्त्याने जायचे आहे त्याच रस्त्याने जात आहात का नाही याची जेथे जेथे फाटे असतात त्या ठिकाणी चौकशी करा. फाजील आत्मविश्वास बाळगू नका.

४) चालक तुमचा मित्र असो वा ट्रॅव्हल कंपनीचा नोकर असो. त्यांच्यावर विसंबून राहू नका.

वरील ३-४ गोष्टींची काळजी घेतली तर आमच्यासारखा प्रसंग तुमच्यावर येणार नाही.

## देश खड्डयात चाललाय!

**जय** :- काय रे विजय, या तुमच्या गावात रस्त्यांवर किती खड्डे आहेत. असे वाटते की आपण खड्डयातूनच चाललोय. खरे ना?

**विजय** :- अरे, आमच्या गावचे काय घेऊन बसलास, भानगडी आणि घोटाळे करणाऱ्या पुढाऱ्यांनी आपला सारा देशच खड्डयात घालायला घेतलाय. त्यामुळे असे दिसते की देश विकासाकडे नाही तर खड्डयात चाललाय.

संकलन :- सुरेष गोविंद देहेरकर

# वाहतुकीचे तीन तेरा

**अरूण भालेराव**

वाहतुकीच्या दैनंदिनी प्रश्नांनी म्हणजेच टॅक्सी, बस, रिक्षा, लोकल यांच्याशी संबंधित प्रश्नांनी जनता अगदी हैराण झाली आहे. लोकलबाबतीत आता बऱ्यांचशा तक्रारी कमी झाल्या आहेत. परंतु सर्वसाधारण माणुस मात्र अगदी गलितगात्र झाला आहे, कारण त्याचं काहीचं चालत नाही. मनांत येईल तेव्हां



प्रवाशांना नेण्यास 'नाही 'म्हणणार, प्रवाशांना उत्तरच देणार नाही अवाच्या सव्वा भाडे आकारणार, प्रवासी जेष्ठ नागरीक आहे कां ? प्रवासी महिला गरोदर आहे कां ? इ. कोणत्याच गोष्टींचा विचार न करतां स्वतःची मनमानी करणार, अश्या नियमितपणे उद्‌भवणाऱ्या तक्रारींनी अक्षरशः प्रत्येक माणूस वैतागला आहे. शासनाचे थोडेसुध्दां नियंत्रण या संघटनेवर नसावे, याचेच एक गौडबंगाल समजत नाही. मीटरचा गोंधळ, भाडेवाढीचा गोंधळ, निरनिराळ्या एरियांतील भाडेवाढीतील तफावत इ. बाबी वर्षानुवर्ष चालु आहेत, त्याला अंतच नाही प्रश्नांची कायमस्वरूपी उत्तरे शोधायची नाहीत, तात्पुरते 'पॅचअप' करायचे म्हणजे नंतर परत पहिले पाढे पंचावन्न! या प्रेमाचे गांभीर्य कोणालाच वाटत नाही. ज्यांचा रोजच रिक्षा-प्रवाशांसी संबंध येतो, त्यांना अक्षरशः मरणयातनाच भोगाव्या लागतात, ही वस्तुस्थिती आहे.

मी म्हणतो ते शक्य आहे किंवा नाही ते मला माहीत नाही; परंतु हे होऊ शकेल तर रिक्षाचालक आणि प्रवासी यांच्यातील खूप भांडणे कमी होतील असं वाटतं. मीटरवर रिक्षाने प्रवास केल्यावर रिक्षा भाडयाचा एकच आकडा यावा म्हणजे तो पाहिल्यावर गिऱ्हाईक तेवढीच रक्कम कोणताही वाद न घालता रिक्षावाल्याला देईल. 'मीटरमध्ये दिसणाऱ्या आकड्याला अमक्याने गुणा आणि त्यांत इतके मिळवा' ही भानगडच नको.

तसेच एका रिक्षा-चालकाच्या चुकीच्या वर्तनामुळे संपूर्ण रिक्षा युनियनच बदनाम होऊ नये, म्हणून अक्षरशः प्रवाशांशी कसे विनयाने वागावे याचे रिक्षाचालकांना Training Course द्वारा शिक्षण देणे आवश्यक आहे असे वाटते. सर्वच लोक रिक्षाचालकांविरूध्द तक्रार करतात, त्यांत नक्कीच तथ्य असते. वास्तविक पहातां गिऱ्हाईक अत्यंत घाईत असल्यामुळे त्याला योग्य ठिकाणी तक्रार करायलाही वेळ मिळत नाही म्हणून लिखित तक्रारींचे प्रमाण कितीतरी पटीने कमी होते. एक मात्र नक्की की सामंजस्याने वागल्यास रिक्षाचालक प्रवासी यांच्या तक्रारी कमी होण्यास हातभार लागेल. पण हे शक्य आहे का ?



# वर्षा ऋतूतलं ड्रायव्हिंग

ॲड. महेश आनंद वाघोलीकर

पाणी व चिखलामुळे रस्ते अतिशय निसरडे बनलेले असतात. त्यावरून वेगाने जाणे खरोखरीच धोक्याचे असते. त्यामुळे हातपाय नीट ठेवायचे असतील तर गाडी सावकाश, कमी वेगाने चालवा गाडी एकदम खालच्या गियरमध्ये चालवा.



पावसाळ्यात रस्त्यामध्ये खड्डयात पाणी साचते एखादा चालक नेहमीच त्या रस्त्याने ये -जा करणारा असल्यास त्या रस्त्यातील खड्डयाची माहिती असते. त्यामुळे तो बरोबर खड्डे चुकवून वाहन चालवित असतो. पण नव्याने त्या रस्त्याने जाणाऱ्या वाहन चालकास खड्डयाचा अंदाज न आल्यास खड्डयात जाण्याची पाळी येते. खड्डयामुळे इंजिनमध्ये पाणी जाऊन नुकसान होऊ शकते. तेंव्हा वाहनचालकाने आपल्या समोर चाललेल्या वाहनाचा अंदाज घेऊन वाहन चालवावे व वाहनाची गती कमी ठेवावी.



भर पावसातून ड्रायव्हिंग करायची वेळ आल्यास वाहन चालवायच्या अगोदर ब्रेक सिस्टिम तपासून घ्या. ब्रेक लाइनर / पॅड्समध्ये पाणी गेले असेल तर पाणी काढून टाका. मान्सूनमध्ये ड्रायव्हिंग करा पण जरा जपून.

पावसाळ्यात वाहन चालकाची खरी कसोटी असते. वाहनचालकांनी वाहनाच्या हेडलाईटची प्रखरता तपासून घ्यावी कारण पावसाळ्यात ढगांमुळे, धुक्यामुळे व जोरदार पावसामुळे ४-५ फूट अंतरापेक्षा जास्त दुरवरचे दिसत नाही. अशाप्रसंगी समोरून येणाऱ्या वाहनांना सिग्नल देण्यासाठी दिवसासुध्दा हेड-लाईट सतत चालू ठेवणे भाग असते. त्यामुळे रस्ता स्पष्ट दिसतो. विशेषतः घाट चढताना-उतरताना अशी सावधानता घेणे आवश्यक ठरते.

पावसाळ्यात पाण्यामुळे वाहनांचे ब्रेक्स् लवकर लागत नाहीत. एरवीची गोष्ट वेगळी असते. एरवी चटकन ब्रेक लागतात पण पावसाळ्यात तसे होत नाही. त्यामुळे थांबण्याच्या वेळेस योग्य अंतरावरून ब्रेक लावण्याचा प्रयत्न करा म्हणजे तुम्ही योग्य ठिकाणी थांबाल व अपघात होणार नाही.

पाणी भरले असेल तर इग्नीशन चालू करू नका, मॅकॅनिकला तुमचे वाहन दाखवा. तसेच जर वाहन पाण्यामध्ये फसले असेल तर एसी बंद करून खिडक्या उघडा. उपरोक्त टीप्स लक्षात ठेवल्या तर तुमची मान्सून ड्राईव्ह नक्कीच चांगली होईल.

# नाते तुमचे आणि वाहन चालकाचे

ॲड. महेश आनंद वाघोलीकर

बहुतेक मध्यमवर्गीय स्वत:च्या वाहनाने किंवा एवाद्या ट्रॅव्हल एजन्सीकडून कार घेऊन प्रवासाला जात असतात. अशा प्रसंगी रोजंदारी तत्वावर वा ट्रॅव्हल कंपनीचा वाहन चालक घेतला जातो. चालक ट्रॅव्हल कंपनीचा असो वा एखादा ओळखीचा असो, प्रवासात त्याच्याशी नाते एक फॅमिली फ्रेंड - पारिवारीक सदस्य म्हणून ठेवले पाहिजे. त्याच्या मानसिकतेवरच तुमचे सर्वांचे जीवन अवलंबून असते. पण याची जाणीव सांभाळणारी ठेवत नाही. वाहन चालकास एक चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून वागणूक देतात. स्वतः जेवणाचीही चौकशी करीत नाही. त्यांना असे वाटते की ''आपण त्याचा पगार भत्ता देतो ना! मग तो त्याचे पाहून घेईल.''



शेवटी वाहनचालक हा एक माणूसच आहे. वाहनाप्रमाणे मशीन - यंत्र नाही. याची जाण ठेवून प्रत्येकाने वागले पाहीजे. त्याबाबत आमच्या अनुभवावर आधारीत या आहेत काही टीप्स.

प्रवासाला निघण्यापूर्वी ड्रायव्हरची तब्येत कशी आहे याची चौकशी करावी. कधी कधी ड्रायव्हर बाहेरच्या ट्रिप मारून आलेला असतो. त्याला विश्रांती मिळालेली नसते. त्याला सर्दी ताप अंगदुखी असा छोटासा आजार असल्यास त्यास ताबडतोब योग्य तो औषध उपचार घेण्यास सांगावा. ड्रायव्हर एखाद्या ट्रॅव्हल कंपनीचा कर्मचारी असेल तर व तो नुकताच बाहेर जावून आला असल्यास त्यास थोडीशी विश्रांती घेण्यास सांगावे व नंतरच प्रवासाला निघावे.

काही वर्षापूर्वी आम्ही गोव्याला १६ सीट्‌रची बस घेवून फिरायला गेलो होतो. त्या ट्रॅव्हल बसच्या मालकाने आम्हाला सदर ड्रायव्हर नुकताच औरंगाबादहून आला आहे याबाबत काहीच कल्पना दिली नव्हती. तो ड्रायव्हर आम्ही बुक केलेली बस घेवून लगेचच निघाला. संध्याकाळी त्यास ताप भरला, त्याची मानसिक, शारीरिक स्थिती लक्षात आल्यावर आम्ही त्याला डेरवण येथील डॉक्टरांकडे नेले त्यास आमच्याच खर्चाने औषधोपचार केले. मग आम्ही त्याच रात्री एका नातेवाईकाच्या बंगल्यात मुक्काम केला व ड्रायव्हरने पुरेशी विश्रांती घेतल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी पुढच्या प्रवासाला निघालो. या ड्रायव्हरने पुढील प्रवासात आम्हाला खूप चांगले सहकार्य केले हा ड्रायव्हर एक कर्मचारी आहे. आम्हांला त्याच्याशी काही देणे घेणे नाही, आम्ही एक दिवस मुक्काम का वाढवायचा? असा आम्ही विचार करून त्या ड्रायव्हरला तशाच स्थितीत बस चालविण्यास सांगितले असते तर ते अपघाताला निमंत्रण ठरले असते.

ड्रायव्हरचे ड्रायव्हिंग लायसन्स त्याने सोबत घेतले आहे की नाही, गाडीची कागदपत्रे, परमिट बरोबर आहे की नाही याची चौकशी प्रवास सुरू करण्यापूर्वीच

करावी. सुरक्षित पर्यटनासाठी काळजी घेताना तो प्रवास कायद्याचे नियम पाळून, वाहतुकीचे नियम पाळून होईल याची काळजी तुम्ही घेतली पाहिजे.

असा अनुभव आहे की, विशेषतः तरूण मंडळी प्रवासाची सुरूवात बीअर, ब्रँडींच्या चिअरअप्सने करतात. कदाचित वाहन - चालक तुमच्यापैकी वा एखादा कर्मचारी असेल तर तुम्ही मद्यपान करीत असताना त्याचेही मन विचलीत होऊ शकते व त्याचे ड्रायव्हिंगवरील लक्ष कमी झाल्यास एखादा अपघात होऊ शकतो. तेव्हा तुम्ही वाहन चालू असताना नशापान करू नका वा त्यास अशा ड्रींक्सची ऑफरही करू नका.




आपल्याबरोबर दुसऱ्याचाही आत्मसन्मान राखणे ही एक चांगल्या व्यक्तीमत्वाची, गुणवत्तेची निशाणी आहे. आपल्या बरोबर असलेल्या ड्रायव्हरला मित्रत्वाची वागणूक द्या. तो जर ट्रॅव्हल कंपनीचा नोकर असेल तर त्यास तुमच्या परिवारापैकी एक समजा. पण या सर्वसाधारण गोष्टींचे भान पर्यटकांना राहत नाही. कधी कधी पर्यटक ड्रायव्हरला शिवीगाळ करतात, त्याचा अपमान करतात. त्याच्या चहा, पाणी, नाष्टा जेवणाची चौकशी करीत नाही, त्यामुळे पर्यटकांकडून दुखावलेल्या ड्रायव्हरकडून वाहन वेगाने नेणे, कट मारणे, चुकीचे ओव्हटेकींग करणे असे प्रकार घडतात व अशा प्रकारामुळे छोटासा जरी अपघात घडला तरी पुढील प्रवासाचे टाईमटेबल कोसळते. पर्यायी साऱ्या प्रवासाचा मूडच बिघडतो. तेव्हा ड्रायव्हर आपला सोबती, जीवनसारथी आहे असे समजून त्यास सन्मानपूर्वक वागणूक दिली तर संपूर्ण प्रवास आनंददायी होऊ शकतो.

ड्रायव्हरच्या शेजारी असलेल्या व्यक्तीने कधीच झोपू नये. उलट त्यास वळणावर समोरून येणाऱ्या वाहनाबाबत मार्गदर्शन करावे. ओव्हरटेकींग करताना वा एखादा मागील वाहनचालक साईड मागत असेल तर त्याप्रसंगी सूचना कराव्यात. पावसाळ्यात वाहनाच्या काचा बंद असतात. कार एसी असेल तर ड्रायव्हरसमोरील काचेवर बाष्पामुळे आतील बाजूस अंधुकता निर्माण होते. अशावेळी ड्रायव्हरशेजारील व्यक्तीने ती काच पुसली पाहिजे. कारण ड्रायव्हर एकाच वेळी दोन गोष्टी करू शकत नाही. ड्रायव्हरला पाणी देणे अशी कामे शेजारील व्यक्तीने मित्रत्वाच्या नात्याने करण्यास काहीच हरकत नाही.

सुरक्षित व वाहतुकीचे नियम पाळून संपूर्ण प्रवास हा एक उत्तम पर्यटनाचा महत्वाचा भाग आहे, नाही का ?

*With Best Compliments From :*

# Bhavesh Auto



# सुरक्षा अभियान रस्ते सुरक्षा

पुष्पा कृ. करोड

'रस्ते सुरक्षा' या विषयावर एवढे लिहिण्यासारखे आहे की, शब्द अपुरे पडतील! मी एक ज्येष्ठ नागरीक आहे. प्रत्येक कारणासाठी रस्त्यावर जाणे भागच पडते. पण रस्त्यावर चालणे म्हणजे शिक्षाच वाटते. इतके कटू अनुभव रस्त्यावरून चालतांना येतात. माझ्या घराजवळून एल. बी. एस रोड लाल बहादूर शास्त्री मार्ग आहे. तो वाहनांनसाठी '२' वे आहे. पण बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांनी तो '२' वे चा '४' वे केला आहे. जवळच बाबूभाई पेट्रोलपंप असल्याने, वाहने जाणाऱ्या रस्त्यावरूनच येणारी वाहने बिनधास्तपणे येतात. येणाऱ्या रस्त्यावरुन सुध्दा जाणारी वाहने बिनधास्तपणे चालवत असतात आणि या वाहनांचा वेगही कमी नसतो. परवाच एका बाईला गैरमार्गाने येणाऱ्या वाहनाने ठोकरले. त्यांचा काहीही



गुन्हा नसतांना फ्रॅक्चरला वगैरे त्यांना तोंड द्यावे लागले, गुन्हा करणारे पळून जातात. मला तर वाटते की, रस्त्यावर कोठेही पेट्रोलपंप असूच नयेत. ते शहराबाहेर किंवा जिथे चार मोठे रस्ते मिळतात तिथे कोपऱ्यावर चालवावित. टू व्हीलर चालवित रस्ता हा आपलाच आहे अशा थाटात मोबाईल खांद्यावर ठेवून, मान वाकडी करुन, आम्ही खूप बिझी आहोत असा देखावा करून टू व्हीलर चालवित असल्याने आम्हीच, रस्त्यावर चालणाऱ्यांनीच त्यांच्याकडे पहात बसायचे! न जाणो रस्त्यावर क्रॉसिंगसाठी उभे असलेल्यांवरच हे महाशय वाहन घालतील की काय ही भीती, सायकलवाले तर वाट्टेल त्या मार्गाने सायकल चालवित असतात. एकदा मी रस्ता क्रॉस करीत होते. विरुध्द बाजूने एक सायकलवाला माझ्या इतक्या जवळून गेला की मला वाटले की, आपल्या कानावरुनच फटकन लागून कान रक्तबंबाळ होतो की काय! पण त्या गृहस्थाला रस्त्यावरुन चालणाऱ्यांची पर्वा कशाला? तो सायकलवाला वेगात निघूनही गेला.

ज्येष्ठ नागरिकांना डॉक्टरांकडे, नातवंडाना आणायला, सोडायला प्रत्येक गोष्टीला रस्त्याचा वापर अनिवार्य ठरतो. कित्येकजण आजारी असतात. शरीर कममुवत झाल्याने इंद्रियाला आवर घालणे मुष्कील झालेले असते. अशा वेळी कधी एकदा घर गाठतो असे झालेले असते. पण या वाहन चालविणाऱ्यांना कोणाचीही पर्वा नसते. मोठमोठ्याने हॉर्न वाजविणे, वाहनांतून लांबवर थुंकणे, गाडीतील धूर रस्त्यावर उभ्या असलेल्यावर सोडणे जेणेकरुन रस्त्यावरची धूळ, कचरा, धुराबरोबर नाकातोंडात जायलाच हवा असे आणखीही विविध त्रासदायक प्रकार रस्त्यावर सर्रास चाललेले असतात.

रस्त्यावर पेट्रोलपंप असल्याने गॅस भरण्यासाठी रिक्षाच्या लांबचलांब रांगा लागलेल्या असतात. तिथेच महापालिकेच्या कचऱ्याचे डबे, तिथेच भिकाऱ्यांचे कुटूंब, त्यांचे कुत्रे अशा ठिकाणाहून वाहनांची ये-जा सुरु असते अशा रस्त्यावरुन चालणे म्हणजे खरेच दिव्य आहे. मला तर वाटते की, रस्त्यावरुन

चालण्यासाठी हमी घेणारा परवाना आणि सुरक्षा विमा पादचाऱ्याला देण्यात यावा.

रस्त्यावर गॅरेजवालेपण अधिकार गाजवत असतात. त्याची रिक्षादुरुस्ती, टू व्हीलर दुरुस्ती रस्त्यावर बिनधास्तपणे चालू असते. त्या नादुरुस्त वाहनांच्या पलीकडून येणारी वाहने जवळ आली तरी ती दिसत नाहीत. पण कुणाला म्हणून सांगणार ? कोणीही ऐकणार नाही हे खरं ! कारण रस्ता हा त्यांचाच आहे. दिवसाचे चोवीस तास त्यांचा तिथे वावर असतो आरामात. रस्त्यावर कुठेही रिकामी जागा दिसतच नाही. आमच्या कोलबाड नाक्याला तर सिग्नलच नाही आणि असलाच तर तो कोण वापरणार! बेदरकारपणे वाहने चालविणारे विशेषतः टु व्हीलरवाले (सायकलवाल्यांचा प्रश्नच नाही.) तो तोडण्यातच हुशारी मानतात.



रस्त्यावर पानाचे ठेले तर अजिबात असू नयेत, कारण लोक पान खात, सिगारेट ओढत, रस्त्यावर सतत थुंकत, खकारे टाकत, मोठमोठ्या पानाच्या पिचकाऱ्या रस्त्यावर टाकत रस्ता अडवून उभे असतात. अक्षरशः पाय ठेवायला तिथे जागा नसते. हवे असल्यास जिथे पानवाले आहेत त्यांच्या जवळचा रस्ता जरूर पहा. पानवाल्याला त्याचे घेणेदेणे नसते. त्याचा रोजगार दुकान रस्त्यावर असल्याने छानपैकी चालू असतो.

रस्त्याच्या बाबतीत आणखी अनेक चित्रविचित्र अनुभव असूनही एवढे नमूद करावेसे वाटते की, रस्त्यावर पट्रोलपंप, गॅरेज, पानाचे ठेले, दारूची दुकाने वगैरे काहीही नसावे आणि नियम मोडणाऱ्यां, टु व्हीलरवाल्यांना, सायकलवाल्यांना लगाम असावा.


***With Best Compliments From :***

Sanjay Insurance
Consultants & Agents

# रस्ते अपघात टाळण्यासाठी

राजश्री रामचंद्र खरे

'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' अशा विचाराने काहीच न करता भाग्य उजाडाण्याची वाट बघणे जेवढे चुकीचे तेवढेच माझ्या हातात गाडी आणि ती चालविण्याचा परवाना आला म्हणजे ती कशीही चालवून दुसऱ्याच्या जीवाशी खेळणेही चुकीचेच नाही का? आलेली आर्थिक सुबत्ता यामुळे चारचाकी, दुचाकी गाड्यां वाढल्या आहेत अगदी कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलाच्या हातातही दुचाकी आली आहे. आलेली श्रीमंती आणि भ्रष्टाचार यामुळे माझे कोण काय करू शकते ? या भावनेमुळे गाड्या सगळे नियम धुडकावून चालविल्या जातात आणि अपघात होतात. अपघातच्या बातम्या वाचल्या, ऐकल्या की मनात विचार येतो खरंच माणसाचे आयुष्य एवढे बिनमोलाचे आहे का? की इतक्या वाईट परिस्थितीत त्याला मरण यावे!



काही वर्षांपूर्वी माझ्या भावाच्या फॅमिलीलाही असाच भयंकर अपघात झाला. त्याची फॅमिली कोल्हापूरला चालली होती. माझी वहिनी तिची दोन मुले, सून आणि नातू. भावाचे नुकतेच तीन चार महिन्यापूर्वी निधन झाले होते. रात्री भाड्याची गाडी करून ते निघाले आणि साताऱ्याजवळ रात्री २ च्या सुमारास गाडी झाडावर आपटून भीषण अपघात झाला. वहिनी जागीच गेली. मुलगा आणि सून नंतर वर्ष दीडवर्ष हॉस्पिटलमध्येच होते. मुलगा मृत्यूच्या दाढेतून परत आला, तर सून पायाने कायम अधू झाली. फक्त मोठा मुलगा आणि १ वर्षाचा नातू सुरक्षित राहिले. या अपघाताचा माझ्या मनावरच एवढा परिणाम झाला की, मी तर गाडीत बसायला घाबरतेच. पण कोणीही कारने गेले तरी परत येईपर्यंत मी टेंशनमध्येच असते. आता हा अपघात कसा झाला असेल ? विचार केला तर वाटते एक तर ड्रायव्हर खूप दमला असेल, त्याला डुलकी आली असेल किंवा अंधारात झाड दिसले नसेल. रात्री २ च्या सुमारास अपघात होऊन कित्येक नट-नट्या गेलेल्या आहेत. कारण त्यांचा प्रवास रात्रीचाच असतो.

सगळेच चालक बेपर्वाईने चालवणारे असतात असे नव्हे पण काही असतात. नक्कीच मग आता यासाठी काय करायचे? सर्वात पहिली गोष्ट प्रत्येकाची आपल्या कामावर श्रध्दा पाहिजे. माझे ड्रायव्हिंगचे काम मी मनापासून करीन अशी भावना गाडी चालविणाऱ्या प्रत्येकाची असली पाहिजे. दुसरी महत्वाची गोष्ट भ्रष्टाचाराला आळा बसला पाहिजे, ड्रायव्हिंगचे नियम तोडून बेदरकारपणे गाडी चालविणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे. मग ती व्यक्ती कितीही प्रतिष्ठीत असो वा श्रीमंत असो. त्यासाठी वरिष्ठांकडूनही योग्य ती कारवाई केली गेली पाहिजे. जेव्हा प्रतिष्ठित, श्रीमंत माणसेही कायद्यातून वाचू शकत नाहीत हे इतरांना दिसेल तेव्हांच त्यांना जरब बसेल आणि ते नियमांचे उल्लंघन करणार नाहीत.

अमेरिकेत गाडी चालवितांना चूक झाली तर पोलीस

गाडी ताबडतोब बाजूला घेऊन त्याला दंड करतात. त्याला तिकीट देतात असे तीनवेळा तिकीट मिळाले तर त्या व्यक्तिचे लायसन जप्त करतात. नंतर चालकाला पुन्हा ड्रायव्हिंगची परीक्षा द्यावी लागते तेव्हाच लायसन मिळते. लायसन्स मिळविण्यासाठी केव्हाही परीक्षा पास होणे सक्तीचे असते अशा कडक अंमलबजावणीमुळे प्रत्येकजण जाणीवपूर्वक गाडी चालवितो. नाशिकसारख्या ठिकाणी (अर्थात इतर ठिकाणीही असेल पण मी नाशिकला बघितले) प्रायव्हेट टॅक्सीमध्ये एवढी माणसे कोंबली जातात की, कडेला बसलेल्या माणसाचे शरीर केव्हा ही दार उघडून बाहेर येईल असे वाटते. रिक्षात तर ड्रायव्हरच्या सीटवरही तीन तीन माणसे बसतात, आणि बेफामपणे गाड्या चालविल्या जातात; परीणाम काय अपघात! रिक्षा, स्कूलबस, प्रवासी गाड्या या साऱ्यांमध्येच गाडीच्या क्षमतेपेक्षा



कितीतरी अधिक प्रवासी भरले जातात शिवाय ड्रायव्हर डबल ड्यूटी करून आलेला असतो. शिवाय गाडी भाड्याची असल्यामुळे त्याला गाडीच्या नुकसानीची पर्वा नसते. त्यामुळे तो वाटेल तशी गाडी चालवितो, परिणाम- भीषण अपघात.

बरेचवेळा स्टेशनजवळील अथवा बाजारपेठेतील रस्ते फेरीवाल्यांनी आणि पार्क केलेल्या वाहनांनी तुडूंब भरलेले असतात. अशावेळी खरेदीदारांना वाहनातून मार्ग काढणे तर कठीण होतेच पण प्रसंगी रिक्षावाले पायावरून बिनधास्तपणे गाडी घेऊन जातात व धडक देऊन जातात. अशावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून फेरीवाला झोन वेगळा असणे अत्यावश्यक आहे.

लोकांनी फूटपाथवरून चालावे हे अगदी मान्य पण फूटपाथ चालायला रिकामेच नसतात. बरेचसे फूटपाथ दुकानदारांनी अडविलेले असतात. उदा. आमच्या बाजूच्याच फूटपाथवर आमच्या बिल्डिंगला लागून एक रद्दीवाला, त्याच्या बाजूला सिझनल फळेवाला त्याच्या बाजूला आप्पमवाला, पुढे चहाची टपरी, घड्याळ दुरूस्ती, पानवाला आणि भेळपुरीवाला की फूटपाथ संपला. या साऱ्यांची गिऱ्हाइके दिवसभर फूटपाथवर आस्वाद घेत असतात. खालून जावे तर पार्कींगच्या गाड्यांची गर्दी आणि त्याच्याही पुढून जावे तर दोन्ही कडच्या गाड्या स्वागताला हजर. देवाचे नाव घेतच चालायचे पादचाऱ्यांनी जायचे तरी कोठून?

सर्वत्रच वेगवेगळ्या वाहनांसाठी वेगवेगळ्या लेन अत्यावश्यक आहेत. हल्ली घरे दूरदूर झाल्यामुळे सायकलवरून शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढले आहे. वाट मिळेल तशी मुले सायकल चालवित जातात. कोठूनही एखाद्या ट्रक दुचाकी पुढे जाण्याच्या घाईत सायकलला धडक देतात. परिणामः एक मासूम जिंदगी खल्लास त्यामुळे सायकलसाठी स्वतंत्र मार्ग पाहिजे. कमीत कमी गावात ज्या ठिकाणी शाळा, क्लासेस अधिक आहेत तेथे तरी ही सोय असावी.

म्हणूनच वाहन चालकाने मन शांत ठेवून पुढच्या वाहनांशी स्पर्धा न करता रागाने पुढे घुसण्याचा प्रयत्न न करता वाहने चालविली पाहिजेत. मोबाईलवर बोलत गाडी चालविणाऱ्यावर तर कारवाई झालीच पाहिजे. बरेचवेळा गाडीत योग्य अंतर न ठेवल्याने एखादी गाडी अचानक थांबली तर मागील तीनचार गाड्या एकमेकांवर आपटतात, असे अपघात मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. थोडक्यात ओव्हरटेक करणे, डब्बल डुटी करणे, वाहन योग्यरित्या दुरूस्त न करणे, क्षमतेपेक्षा अधिक लोक गाडीत भरणे, मोबाईलवर बोलणे, सुरक्षित अंतर न ठेवणे अशा अनेक कारणांनी अपघात होतात.

तेंव्हा या साऱ्या गोष्टी टाळल्या पाहिजेत आणि हे जेव्हा कायदे कडक होतील कायद्यांची अंमलबजावणी योग्य होईल तेव्हांच घडेल.

आता या साऱ्या गोष्टीत सामान्य माणूस काय करू शकतो तो रस्ता ओलांडतांना पांढऱ्या पट्टयांवरूनच ओलांडेल. ज्याला वेळ असेल तर तो दुसऱ्यांना रस्ता ओलांडायला मदत करेल. खूप मोकळा वेळ असेल, काही करण्याची इच्छा, आवड असेल तेव्हा गर्दीच्या ठिकाणी जेथे वाहनांची गर्दी आहे पण वाहतुक पोलिस नाहीत अशा ठिकाणी स्वयंसेवक स्वतःहून वाहतुक पोलीसांचे काम करू शकतो.

माणसाच्या मनावर एखाद्या गोष्टीचा सतत मारा झाला की, आपोआप परिणाम होतो. जसे दूरदर्शनवरील जाहिराती, हल्ली रेडिओवर एक सतत जाहीरात लागत असते. पूर्णपणे माझ्या लक्षात नाही पण 'सुरक्षित चालक वहाने, करू प्रवास सुखाने' अशा काहीशा ओळी आहेत. सतत ऐकल्याने माणसाच्या मनावर नक्कीच परिणाम होतो. म्हणूनच सुरक्षा अभियानची घोषवाक्ये उदा. 'आला आला घाट, नको करू थाट, नीट बस ताठ जपून उतर घाट', अथवा 'छोट्या पुलावर मन मोठे असू द्या, तुमचा वेळ जाऊ द्या, समोरच्यास येऊ द्या, पोटात टाकून पावशेर दारू, नका मरू किंवा मारू .' अशी घोषवाक्ये दूरदर्शनवर सतत दाखविली पाहिजेत. रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी लावली पाहिजेत. सर्वात महत्वाचे सुरक्षित चालविणाऱ्यांना उत्तेजन म्हणून पाच वर्षात ज्याच्या हातून एकही अपघात झाला नाही अशा चालकांना आर. टी. ओ. अथवा सुरक्षाअभियान कडून बक्षिस दिले पाहिजे.

सारी काळजी घेऊनही अपघात घडणार नाही असे नाही पण प्रमाण कमी होईल. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे सगळी काळजी घेऊन घडतो तो अपघात आणि चुकीमुळे, निष्काळजीपणामुळे घडते ती घटना. तो असतो एक भयंकर हादरा!

***With Best Compliments From :***

**नवनित मोटर्स**
**प्रा. लि. (मारुती)**

# रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात

मंगेश त्रिं. त्रिफळे

जागतिक लोकसंख्येच्या अभ्यासानुसार, भविष्यात 'तरूणाई ने संपन्न' असा आपला भारत राहणार आहे असे म्हणतात. ही तरूणाई अशीच टिकून राहण्यासाठी सर्वप्रथम रस्ते अपघात नियंत्रणात येणे ही आज काळाची गरज आहे. कारण 'देश अमुचा शिवरायांचा, अन झाशीवाल्या रणरागिणीचा' ही आमची खरी ओळख, खरा सांस्कृतिक वारसा. पण आमच्या या तरूणाईवर आज प्रामुख्याने योग्य-अयोग्य याचे भान न ठेवता पाश्चिमात्य विचारांची मोठ्या प्रमाणात पडत असलेली भुरळ, त्यामुळे आता 'देश अमुचा (रस्ते) अपघातांचा, अन, नाहक बळी जाणाऱ्यांचा' अशी नवी ओळख होत चालली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये! उद्याची आशा असलेली ही तरूणाई या अपघातांनी कोमेजायला नको ना? मग हे रस्ते अपघात टाळण्यासाठी आपण काय करू शकतो?



मोठ्या प्रमाणात होणारे हे रस्ते अपघात टाळण्यासाठी, समाजमन आणि शासन यंत्रणा हे दोन्ही परस्परपूरक घटक एक होऊन प्रामाणिक प्रयत्न झाले तरच रस्ते अपघातांची ही गंभीर समस्या नियंत्रणात आणली जाऊ शकते. यासाठी करावयाच्या प्रयत्नांची चर्चा करण्याअगोदर आपण अपघात आणि त्याच्या करणांची ठळकपणे वर्गवारी करू.

रस्त्यावर होणाऱ्या वाहन अपघातांचा विचार करता, रस्ते अपघातांना पुढील ठळक तीन प्रकारांमध्ये विभागता येईल. (१) दुचाकी वाहनांचे अपघात - हे सर्वात जास्त होतात आणि यात बळी जाणाऱ्यांमध्ये बहुतांश तरूण वर्ग असतो. (२) प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांचे अपघात - यात प्रामुख्याने खाजगी, अवैध वाहतुक, जास्तीत जास्त प्रवासी भाडे आपल्यालाच मिळावे या त्याच्या आर्थिक गरजेतून होणारे अपघात. (३) मालवाहतुक करणाऱ्या वाहनांचे अपघात- नेमून दिलेल्या ठिकाणी कमीत कमी कालावधीत माल नेऊन पोहोचविण्याच्या प्रयत्नातून, मर्यादेपेक्षा अधिक भार वाहून नेणे, अनेक महिने घरापासून दूर राहिल्याने कौटुंबिक विवंचनेत चिंताग्रस्त होऊन नशापाणी घेऊन वाहन चालविणे इ. मधून घडणारे अपघात.

रस्ते अपघातांची ही ३ भागांमध्ये विभागणी आपण पाहिली आता हे अपघात होण्यामागे अत्यंत महत्त्वपूर्ण ४ प्रमुख कारणांचा विचार करू. कुठलाही वाहन चालक हा अधिकृत परवानाधारक जरी असला तरी देखिल (अ) वाहन सुस्थितीत नसणे (ब) वाहन चालवितांना, वाहतुक नियमांचे नीट आकलन नसणे, आवश्यक एकाग्रतेचा अभाव. अति उत्साहात उतावीळपणे किंवा चिंताग्रस्त अवस्थेत वाहन चालविणे. जास्तीत जास्त दुचाकी वाहनांचे अपघात, या कारणातून घडतात. इतरही वाहन अपघातांमध्ये ही बाब कमी अधिक

प्रमाणात लागू होते. (क) वाहन चालवितांना चालकाची शारीरिक अवस्था उदा. अपुऱ्या झोपेमुळे येणारी डुलकी, अंमली पदार्थांचे सेवन इ. (ड) रस्त्यांची स्थिती. जसे रस्ता; वाहनाच्या गतीशी सुसंगत नसणे, रस्ता अरूंद, खराब लेन विरहित असणे व नैसर्गिक आपत्ती. एखादा प्राणी येऊन आदळणे, त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात होणारे अपघात.

अशा प्रकारे अत्यंत थोडक्यात, रस्ते अपघात आणि त्याची कारणे याचा ठळक आढावा घेतला. आता हे रस्ते अपघात टाळण्यासाठीच्या उपाययोजनांचा विचार करण्याअगोदर प्रातिनिधिक स्वरूपात आपण काही घटना पाहू, जेणेकरून या लेखाच्या सुरूवातीपासून नमूद केलेले सर्व मुद्दे सुस्पष्ट होतील.




**पहिला किस्सा-** एक किशोरवयीन मुलगी, व्हॅलेंटाईन डे पार्टी आटोपून आपल्या दुचाकीवर बसून कानाला इयर फोन लाऊन सुसाट वेगाने निघाली व गाडी अनियंत्रित होऊन, तिचा अपघात झाला. मन त्या पार्टीतच ठेवून सुसाट वेगाने गाडी चालविल्याने हा अपघात झाला. (होळी, ३१ डिसेंबर प्रमाणेच व्हॅलेंटाईन डे ला सुध्दा धूम स्टाईलने गाड्या हाकण्याच्या घटना लक्षात घेऊन पोलीस विभाग अनेक प्रतिबंधात्मक उपाय करतात.)

**दुसरा किस्सा-** एक तरूण, बर्थडे पार्टी आपल्या मित्रांसोबत हायवेवरच्या ढाब्यावर साजरी करून रात्री परततांना, कार अतिजोषात चालविल्यामुळे, नादुरूस्त उभ्या ट्रकवर आदळून अपघात झाला.

**तिसरी घटना-** कर्जाऊ घेतलेली काळीपिवळी, आर्थिक गरजेतून जास्तीत जास्त भाडं मिळविण्यासाठी, क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक प्रवासी कोंबून, मागून येणाऱ्या एस.टी.च्या अगोदर पोहोचण्याच्या ईर्षेतून, अतिवेगात गाडी चालवली आणि स्वत: सोबत एकाच वेळी अनेक प्रवाशांचे जीव गेल्याच्या कितीतरी घटना घडतात. कित्येकदा चालकाची इच्छा नसतांनादेखिल प्रवासी उचकावतात आणि त्यातून देखिल मोठे अपघात घडतात. (बिनफाटकाचे रेल्वे रूळ ओलांडतांना, पुलावरून पुराचे पाणी जात असतांना)

हीच बाब कमी अधिक प्रमाणात मालवाहतूक करणाऱ्या वाहनांच्याबाबतीत देखिल घडते. बरेचदा नादुरूस्त ट्रकला मागेपुढे अत्यावश्यक किमान रिफ्लेक्टर्स देखिल नसतात, त्यामुळे रात्रीच्या वेळी दुसरे वाहन त्यावर आदळून अपघात घडतात. कमीत कमी कालावधीत मर्यादेपेक्षा अधिक माल नेऊन देण्यासाठी गाडी मालकाचा दबाव, ज्याचा माल तो चालकाला बक्षीसाचे लालच दाखवतो. आधीच चालकाची अपुरी झोप, अनेक महिने घरापासून दूर राहिल्याने कौटुंबिक चिंता आणि यात भर म्हणजे मार्गात सहजगत्या उपलब्ध होणारे नशापाणी, या समस्यांतून अपघात घडतात, याशिवाय

विहीत मापदंड नसलेले, किरकोळ खराबी असलेले वाहन दामटणे, रस्त्यांची खराब स्थिती, मार्गावर सुरक्षित अंतरावरून सहज लक्षात येतील अशा सुचना फलकांचा अभाव, गतीरोधक विहीत मापदंडाप्रमाणे नसणे, बांधकाम साहित्य रस्त्यांवर विखुरलेले असणे, इ. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये बरेचदा अचानक कुत्रा

वाहनामागे जोरात धावत आल्याने, अचानक रस्त्यात एखादे जनावर, साप आडवा येणे (विशेषत: दुचाकीच्या बाबतीत), घाबरूनदेखिल अपघात घडतात. वर नमूद हे सर्व प्रकारच्या घटना टाळण्यासाठी सुसंघटीत व तातडीने प्रयत्नांची खालीलप्रमाणे नितांत गरज आहे. यात प्रामुख्याने

(१)सर्वप्रथम घराघरांतून, कुटूंबातील सर्व सदस्यांमध्ये सुसंवाद, वाहतूक नियमांची जागृती निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे, त्यातून, मानसिक शांतता, योग्य-अयोग्याची जाणीव व 'अखंड सावधानता बाळगावी' हा संतांचा संदेश सहजगत्या रूजेल. पर्यायाने वाहन चालविण्यासाठी आवश्यक मनाची एकाग्रता, शारिरीक सुदृढता, प्राप्त होऊन, मोठ्या प्रमाणातील रस्ते अपघात सहज टाळता येतील.

(२)किशोरवयीन विद्यार्थी, पालक, सर्व प्रकारचे वाहन चालक, व गाडी मालकांसाठी, विविध शासकीय यंत्रणा, डॉक्टर, मानसोपचार तज्ञ, वाहतूक अभियंते, वाहतूक अभ्यासक यांचा समन्वय करून सर्व प्रकारच्या वाहतून समस्यांवर प्रभावी समुपदेशन करणाऱ्या कार्यशाळांचे सातत्याने आयोजनातून 'सजग' असे समाजमन तयार व्हावे.



(३)संगणकावरील दुचाकी वाहनांच्या खेळांवर पूर्णपणे बंदी, कारण यातूनच लहानपणी 'स्पीडचा थरार' अनुभवायची भावना नकळत वाढीस लागते.

(४)टी.व्ही.वरील दुचाकी / चारचाकी वाहनांच्या अतिरंजीत जाहिरातीवर संपूर्णपणे बंदी, कारण यातून थ्रील्सची भावना (उदा. गाड्यांवर थ्रीसिक्स्टी, विली इ.) वाढीस लागते.

(५)सर्व पालकांनी आपल्या किशोरवयीन मुलांजवळ आता वाहन चालवण्याचा परवाना आहे म्हणून 'डॅड्ज किंवा मॉम्ज गिफ्ट' या क्षणिक भूरळ घालणाऱ्या संकल्पनेतून बाहेर पडून, मुलगा वाहन निश्चितपणे पूर्ण जबाबदारीने चालवू शकतो का याची खात्री केल्याशिवाय खऱ्या गरजेव्यतिरिक्त मुलांना वाहन अजिबात उपलब्ध करून देऊच नये.

(६)अगदी वाहनाचे इंजीन ते आरशापर्यंत १०० टक्के सुरक्षित असलेलेच वाहन, कानाला कुठल्याही प्रकारचा इयर फोन न लावता नियमाप्रमाणेच चालवावे.

(७)कामाचे स्वरूप, प्रवासाचे अंतर, लागणारा वेळ, यांचे सुयोग्य नियोजन असल्यास, वेळ, श्रम व पैशाच्या बचतीसोबतच अनावश्यक वाहतुक घनता कमी होईल व जीवही सुरक्षित राहील.

(८)रस्ते सुस्थितीत लेन मार्किंगसह, सुरक्षित अंतरावरूनाच ठळकपणे लक्षात येतील अशी सिग्नल यंत्रणा, सूचना फलक, रिफ्लेक्टर्स असावे व त्या सर्व बाबींची रस्त्यांसोबतच नियमित कालमर्यादेत तपासणी करणारी यंत्रणा असावी. गतीरोधक विहीत मापदंडाप्रमाणेच असावे, रस्त्यांच्या दुरूस्ती / बांधकामाचे साहित्य रस्त्यावर विखुरलेले नसावे.

(९)शासनाने विशेष अधिकार असलेले जबाबदार 'वाहतुक गुप्तचर' नेमावे आणि अशी वाहतूक गुप्तचर यंत्रणा कार्यान्वित झाल्याचे जाहीर केल्यानेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करण्याची प्रवृत्ती बळावणाऱ्या युवावर्गात आवश्यक धाक निर्माण होईल. (या संबंधीचे कार्यान्चयनाचा कृती आराखडा तयार असून विस्तारभयास्तव नमूद करणे शक्य नाही)

या १ ते ९ उपायातूनच किमान ७५ ते ८० टक्के अपघात टाळले जातील हे नक्की!

(१०)प्रत्येक चारचाकी वाहनासोबत २ फूट लांबी रूंदीचे चौरस लाल / पिवळे रिफ्लेक्टर्सचे हलके उभे फलक असण्याची सक्ती करावी. जेणेकरून, भर रस्त्यात रात्रीच्या वेळी वाहन बिघडल्यास हे फलक दोन्ही बाजुला ईशारा म्हणून कामी येतील व अनेक अपघात टाळले जातील. तसेच महामार्गावर असलेली दारू दुकाने हटवून व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या वाहन चालविणाऱ्यांविरूध्द सक्त कारवाई व्हावी.

(११)महामार्गावर वाहन चालकांसाठी केवळ अपघातासंबंधीचे नव्हे तर इतरही आपतकालीन वैद्यकीय निकडीसाठी देखिल जुजबी सोई असलेल्या चल चिकीत्सालयाची सोय असावी.

वर नमूद या सर्व ११ उपायांतून मोठ्या प्रमाणात रस्ते अपघात टाळता येतील. पर्यायानी रस्ते अपघातातून होणारी मोठ्या प्रमाणातील जीवित व वित्त हानी टळून, आपला भारत देश एक सशक्त तरूणांचा देश म्हणून उभा राहील यात शंकाच नाही. तो सुदिन लवकरच येईल अशी आशा बाळगू या! म्हणून

रस्ते अपघात टाळण्यासाठी, नियमांचा आग्रह तुम्ही धरा।

कारण, तुमच्याही सुरक्षेचा, यातच, मार्ग आहे खरा!

## ठळक बातम्या

एक वकील महाशय आपला चष्मा घरी विसरले त्यामुळे ट्रेनमधील एका सहप्रवाशास त्याने सांगितले, माझ्याकडील पेपरमधील ठळक बातम्या मला वाचून सांगाल काय!

सहप्रवासी - मी सुध्दा अशिक्षित आहे पण मी तुमच्यासारखा पेपर घेऊन शो नाही करत.

**संकलन** : - किशोर नारायण श्रीवर्धनकर


*With Best Compliments From :*

**Senator Motors Pvt. Ltd.**



# रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात

अंजली बापट

ह्या आधुनिक / भौतिक काळांत लोकसंख्या वाढली. दळणवळण वाढले, छोट्या रस्त्यांपासून महामार्गापर्यंत वाहनांची ये-जा वाढली. पूर्वी डोंगरी रस्ते, पायवाट, उंट घोडा यावरून वाहतूक होत असे पुढे बैलगाडी, मोटार आली. तेव्हा सुरक्षा हा विषय फारसा महत्वाचा वाटत नसे. तसेच लोकही विशेष प्रवास करीत नसत, त्यामुळे एखाद् दुसरा अपघात होत असे.

हल्ली वर्तमानपत्रांत रोजच अपघाताची बातमी वाचतो. बस नदीत कोसळली, ट्रकने धडक देऊन रिक्षा उलटी झाली, रस्त्याच्या कडेला टँकर पडला, परिणामी निष्पाप लोक मारले जातात. काही गंभीर जखमी तर काही कायमचे अपंग होतात. वाहनांची मोडतोड, निकामी होतात. आपल्या जवळचे किंवा नातेवाईक असतील तर जीव अधिकच हळहळतो. दुःखी होतो. म्हणूनच आता हा प्रश्न ऐरणीवर आला. गेल्या वर्षी (२०११) सुरक्षा अभियानाच्या अहवालानुसार, १३ हजार मृत्यू झाले राज्यांत! २४ हजार गंभीर जखमी, कित्येक कोटी वित्तहानी झाली. जनता व सरकार खडबडून जागे झाले.



ह्याची कारणे अनेक आहेत. काही मानवी चुकांमुळे (७५%) काही नैसर्गिक (७%) काही अन्य (१८%) असा अहवाल प्रसिध्द झाला. ही झाली छाननी ती कारणे कोणती? त्याचे स्वरूप, परिणाम, त्याचे उपाय पाहू.

**प्रथम मानवी चुका:** कारमध्ये बसून केळी फळे खाऊन साले कचरा बाहेर फेकायची बेदिक्कत! त्यावरून पाय घसरतात, गुरे ढोरे खाण्यासाठी येतात ते टाळण्यासाठी काही वेळा अपघात होतात. हे महित आहे पण लक्षांत कोण घेतो? नागरिकांनी आपल्या वाहनांत कचऱ्यांसाठी पिशवी ठेवावी. कचरा कुंडी दिसली की त्यांत टाकावे हे बंधन इतर देशांत काटेकोरपणे पाळले जाते. आपण का नाही!

२)ट्रक मधून किंवा गाडीवरून लोखंडी पट्टया सळ्या नेणेः आमच्या शेजारचे सुधाकरराव २००८ साली त्यांच्या टेम्पोला मागून सळ्या नेणाऱ्या ट्रकने धडक दिली. त्यांच्या शरिरातून आरपार सळ्या गेल्या. हृदयद्रावक प्रसंग सुनिलने प्रत्यक्ष त्यांच्या मुलाने पाहिला. अजूनही तो सावरला नाही. त्या सळ्यांना कपडा, प्लास्टिक बांधावे, फोल्ड किंवा उभ्या ठेवाव्या संभाव्य धोका टाळण्यासाठी जड वाहनांचे नियम पाळावेत.

३)रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गाड्या लावणेः मग चालायचे कसे? गेल्याच आठवड्यांत भरधाव येणाऱ्या स्कूटरने बंडूला उडवले. त्याला बाजूला व्हायला जागाच नाही. यांना अशा गाड्या लावल्या की कडक शासन करावे. मोठ्या प्रमाणांत दंड असावा, म्हणजे यास प्रतिबंध होईल.

४)फूटपाथ पादचाऱ्यांसाठी असतो. पण तेथे भाजीवाल्या, फेरीवाले रात्री झोपण्यासाठी उपयोग केला जातो. मग गर्दीतून जनतेने चालायचे कसे? मागच्या महिन्यांत फूटपाथवर झोपलेल्या माणसावर एका धनिकाने गाडी घातली चूक दोघांची. (कधी गप्पा मारताना तर धुंदीत!) कटाक्षाने पद्पथ मोकळे ठेवावे, संबंधितांनी ताबडतोब करावी कारवाई -शिक्षा.

५) रस्त्यावरील कचराकुंड्या भरून वाहतात मग गुरे-ढोरे-कुत्रे, डुकरे, कचरा गोळा करणारी माणसे त्यामुळे अर्धा रस्ता त्यांत. उरलेल्या रस्त्यावरून चालताना वाहन टाळताना, जनतेला कसरत करावी लागते. मागच्याच शनिवारी आजोबांचा हात सुटला अन् रिक्षाच्या धडकेने खाली पडले, पाय मोडला. यासाठी कचराकुंड्या मेनरोडवर नसून कोपऱ्यांत ठेवाव्यात. वेळच्यावेळी कचरा उचलावा, त्याला झाकण असावे. नागरिकांनी खाली न टाकता कचरा कुंडीतच टाकावा म्हणजे पादचाऱ्यांना चालताना अडथळा न होता अपघात टळतील.



६) रस्त्यावर किंवा पदपथांवर सकाळी पेपरवाले, दुधाचे कॅन, पानाचे ठेले, मोची, पोहोचवायला येणारी वाहने यामुळे शालेय मुलांना हे सर्व दिव्य पार करुन शाळेत जाताना दमछाक होते. नातवाला पोचवायला आलेल्या आजोबांच्या पायावरुन रिक्षेचे चाक जाऊन पायाला दुखापत होते. त्यासाठी हे सर्व मेन रोडच्या जवळील गल्लीत असावे संभाव्य अपघात टाळावे.

७) मद्यपान करुन ड्रायव्हिंग करणे- निरपराध माणसांचा मृत्यू हे तर नित्याचेच!

८) भरधाव डंपरची धडक! काहीही चूक नसताना अतिशय शिस्तप्रिय नेमस्त श्रीकांतचा २०१० ला माणगावला अपघात झाला. कसा? तो सरळ गाडी चालवत होता, पत्नी म्हणाली. डंपरच्या धडकेने तो व मावशी जागीच खलास. वेगावर नियंत्रण नाही. प्रथम डंपरच्या चालकाने कबूल केले नंतर सपशेल नकार दिला, याला जबाबदार कोण? त्यासाठी त्यांचा वेग किती होता? त्यांना जुने रेकॉर्ड वरुन चेक करता येईल व तपास लावणे शक्य होईल व त्यांना न्याय मिळेल.

९) जादा सामान किंवा वाजवीपेक्षा जास्त गाडीत प्रवासी, विवाह किंवा तीर्थक्षेत्राहून परत येताना गाडी उलटणे. ही बातमी चार दोन दिवसांनी वाचतो, ऐकतो. यासाठी कडक नियमांची अंमलबजावणी तसेच संबंधीत जनतेने त्याची काळजी घेणे आवश्यक.

१०) काल अरुणचे असेच झाले, चालता बोलता (मोबाईलवर) गेला ट्रकखाली! जसे ड्रगीस्ट तसेच हल्ली चुन्याच्या डबी सारखी मोबाईलस्ट झाले. कोणाचेही ऐकत नाही. व्यसनासारखे त्याचे अधिन झाले. तो आणि गाडी रसातळाला! ड्रायव्हिंग करता करता कानाखाली मोबाईलवर बोलणे. त्याचा जीव सगळा कानांत मग चक्रधारीचा हात सुटतो. मग धडक, नाहीतर खड्ड्यात. हे टाळण्यासाठी गाडी सुरक्षित ठिकाणी थांबवून दोन मिनिट बोलावे. दोन मिनिटांसाठी जीवाला मुकणे टळेल. ड्रायव्हिंग करताना मोबाईलवर बोलू नका अन् बहु मोल जीवाला मुकू नका.

११) स्पर्धा पुढे जाण्याची त्यात वेगाचे भान रहात नाही. जायला रस्ता आहे की नाही, आपण सहज त्याचे पुढे जाऊ या कल्पनेने गाडी पुढे न्यायची आणि मग आदळते गाडीवर गाडी नाहीतर खड्ड्यात पडते. असा एकही दिवस जात नाही की, प्रवास करताना वाटेत, दरीत, रस्त्याच्या वळणाला वाहन कोसळलेले नाही. नको स्पर्धा वेगावर नियंत्रण, नको मृत्यूला आमंत्रण.

१२) २००१ ला मी अमेरिकेत गेले होते पोर्टलॅन्ड ते

फिनिक्स प्लेनने व पुढे कारने. कार वेगात, रस्ते स्वच्छ गुळगुळीत. कोठेही पोलीस नव्हता फक्त वेगाचे बोर्ड ६०, ८० वगैरे गाडी स्पीडमध्ये. मध्येच अचानक थांबली. ८० चा बोर्ड असताना १०० ने जात होती कॅमेऱ्याने टिपले, १०० डॉलर फाईनची पावती हातात. दुसरे दिवशी कोर्टात रवाना. नाहीतर आपल्याकडे चिरीमीरी देवून सुटतात. आवरा मनाचा आवेग नाहीतर दंड देईल वेग!

म्हणूनच म्हणावेसे वाटते जागोजागी कॅमेरे बसवावेत त्यामुळे कोण व्यसनी? कोण स्पर्धा करीत आहे? वेगाच्या बोर्डाप्रमाणे गाडीचा वेग आहे का? कचरा कोण फेकते, गाडीत सळ्या किंवा रासायनिक टँकर आहे का? वाजवीपेक्षा जास्त सामान किंवा प्रवासी आहेत का? वगैरे सर्व गोष्टीचा तपास लगेच होईल व त्याचा न्याय निवाडा होऊन दंड किंवा शिक्षा करता येईल.



१३) पावसाळ्यात रेनीसिझनला संदिप ट्रीपला गेला. रात्रभर मद्यपान व जागरण. पहाटे झिंग झोपेतच ड्रायव्हींगवरील ताबा सुटला. चक्रधारीकडून पुलाचा कठडा तोडून जीप नदीत. काही वेळा घरी भांडण, काही वेळा कोणाच्या निधनामुळे दुःखी मानसिकता अशा वेळी ड्रायव्हिंग न करता संभाव्य अपघात टाळता येईल.

१४) महापुरषांच्या जयंत्या, महानिर्वाण दिन आसतात. तेव्हा वाहतुकीचे नियम डावतले जातात. माणसं टपावर बसून येतात. जास्त येतात तेव्हा त्या गाड्या वेळीच थाबवून संभाव्य अपघात टाळावेत.

हे चौदा सुत्री कलम म्हणजे अपघात टाळण्याचे रामबाण मलम!

२) नैसर्गिक १) पावसाळ्यांत डोंगर कोसळणे (कोकण), अतिवृष्टी मुळे पूर, भूकंप यासाठी संबधीत खात्यांची वेगळी सुसज्ज यंत्रणा हवी. ट्रॅफीक जाम न होता, वाहनांची पळापळ, स्पर्धा न होता अपघात टळतील

२) झाडे पडणे, रस्त्याच्या कडेवरील वृक्षांची पावसाळ्यापूर्वी झाटणी करावी.

३) ओव्हर हेड वायर तुटणे, सोसाट्याचा वारा वादळ किंवा त्या वायरींची क्षमता संपलेली असेल तर नियमित दुरुस्ती करावी. दरवर्षी अंगावर झाड किंवा वायर पडून मृत्यू होतात. हे सर्व टाळण्यासाठी संबंधित खात्याशी समन्वयाने कामे करुन रस्ते अपघात असे टाळता येतील.

३) काही अन्य महत्वाची कारणे- स्पीड ब्रेकर व झेब्रा क्रॉसिंग ह्या दोघांचा उपयोग वाहन आणि जनता करताना दिसत नाही. पाश्चात्य देशात प्रथम रस्ता जनतेचा माणस उभी असतील तर गाडी थांबते. ड्रायव्हर खुणेने जाण्यास सांगतो. हे आपल्याकडे होईल का! याला बरीच वर्ष झाली. दुपारची वेळ होती. धोब्याचा १०/१२ वर्णाचा मुलगा डोक्यावर कपड्याचे गाठोडे घेऊन झेब्रा क्रॉसिंग करीत होता पण त्याचे दुर्दैव. भरधाव टॅक्सीने त्याला उडवले म्हाताऱ्या धोब्याला संध्याकाळी उशिर कळले. पण तो झेब्रा क्रॉसिंगमधून जात असल्यामुळे टॅक्सीवाल्याला दंड झाला. म्हाताऱ्याचा मुलगा गेला. न्याय व काही पैसे मिळाले. सांगायचं एवढंच रहदारीचे नियम पाळू या.

२) रस्त्यांची उडालेली दैना हे अपघात होण्याचे

प्रमुख कारण. दुचाकी, चार चाकीवाले खड्डे चुकवता चुकवता त्यातच पडतात. जेष्ठ अपंग, शाळकरी मुले हमखास याला बळी पडतात. नगरपालिकेने छोटा खड्डा पडला की लगेचच दुरुस्त करावी. पण ते नाही दोन चार मोठे खड्डे, चार एक अपघात झाले की मग त्यांची यंत्रणा येते.

३) काही रस्ते अरुंद, शहरीकरणामुळे वाढती लोकसंख्या व वाढत्या वाहनांना ते अपुरे पडतात. अतिक्रमण, झोपडपट्टी, सोसायट्या रस्त्याची जागा आत ते प्रथम उठवावे. संबंधितांना विश्वासात घेऊन नाहीतर चार चार वर्ष कंपाऊंड पाडलेले तसेच कोर्ट कचेऱ्या चालू. ट्रॅफिक जाम अर्धवट काम. अपघात होतात.

४) **ड्रेनजची झाकणे** - बदलापूरला गण्या, कामवालीचा मुलगा त्यात पडला. कळेपर्यंत गुदमरुन मेला वेळीच खबरदारी घेऊन दुरुस्ती करावी.

५) वळणावर बोर्ड तसेच ॲटोमेटिक सायरन बसवावे धोक्याची सूचना मिळून अपघात टळेल

६) हायवेवर गाडी थांबविणे मनाई असून थांबतात.

७) काही समाजकंटक रस्त्याच्या कडेला मुद्दामचा खिळे, टोकेरी दगड टाकतात. गाडी सहज हायवेवरुन कडेला लावली जाते. दोनच दिवसांपूर्वी चिपळूणहून येताना अनुभव आला. विशेष म्हणजे जवळच दुरुस्तीचे दुकान.

८) दरी जवळचे किंवा पुलाजवळचे, वळणावरचे कठडे तुटलेले. अपघातानंतर तसेच असतात मग परत अपघात. वेळीच नविन बांधावेत.

एवढच, जनता सुरक्षा आणि वाहतुक व्यवस्था यांनी एकमेका सहाय्य करु! अवघे धरु सुपंथ! या सुविचाराप्रमाणे वागल्यास प्रत्यक्ष आचरणांत आणल्यास अपघातांना नक्कीच प्रतिबंध होईल.

**नको प्राणहानी, नको वित्तहानी**
**नको गंभीर जखमा, नको अपंगत्व**
**वाहतुकीचे नियम पाळू या।**
**रस्ते अपघात टाळू या।।**


***With Best Compliments From :***
**Mastan**
9820288339

**Surinder Obhan**

AUTO CONSULTANT
& INSURANCE AGENT

Off,: A-1007, 1st Floor, Bima Complex, Steel Yard, Kalamboli, Panvel.
Ph.: 27422969

Bldg. 5/209, 2nd Floor, Punjabi Colony, G.T.B. Nagar, Sion, Mumbai - 400 037


## रस्त्यांचे राजकारण

**राम** :- काय रे शाम, तुमच्या गावातले रस्ते कसे चकचकीत, स्वच्छ, सुंदर आहेत आणि शेजारच्या गावातले रस्ते बघवत नाहीत एवढे घाणेरडे आणि अस्वच्छ आहेत. काय असेल याचे कारण ?

**शाम** :- राम, कारण सोपे आहे आमच्या गावात सत्ताधारी पक्षाचा आमदार रहातो तर शेजारच्या गावात विरोधी पक्षाचा कळला. अरे बाबा, रस्त्यावरून, रस्त्यासाठी राजकारण करणारी मंडळी आपल्या देशात आहे हे विसरू नकोस.

संकनल :- सुरेष गोविंद देहेरकर



# रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात

रमेश विठ्ठल मोरे.

**खुदा ने चाहा तो मंजिल तक पहुंचा दुँगा**
**और आँख लग गयी तो...**
**माँ कसम खुदा से ही मिला दुँगा।।**

पहाटेच्या वेळी शिर्डीला जाणाऱ्या एस.टी.ला अपघात होऊन चार प्रवासी मृत्यू पावले व दहाजण जखमी झाले. कारण चालकाने विश्रांती न घेता गाडी चालवित असताना त्याला झोप अनावर झाली व गाडीवरचा ताबा सुटला व अपघात घडला, जर चालकाने झोप पूर्ण केली असती किंवा १० ते १५ मिनिटे आराम केला असता, तर अपघात टळला असता.

**धोका ओळखा अपघाताचा,**
**गाडीवर नियंत्रण ठेवा योग्यतेचा,**
**जीवन आहे अनमोल,**
**करू नका, मातीमोल.**

आपल्याला अपघाताविषयी रोज ऐकायला व वाचायला मिळते. रस्त्यावर टँकर उलटून आग पेटली, सिनेनट तसेच श्रीमंताची मुले रात्रभर पबमध्ये नशापाणी व डांन्स करून नशेमध्ये गाडी वेगाने चालविताना रात्री बंदोबस्तला असणाऱ्या हवालदारांना गाडीने उडवून एक हवालदार ठार झाला. तर दुसरा जखमी, किंवा गाडीवरचा ताबा सुटून फुटपाथवरच्या झोपडीत घुसून दोन लहान मुले व आजी आजोबा मोठ्या प्रमाणात जखमी झाले व दोन तरूण झोपेत ठार झाले. इ.

आपला भारत देश प्रगतीपथावर आहे आणि देशाची प्रगती दळणवळण साधनावर अवलंबून असते. आपण जास्त-प्रमाणात रस्ता वाहतूक साधनांचा वापर करतो. आपले रस्ते शहरापासून खेड्यापर्यंत पसरले आहेत. त्यामुळे प्रवाशांची व मालवाहतूक जलदगतीने देशाच्या कानाकोपऱ्यांपर्यंत पोहचते. परंतु आपल्या देशात वर्षभरात होणाऱ्या दुर्घटनांमध्ये रस्ते अपघातांची संख्या जास्त आहे. सरासरी वर्षाला साठ हजार ते ऐंशी हजार व्यक्ती मृत्यूमुखी पडतात. ५ ते ६ करोडपेक्षा जास्त वाहने रस्त्यावर ये-जा करीत असतात. लाखो लोक



अपंग होतात. याला कारण चालकाचा बेजबाबदार पणा, उदासीनता, नशापाणी, गाडी चालविण्याचे योग्य ज्ञान नसणे. व वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन न करणे.

**होवू नये दुर्घटनांचे भक्ष्य।**
**गाडी चालविताना सदा रहा दक्ष।।**

पुढील नियमाचे काटेकोरपणे वापर केल्यास मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाण कमी होवू शकते.

१)वाहतुकीसाठी रस्ते चांगल्या प्रतिचे असावे, रस्त्यावर मोठे खड्डे नसावे. सिग्नल यंत्रणा चालू स्थितीत व चालकाला दुरून दिसतील असे असावे. वाहतुकीच्या नियमांचे व खुणांचे बोर्ड दिवसा व रात्री

स्पष्ट दिसतील अशा जागी लावणे, वाहन चालकाने सुरक्षा पुर्वक, समजदारीने व कुशलता, एकाग्रतेने गाडी चालविली पाहिजे.

२)गाडी चालविण्यापूर्वी हवा, पाणी, पट्रोल यांची योग्य नोंद घेणे, स्टेपनी होज पाईप, टुलबॉक्स, फस्टेड बॉक्स, गाडीत ठेवणे गाडीमध्ये जास्त सामान किंवा प्रवासी घेवू नये. गाडीच्या क्षमतेएवढेच सामान घेणे. सामान योग्यप्रकारे ठेवून गच्च बांधला आहे की नाही ते पहाणे.

३)गाडी चालविताना चालक, चिंताग्रस्त, आजारी व नशापाणी केलेला नसावा. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, की दुसरा चालक आंधळा, बहिरा व बेजबाबदार आहे तेव्हा स्वत:ला, त्याला व रस्त्यावरील लोकांना वाचविणे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे अपघातात होणारे हजारो परिवार नष्ट होणार नाहीत. शेकडो महिला विधवा होणार नाहीत व लाखो मुले अनाथ होण्यापासून वाचतील.



४)चालकाच्या दोन्ही बाजुचे आरसे योग्य प्रकारे लावले पाहिजेत, त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनांची हालचाल त्याला समजेल.

५)गाडीच्या पाठीमागे लालदिवा, हेडलाईट, पाठीपुढील नंबरप्लेट योग्य प्रकारे लावली पाहिजे.

६)गाडीच्या पुढील दोन्ही बाजूला कोपऱ्यात पांढऱ्या रंगाचे व पाठीमागील दोन्ही बाजुला लाल रंगाचे रिफ्लेक्टर लावणे जरूरीचे आहे.

७)गाडी चालवितांना दोनही गाड्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवले पाहिजे, कारण आचानक पुढील गाडी थांबली तर पाठच्या चालकाला गाडी सुरक्षित थांबविणे शक्य होईल. व अपघात टाळता येईल. खाली गाडी थांबवण्यासाठी अंतर जास्त लागते. कारण तिची रस्त्यावरची पकड कमजोर असते.

८)चालकाच्या कॅबिनमध्ये प्रवासी बसवू नयेत व भारी सामान ठेवू नये. त्यामुळे गाडी चालविताना त्याला त्रास होणार नाही.

९)उतरणीच्या प्रवासात गाडी न्युट्रलमध्ये चालवू नये.

१०)वळणावर गाडीचा स्पीड कमी करणे व अचानक ब्रेक लावू नये, गाडी उलटी होण्याचा संभव असतो.

११)गाडी चालविताना दोन्ही हात स्टेअरिंगव्हील वर पाहिजेत.

१२)हायवे रोडला दिलेल्या मार्गातूनच जाणे, लेन बदलायची असेल तर प्रथम सिग्नल देणे.

१३)ऑइल पाईप, एअर पाईप या डिझेल पाईपची गळती असेल तर गाडी चालवू नये.

१४)रस्त्यामध्ये गाडीत बिघाड झाल्यास हँड-ब्रेकचा वापर करून ती रस्त्याच्या समांतर उभी करून टायरच्या दोन्ही बाजूला दगडाचा आधार देणे व गाडी दुरूस्त झाल्यावर ते दगड रस्त्यात न ठेवता बाजुला फेकून देणे. नाहीतर दुसऱ्या गाड्या दगडावर आपटून अपघात होण्याचा संभव असतो.

१५)उन्हाळ्यात उष्णतेमुळे रस्त्यावरील डांबर वितळते. तेंव्हा गाडी कमी वेगाने चालवा. त्यामुळे गाडी घसरणार नाही व अपघात टळतो.

१६)गाडी पुढे मागे करताना क्लिनरची मदत घ्यावी. आरसा व लाईट सिग्नलचा वापर करा.

१७)रेल्वे फाटक ओलांडतांना सावधानने व हुशारीने गाडी चालविणे.

१८)ओव्हरटेक करताना हेडलाईट वरती खाली करून पुढील गाडीवाल्यास सावधान करणे व रस्ता खाली असताना सुरक्षितपणे ओव्हरटेक करणे.

१९)झेब्रा क्रॉसिंगवरून लोक जात असतील तर गाडी थांबविणे, त्याचप्रमाणे आंधळे व लहान मुले रस्ता पार करीत असताना गाडी थांबविणे, त्यामुळे अपघात टळतो.

२०)गाडीमध्ये आग प्रतिबंधक सिलेंडर ठेवावे त्यामुळे आग लवकरात लवकर अटोक्यात येईल व मोठे नुकसान होणार नाही.

माणसाचे जीवन एका पेटत्या मेणबत्तीसारखे आहे, ती आपल्याला चारी दिशाला प्रकाशमय करते. परंतु वाऱ्याच्या एका झोक्यामुळे ती विझते. तसेच रस्त्यावरील एका क्षुल्लक चुकीमुळे माणसाच्या जीवनात अंधार पसरतो.

वेगाच्या ओघात, वाहतुकीच्या नियमाला दया साथ ।
दक्षतेने करू होणाऱ्या अपघातावर मात।।


*With Best Compliments From :*

**HARI OM**

R.T.O. CONSULTATANTS

We deal with all sorts of R.T.O.
Works for Navi Mumbai & Thane.




**Mr. Vicky Sejpal**
**Cell. :** 9773196811, 9821777971
**Mr. Piyush Sejpal**
**Cell. :** 9323912312

A.P.M.C.Market II, "T" Bloc, 1st Floor, Off - T -26, Near Vashi R.T.O. Off., Vashi, Navi Mumbai - 400 703



*With Best Compliments From :*



**Sai Point Automobiles Pvt. Ltd.**

# रस्ते अपघात आणि माझी भूमिका

**घनश्याम बाळू शेंडगे**

'सुरक्षा सर्वांसाठी, सुरक्षेसाठी सर्व' हा मंत्र सर्वांनी जपायला हवा, असे **डॉ. विलास पवार** संपादक **सुरक्षा अभियान** यांनी व्यक्त केले आहे. घराच्या बाहेर पडताक्षणी हा मंत्र सर्वांनी ध्यानी ठेवावा व त्याचे पालन करावे असे वाटते. आता रस्ते अपघात होतात त्याची कारणे असंख्य आहेत. हे सर्वांनाच ठाऊक आहे. अपघात म्हणजे Accident होय. यामध्ये विविध प्रकार आहेत. चालता-चालता ठेच लागुन सहजपणे अपघात होतात हे पाहिले आहे. स्टेजवर भाषण करतांना अचानक स्टेज कोसळते, शॉर्टसर्कीट होतात. अचानक धूर निघतो इत्यादी इत्यादी परंतु रस्त्यात अपघात होतात ते वाहनचालकांच्या हलगर्जीपणामुळे किंवा वाहनांच्या दोषामुळे होतात. अपघात होण्यास विविध कारणे आहेत. परंतु यावर उपाय काय? रस्ते अपघात कसे टाळले जाऊ शकतात, ते सविस्तर पाहू.



यावर उपाय म्हणजे सर्वांनी नियमांचे पालन करणे.

१) रस्ता ओलांडण्याचे नियम पाळावेत अपघात होऊ नये हे महत्वाचे आहे. अपघात टाळले जाऊ शकतात हे सुध्दा वाहनचालकांनी ध्यानीमनी घ्यावे. वाहनातील इंधनात जी शक्ती आहे, त्या शक्तीचा वापर मनावर ताबा ठेऊनच करावा. मनाचा ब्रेक सर्वोत्तम ब्रेक हे त्याचेच घोतक आहे. याचबरोबर संस्कार महत्वाचे आहेत. आई-वडिलांनी, गुरुजनांनी जे संस्कार आपल्यावर केले आहेत, त्या संस्कारांची जोपासना करावी. हे महत्वाचे आहे. लहानपणी आपल्या छकुलीस शाळेत घेऊन जातांना छकुलीचे दप्तर आई स्वतः आपल्या खांद्यावर घेते. छकुलीचा हात आपल्या हातात घट्ट धरुन रस्त्याच्या बाजु बाजुने चालत जाते. रस्ता ओलांडतांना छकुलीस झेब्रा पट्टे दाखवित. झेब्रा पट्टे क्रॉस करतांना, सर्वप्रथम उजव्या बाजुस पहावे ते शिकविते. हे बघ! छकुली आपणास रस्ता क्रॉस करतांना सर्वप्रथम आपण झेब्राक्रॉस पट्ट्यावरुनच रस्ता ओलांडायचा असतो. त्यापूर्वी आपण उभे आहे तिथून प्रथम उजव्या बाजुस पहायचे. वाहन येत असेल तर थांबायचे. एक, दोन, तीन अशी सगळी वाहाने जाईपर्यंत थांबायचे. रस्ता मोकळा दिसताक्षणी रस्ता ओलांडतांना, पुन्हा डाव्या बाजुने वाहन येत आहे का पहायचे. वाहन येत नाही असे दिसते, तरच रस्ता ओलांडायचा. वाहन येत असेल तर तिथेच थांबायचे. हालचाल अजिबात करायची नाही. आईने पकडलेला हात सोडायचा नाही. वाहने गेल्यानंतर रस्ता ओलांडायचा. ही शिकवण थोरपणी आम्ही विसरतो. व घाईघाईने उजव्या-डाव्या बाजुला न बघता झेब्रा पट्टा न बघता घाई - घाईने धडाधड उड्या मारुन वाहनाला आडवे पडतो. त्यामध्ये वाहन चालकाचा दोष म्हणून वाहनचालकास मारहाण होते. कोर्ट केसेस कराव्या लागतात. हे टाळायचे असेल तर आम्हा बालकांवर जे संस्कार झाले त्याचे आचरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

२) वाहनांची काळजी, निगा राखण्यात दक्ष रहावे लहान मुलांना सायकल, घड्याळाचे आकर्षण खुप असते. त्याच्या वाढदिवसाला मामा सायकल

वाढदिवसाची भेट म्हणून देतो. भाचा सुध्दा खूष होतो. मामा- भाचेचे प्रेम वर्णन करावे तेवढे कमीच अशा भाच्याचे लाड करण्यात त्याचे आई - वडिलही पटाईत असतात. मामाने दिलेल्या सायकलमध्ये हवा भरण्यास मात्र वडिलांना आळस असतो. त्यामुळे घराच्या एका कोपऱ्यात मामाची सायकल धुळ खात पडलेली असते. कधी कधी मामा, भाच्याला भेटायला येतो त्यावेळी, त्या धूळ खात पडलेल्या सायकलची साफ-सफाई, हवा, तेलपाणी मामा करुन देतो. त्यामुळे भाचेमंडळी खूष होतात. पुन्हा सायकल रस्त्यावर येते. बाबांना मात्र आपल्या छकुल्यास घेऊन बाईकवरुन रपेट मारण्याची भारी हौस असते. बाईकच्या टाकीवर बसवून दोन आरशांना दोन हातांनी घट्ट पकडण्यास सांगण्याची हौस असते. डोळ्यावर काळा, लाल गॉगल, डोक्यावर बाबा-टोपी, अंगात जॅकेट, पायात लाल बुट, काळे सॉक्स घालुन ऐटित बाईकवर बसवून रपेट मारण्याची हौस असते. मात्र स्वतःच्या बाईककडे दुर्लक्ष, साफ सफाई नाही, आरसा अस्वच्छ, कित्येक महिन्यात पाण्याचा स्पर्श नाही. चाकातील हवा तपासली नाही. साईड सिग्नलचे चेकअप नाही. मागील-पुढील लाईट चालतात की नाही याकडे दुर्लक्ष, ब्रेकला ऑईल नाही. केवळ कीक मारणे, कापड मारणे, सिटची सफाई बस्स! एवढे झाले की सरळ पेट्रोलपंपावर जाऊन टाकीत पेट्रोल टाकणे. बाकी गाडीचे पेपर्स कुठे कसे आहेत याची तपासणी नाही. रस्त्यावरुन भरधाव गाडी चालवितांना समोर बसलेल्या छकुल्याला धुळीचा त्रास झाला त्याला भोवळ आली व त्याचक्षणी तो बाबाच्या उजव्या हातावर कोसळला. अचानक पिवळा सिग्नल क्रॉस केल्या केल्या वाहतुक पोलिसांनी बाईक साईडला उभी करण्याची ऑर्डर दिली. तात्काळ उलटतपासणी होते. बाईकची दुरावस्था, पेपर्स कुठे आहेत माहित नाही. परिणाम ड्रायव्हिंग लायसन पोलिसाने जप्त केले. कोर्टात हजर रहाण्याचे पेपर्स हातात मिळाले. कोर्टात जाऊन लायसन घ्या! पोलिसाने सूचना दिल्या. कोर्टाची पायरी. छकुल्याच्या सायकलची काळजी मामा घेत होता. साफसफाई करायचा. हवा, तेलपाणी करायचा हे आदर्श कार्य छकुल्याचा बाबा विसरला होता. जे संस्कार आहेत ते विसरले. केवळ साध्या साध्या बाबतीत दुर्लक्ष केल्याने आता छकुल्याचा बाबा कितीतरी कायदे कानुनात अडकून गेला. दिलेल्या तारखेस हजर झाल्याबरोबर तिथली शिस्त वारंवार फेरफटके, हेलपाटे घालुन छकुल्याचे बाबा वैतागले होते. शेवटी कंटाळून बाईक ऐवजी सायकल पसंत केली. आता छकुल्याच्या मामाच्या आदर्शानुसार छकुल्याचे बाबा कार्य करतात. मग आहे की नाही अपघात टाळण्यात संस्कारांचे महत्व!



३) वाहनचालकांनी मोबाईलवर बोलणे टाळावे आम्ही सहकुटुंबियांनी आमच्या छकुलीचा वाढदिवस घरी अगदी थाटामाटात साजरा केला. फुगे, रंगबिरंगी झुरमुळ्या, लाईटिंग, नवीन ड्रेस, सोन्याची चेन, रियल डायमंडची कानातील कुडी, रंगबेरंगी बांगड्या, डोक्यावरील रंगीत पोनी, पिंक कलरची लिपस्टीक, परिच्या हातातील स्टार-स्टीक, जणूकाही स्वर्गातुन परिच आवतरली आहे असे वाटले. रंगीत केक, केक कापण्यासाठी झुपकेदार चाकू. त्याला लाल रंगाची रिबीन बांधलेली. पाच मेणबत्त्या प्रज्वलित केल्या. छकुलीच्या बाबांनी खुप मेहनत घेतली होती. वाढदिवस साजरा करण्यासाठी सर्व वस्तू इंटरनेटवरुन ऑर्डर देऊन घरपोच प्राप्त झाले होते. औक्षण करुन आनंदाने केक कापला गेला. हॉपी बर्थ डे म्हणून सर्वांनी एकाच आवाजात जल्लोष केला. हॉटेलमध्ये जेवण घेण्यासाठी आम्ही चारजण निघालो. छकुलीसाठी मागील दोन सिटच्यामध्ये बेबी सिटर फिट होतेच. त्यामध्ये तिला बसवून आम्ही कारमधून निघालो. गाणी, म्युझीक इ. नी कारमध्ये आवाज धुमू लागला होता. छकुलीचे पप्पा ड्रायव्हिंग करताक्षणी त्यांचा मोबाईल खणखणला. छकुलीच्या बाबांनी मोबाईल हातात घेऊन कानाला लावताक्षणी समोरच्या पोलिसाने गाडीचा नंबर व मोबाईलवर फोटो घेतला व आमच्या गाडीचा पाठलाग करुन आम्हास गाडी रस्त्याच्या बाजूला उभी करण्याची सूचना दिली. कारचा नंबर व छकुलीचे बाबा मोबाईलवर बोलत आहेत असा फोटो दाखविला. त्याचक्षणी आमचा वाढदिवसाचा जो मूड होता त्यावर विरजण पडले.

आता पोलिसी कारवाई. तत्काळ माझे ड्रायव्हिंग लायसन जप्त केले. पावती फाडली. कोर्टात जाऊन ड्रायव्हिंग लायसन घ्यावे असा सल्ला देऊन पोलिस निघुन गेले. इकडे आम्ही कारमध्ये बसुन जवळच असलेल्या उडपी हॉटेलमध्ये नाष्टा वगैरे घेऊन काळवंडलेल्या तोंडाने घरी परत आलो. छकुलीच्या बाबांवर घरच्या लोकांनी प्रश्नांची सरबत्ती सुरु केली. छकुलीचा हसरा चेहरा मावळला होता. दुसऱ्या दिवसापासून सतत १५ दिवस कोर्टाच्या पायऱ्या चढण्यातच घालवले. शेवटी अव्वाच्या सव्वा दंड व समज मिळाली. तेव्हा कुठे ड्रायव्हिंग लायसन्स हाती मिळाले. तिथून पुढे कारमध्ये मोबाईला स्पर्श करायचा नाही असा पणच केला. पोलिसाने वेळीच अडविले नसते तर कदाचीत मी मोबाईलवर बोलत राहिलो असतो. पुढे काहीहि होऊ शकले असते. पोलिसाने व कोर्टाने समज व दंड केल्यानेच आम्ही अपघात टाळू शकलो.



४) हेल्मेट वापरणे अनिवार्य - हेल्मेट वापरणे दुचाकी स्वारास अनिवार्य आहे. तसेच कार चालक व डाव्या सिटच्या सिटरला कार बेल्ट बसवून घेणे अत्यंत आवश्यक आहे. याचे परिणाम ऐकायचे आहेत? तर ऐकूया!

मी व माझा मित्र आम्ही घोडबंदर रोडवरुन ॲक्टीव्हा गाडीने जात होतो. माझ्याकडे इर्टेनो होंडा होती. माझे मित्र ॲक्टीव्हावर होते. मी मात्र नियमानुसार स्कुटर चालवित असे. मी हेल्मेट घातलेले होते. माझे मित्र म्हणाले थोडेच अंतर आहे. कशाला हेल्मेट वापरायचे. फक्त पोलीस कार्यालयासमोरुन पटकन जायचे बस! असे म्हणून माझे मित्र भरकन जाण्यास निघाले. मी पाठीमागेच होतो. अचानकपणे पोलीस कार्यालयातून पांढरा शर्टवाले पोलीस बाहेर रस्त्यावर हजर झाले. त्यांनी माझ्या मित्राला हात दाखविला. त्याबरोबर माझे मित्र गडबडून गेले. व तात्काळ ॲक्टीव्हा रस्त्याच्या बाजुला उभी केली. पोलिसांनी कागदपत्र जप्त केली. सर्व कागदपत्रांची तपासणी केली. P.U.C नाही, ड्रायव्हिंग लायसन कालबाह्य, पत्ता बदललेला नाही, याशिवाय हेल्मेट नाही एकूण १५०० रुपयांचा दंड शिवाय लायसन जप्त. पुन्हा कोर्टकचेरी. मी पामर काही बोलू शकत नव्हतो. कळते पण वळत नाही अशी अवस्था माझ्या मित्राची झाली होती. पुन्हा पुढे थोड्याच अंतरावर एक बाईकधारक अतिवेगाने आमच्या मागून पुढे भर्रर्रकन गेला. व पिवळ्या सिग्नलला धडकून जागीच ठार झाला. हे दृश्य पाहून माझ्या मित्राला भोवळच आली. आम्ही मनात पुटपुटलो, आम्ही सुध्दा हेल्मेट वापरले ते बरे झाले. या गर्दीच्यावेळी कारचालक मागाहून पुढे येत होते. त्यातील पाच कारचालकांनी कारबेल्ट फिट केला नव्हता. हे पोलिसांच्या निदर्शनास आल्याबरोबर त्यांनी मोबाईलद्वारे पटापटा फोटो घेतले व त्यांचे ड्रायव्हिंग लायसन जप्त केले. पुढच्या कारवाईसाठी त्यांना कोर्टात पाठविले. या कारवाईमुळेच आम्हाला हेल्मेटची सवय लागली व भावी होणारे अपघात टळले.

५) R.T.O. कार्यालयांनी वाहन चालकांना वाहन चालविण्याचा परवाना देते वेळी त्यांची परीक्षा घेतली जाते. ती परीक्षा तंतोतंत मार्कांनी पास होणे आवश्यक आहे. वाहन एकाच कीकमध्ये स्टार्ट करणे, वाहन योग्यप्रमाणे स्टँडवर उभे करणे, स्टँडवरुन खाली उतरविणे, क्लचवर हात, ब्रेकवर पाय, एक्सलेटर हाताळणे, लाईटची सोय, साईड लाईट, मागील लाईट, आरसा, वंगण केले आहे. इंजिन ऑईल वेळच्यावेळी चेंज केले आहे. टायरमधील हवा तपासणे, गाडीचे पेपर्स, लायसन सोबत ठेवणे. P.U.C. प्रत्येक ६ महिन्याने तपासणे व दाखला सोबत ठेवणे. वेगमर्यादा ३० ते ४० ठेवणे जड वाहनापासून दूर रहाणे. जड वाहनांवरील सूचना वाचणे. त्यानुसार आपल्यात बदल करणे. जड वाहनांचे सिग्नल पहाणे. रिक्षाचालकाकडे लक्ष देणे. अचानकपणे रिक्षा वळते. म्हणून रिक्षाकडे लक्ष देणे, उजव्याबाजुला रिक्षा वळवितांना रिक्षावाले छोटासा हात बाहेर काढतात व अचानक रिक्षा वळवितात; म्हणून रिक्षाच्या हालचालीवर लक्ष देणे

मागील वाहनचालक हॉर्न वाजवितो. तो का वाजवितो, आपले काही चुकले आहे असा संदेश तो देत असतो. अशावेळी त्याच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्याला बाजू देऊन पुढे जाण्याचे संदेश द्यावेत. रस्त्याचे सर्व सिग्नल सारखे पिवळे रंग दाखवितात, त्यावेळी इकडे-तिकडे समोर, बाजुला पाहून वाहन चालविण्याचे संकेत असतात त्याची काळजी घ्यावी. विशेषतः पहाटे असे पिवळे सिग्नल असतात त्यावेळी वाहन हळू व बेताने चालवावे. नो पार्किंगमध्ये वाहन उभे करु नये. कोणत्या तारखेला पार्क करावे याच्या सूचनांचे पालन करावे. रस्त्याच्या कडेला व्हाईट पट्टा असतो त्याच्याबाहेर बाईक पार्क करु नये. पटकन जाऊन येतो म्हणून वाहन मध्येच पार्क करु नये. योग्य जागी, योग्य वेळी गाडी पार्क करावी. पे ॲण्ड-पार्क बोर्डाजवळील कर्मचाऱ्यास पार्किंगचे पेमेंट अगत्याने करावे. पेमेंट न करता वाहन घेऊन जाऊ नये. कोर्ट, शाळा, शासकीय कार्यालये, दवाखाने, महत्वाच्या ठिकाणी हॉर्न वाजवू नये. तशी शिस्त पाळावी. वर्क इन प्रोग्रेस, वाहने हळू चालवा अशा सूचनांचे पालन काटेकोरपणे व तंतोतंत करावे. पादचारी रस्ता अचानकपणे ओलांडत असेल तर त्यांच्या ओलांडण्यास मदत करावी. वाहन हळू चालवून त्यांच्यासमोर वाहन थांबवा. जेणेकरुन पादचाऱ्यास रस्ता ओलांडतांना मदत होईल. इ. नियमांचे पालन, सुचनांचे पालन, ट्रक, रिक्षा, बसेसवर, एस.टी.वर जी घोषवाक्ये लिहिली आहेत त्यांचे वाचन, मनन, चिंतन करावे. त्यांच्या विचारावर विचार करुनच प्रवासात सहभागी व्हावे. 'काठी न घोंगड घेऊ द्या कीरं, मला बी जत्रेला येऊ द्या की' नुसार आपण ही त्यांच्याबरोबर हसत हसत प्रवास करु. त्यामुळे अपघाताचा प्रश्नच उभा रहाणार नाही. ना कोर्ट ना कचेरी, ना पोलीस ना धांदरटपणा सर्व काही अलबेल व प्रसन्न मनाने इच्छित स्थळी नक्की पोहचून कार्य लाभं होऊन जाईल. म्हणून वाहन चालवितांना सुरक्षा सर्वासाठी, सुरक्षेसाठी सर्व असेच म्हणावेसे वाटते, तो खरोखरच सार्थ आहे.


*With Best Compliments From :*



Balaji Cars
Pvt. Ltd.

*With Best Compliments From :*




Nikhil
Automobiles Ltd.

# रस्ते अपघात आणि माझी भूमिका

**लीना वालावलकर**

''अग, परवा मकरंदाचा ॲक्सिडेंट झालाय. कुलकर्णी डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे तो. काल म्हणे त्याच्या पायामध्ये रॉड घातला. आज संध्याकाळी पाच वाजता आम्ही त्याला भेटायला चाललोय, तूही ये.'' सकाळी सकाळीच स्मिताचा फोन आला. मला एकदम धस्स झाले. मकरंद आणि अपघात? मकरंद हा माझ्या मैत्रिणीचा मुलगा. अतिशय सालस, संयमी, मर्यादाशील! सावधपणे, काळजीपूर्वक बाईक चालवणारा! त्याला कसा काय अपघात झाला? मनात दिवसभर या प्रश्नाचे काहूर उठले होते. संध्याकाळी हॉस्पिटलमध्ये मी पोहोचले. बाकीच्या मैत्रिणीसुध्दा आल्या. मकरंदला पायात रॉड घातला होता. तसा तो बराच



सावरलेला दिसत होता. बेडवर झोपूनच होता, 'अरे, तुला अपघात कसा काय झाला?' माझा प्रश्न मलाच स्वस्थ बसू देत नव्हता. मकरंदकडून कळलं की, तो नेहमीप्रमाणे सावकाश बाईक चालवित होता. रस्त्याच्या मधोमध होता आणि अचानक समोर एक मोठा खड्डा आला. बाईक बाजूला घ्यावी तर माझ्या बाजूने वाहने वेगाने जात होती. त्याने एकदम ब्रेक दाबला तसा मागून आलेल्या स्कुटरने त्याला धक्का दिला आणि बाईकसहित तो त्या खड्ड्यातच पडला व परिणामी पाय फ्रॅक्चर झाला.

दोन दिवस शोभा घरी कामाला आली नाही, म्हणून तिच्या घरी चौकशीला गेले. तेंव्हा समजलं की, शोभाच्या नवऱ्याचा अपघात झाला आणि तो सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. दवाखान्यात गेल्यावर शोभा भेटली. तिने सांगितल्यानुसार तिचा नवरा रस्ता ओलांडत होता. समोरून येणारी कार त्याला पाहून थांबली पण कारच्या बाजूने येणाऱ्या रिक्षावाल्याला हा दिसलाच नाही, रिक्षा वेगात होती, तिने याला उडवला.

ही अशी उदाहरणं पाहिली की मन विषण्ण होतं. आज ऐन विशीतला मकरंद पायात रॉड घालून फिरत आहे. शोभाचा नवरा पाठीच्या मणक्यांला जबर मार बसल्यामुळे अंथरूणाला खिळला आहे. यात दोष कोणाचा? रस्त्यात अचानक खड्डा समोर आला आणि मकरंदचा अपघात झाला. असे जीवघेणे खड्डे रस्त्यात जागोजागी अचानक पुढे येतात. अपघातांच्या संदर्भात रस्त्यांच्या स्थितीचाही विचार होणे आवश्यक आहे. आमच्याकडे नवीन रस्ते बनवतात. पण सहा महिन्यांतच त्यांची दुर्दशा झालेली दिसते. कॅांक्रीटच्या रस्त्यांचा दर्जा तर इतका खराब असतो की एक तर ते अतिशय खडबडीत असतात, त्यांच्या सांधणीमधील कॉंक्रीट निघालेलं असतं, त्यामुळे या रस्त्यावरून जाताना वाहने, विशेषत: दुचाकी वाहने थडथडत जातात. पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डयांत पाणी साठलं की, त्या खड्डयांचा, त्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही, त्यामुळे मग अपघात ठरलेला! मी स्वत: पावसाळ्यात दोनदा अशी स्कूटरवरून पडले आहे.

आपल्याकडे मधूनमधून पेव्हर ब्लॉक बसवितात, पण तेथेही रस्त्याची पातळी बिघडणे, रस्ता खणणे, तो वरखाली होणे असे प्रकार होतात. मध्यंतरी पेव्हर ब्लॉकचा रस्ता अचानक खचल्यामुळे मुंबईत एका ट्रकचा अपघात झाला होता. या पेव्हर ब्लॉकवरून जातात दुचाकी गाड्या अक्षरशः खिळखिळ्या होतात. रस्त्यात मधूनच ड्रेनेजचे मॅनहोल्स दिसतात. ते कधी रस्त्याच्या पातळीपेक्षा वर असतात तर कधी खाली असतात. खाली असतील तर त्या ठिकाणीही खड्डेसदृश्य जागा तयार होतात. (उदा. ठाण्यातील टेलिफोन एक्सेंजकडून कोपरी पुलाकडे जाणारा रस्ता पहावा) या जागाही अपघाताला निमंत्रण देतात.

शोभाच्या नवऱ्याच्याबाबतीत जे घडले ते तर आपली फार मोठी समस्या आहे. आमची रस्त्यावरची वाहतुक चालणाऱ्या लोकांचा कधी विचारच करत नाही. कुठल्याही चौकात काय किंवा रस्त्यावरून काय, चालणं आणि रस्ता ओलांडणं एक दिव्य झालं आहे. सगळीकडून वाहनं येत जात असतात. कुणीच थांबायला तयार नसतं. मग चालणाऱ्यांनी रस्ता ओलांडायचा केव्हा आणि कसा? माणसं रस्ता कसा ओलांडतात हे ठाण्यातील तीन हात नाका, आंबेडकर चौक, समर्थ भांडार (टायटन शोरूम) वगैरे ठिकाणी पहावं. जीव मुठीत धरून, येणाऱ्या गाड्यांना चुकवत, त्यांच्यामधून पळत पळत लोक रस्ता ओलांडत असतात. त्यातून त्यांचा बराचसा भाग हा फेरीवाल्यांनी व्यापलेला असतो. फुटपाथच्या फरश्या बऱ्याच ठिकाणी उखडलेल्या असतात. मध्येच असलेल्या ड्रेनेजची जाळी निघालेली असते. अचानक त्यात पाय जाऊन पडण्याची शक्यता वाढते. रस्त्यावरून चालावं म्हटलं तर दोन्ही बाजूला गाड्या पार्क केलेल्या असतात. येणाऱ्या- जाणाऱ्या वाहनांनाच कशीबशी वाट मिळते. त्यातून चालणाऱ्या लोकांनी कसं चालावं? वृध्दांना तर रस्त्याने चालायची, रस्ता ओलांडायची सोयच राहिलेली नाही. पाश्चात्य देशात चालणाऱ्या लोकांचा प्रथम विचार केला जातो. लोकांना रस्ता ओलांडताना पाहून येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या थांबतात. आपल्याकडे प्रचंड लोकसंख्येमुळे ही गोष्ट शक्य नाही; कारण मग गाड्यांना थांबूनच राहावे लागेल, मग चालणाऱ्या लोकांसाठी काय करावं? मला वाटतं की, आपल्या सिग्नलयंत्रणेत त्यासाठी थोडा बदल करावा. चौकात सिग्नल असतात, सर्व रस्त्यांसाठी ते एकदा देऊन झाले की सर्व सिग्नलवर एक मिनिट लाल दिवाच ठेवावा, त्यामुळे सर्व दिशांची वाहने थांबवून राहतील आणि त्यावेळी चालणाऱ्या लोकांना रस्ता ओलांडू द्यावा. त्यामुळे वृध्द, लहान मुले, हातात, खांद्यावर जड सामान असलेले लोक सर्वांनाच रस्ता ओलांडणं सहजसुलभ होईल.



मोबाईलवर बोलत रस्ता ओलांडणारे तरूण ही एक नवीनच समस्या आता निर्माण झाली आहे. मोबाईलवर बोलण्यात किंवा इयरफोन लावून गाणी ऐकण्यात ही मुले इतकी दंग असतात की कितीही हॉर्न वाजवला तरी त्यांना तो ऐकूच येत नाही. त्यामुळे एखाद्या वेगात असलेल्या गाडीचा ब्रेक दाबला नाही तर अपघात होऊ शकतो म्हणून रस्त्यावरून चालतांना मोबाईल वापरलात तरी रस्ता ओलांडतांना मोबाईलवर बोलू नये, असा नियम करावा.

पुष्कळ वेळा असं होतं की, निम्मा रस्ता नवीन केला की त्याची पातळी वाढते व जुना निम्मा रस्ता मग खाली जातो. त्यामुळे अशा वेळी वाहनं चालवतांना त्रास होतो. तेव्हा रस्ता बनवताना एकाच रस्त्याची पातळी समान राहील याची काळजी घ्यावी.

आपल्या रस्त्यांमधले स्पीड ब्रेकर्स हीसुध्दा चिंतेची गोष्ट आहे. काही रस्त्यांत ते अर्धवट उखडून टाकलेत तर जेथे आहेत तेथे ते तुटलेल्या स्थितीत आहेत. म्हणजे एका दिशेने गाडी स्पीड ब्रेकरवरून वर

न्यावी आणि पुन्हा खाली उतरताना त्या ठिकाणी स्पीड ब्रेकरचा भागच तुटला आहे, अशी स्थिती असेल तेव्हा अपघाताची शक्यता वाढते. तेव्हा स्पीड ब्रेकर्स योग्य स्थितीत असावेत. तसेच ते गडद रंगात रंगवून फार लांबूनही दिसतील याची काळजी घ्यावी.

महामार्गावर होणारे अपघात विशेषतः रात्रीच्या वेळी, तेसुध्दा खूप अस्वस्थ करतात. लोकांनी शक्यतो रात्रीचा प्रवास टाळावा. तो करणे आवश्यक असेल तर ड्रायव्हरने सावध आणि जागरूक असावे. कधी कधी सुग्रास असे समारंभाचे जेवण जेवल्यानंतर ड्रायव्हरला आलेल्या डुलकीमुळेही अपघात झाले आहेत. तेव्हा गाडी चालवितांना ड्रायव्हरने झोप येणार नाही याची काळजी घ्यावी. वेगावर नियंत्रण ठेवावे. ओव्हरटेक करताना पूर्ण दक्षता घ्यावी.'वाहतुक सुरक्षा वाहनचालक एकदिलाने काम करू' हे अपघात टाळण्यासाठी जितके आवश्यक आहे, तितकेच रस्ते सुस्थितीत असणे हेही गरजेचे आहे. त्यामुळे अपघात टाळणे, निदान कमी करणे शक्य होईल.'


*With Best Compliments From :*

**Shreeram Cars Pvt. Ltd.**





*With Best Compliments From :*

**ASHWINI LOGISTICS SOLUTION**

FLEET OWNERS & TRANSPORT CONTRACTORS

**KULDEEP SINGH**
Tel. : Dir. : 27882878
Cell. : 9321027293, 9867974118

H.o.: 206, Ram Laxman Commercial Complex, 2nd Floor, Plot No. 6, Sector -18, Above Nanumal Hotel, (Sanpada), Vashi, Navi Mumbai - 400 705

Tel.: 27899863 / 64 / 65 / 66, 27882875 / 97 / 98 / 99 Fax : 27899867
**Emal :**ashwinilogistics@hotmail.com
**Web site :** www.ashwinilogistics.in



*With Best Compliments From :*





**Sai Samrat Auto Works**

# रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात

किशोर ना. श्रीवर्धनकर

वाहन चालविणाऱ्या प्रत्येक नागरिकाची पहिली जबाबदारी ही आहे की, त्याने वाहन चालवितांना प्रथम स्वतः ची तसेच इतरांची काळजी घ्यायला हवी. टू व्हीलर असेल तर त्याने हेल्मेट घालणे हे अनिवार्य आहे. आपण चालवित असलेली टू व्हीलर ही व्यवस्थित आहे काय? आपण करीत असलेल्या प्रवासामध्ये आपल्याला किती इंधन लागेल त्याची तजवीज करणे जरुरीचे असते नाहीतर कोठे ही ती बंद पडून त्रास होण्याचा धोका संभवतो. ज्या मार्गावर टू व्हीलरला परवानगी नाही तेथे प्रवास करणे टाळावे. लेनची शिस्त पाळावी व वेगावर नियंत्रण ठेवणे, टू व्हीलर वर दोन किंवा तीन माणसांनीच प्रवास कराव व सामान मर्यादीत ठेवावे कधी कधी हातामधील सामान पडून मागील वाहनांचा अपघात होऊ शकतो.



चार चाकी वाहन घेवून लांबचा प्रवास करायचा असेल तर गॅरेजमध्ये नेवून गाडी तपासून घेणे, त्यामध्ये पेट्रोल किंवा डिझेल भरुन घेणे. हायवेवर लेनची शिस्त पाळावी जी वेगमर्यादा ठेवली आहे तिचे पालन करावे. ओव्हरटेक करताना पुढील वाहनांची स्थिती लक्षात घेवून ओव्हर टेक करणे व तसे हाताच्या इशाऱ्याने दाखवावे. जागोजागी लिहीलेल्या सुचनांचा अवलंब करावा, जसे वाहने सावकाश चालवा, पुढे वेडेवाकडे वळण आहे, स्पीड ब्रेकर आहे. बोगदा आहे. लवकर निघा, सुरक्षित पोहचा. चालकाने दारु पिणे कटाक्षाने टाळावे व दारु पिणारा ड्रायव्हरसुध्दा आपण आपल्या कार साठी घेऊ नये. बऱ्याच ठिकाणी काही घोषवाक्य लिहीलेली असतात. जसे, ड्रायव्हींग ॲण्ड ड्रिंन्कींग डोन्ट रिक्स, नजर हटी दूर्घटना घटी अशा सूचना या फार महत्वाच्या असतात व त्याचा अवलंब करावा. आपल्या वाहनांमधून गावी जाताना वर कॅरीवर आपण बरेच सामान लादतो पण त्याच्या बांधण्याकडे दुर्लक्ष करतो. कधी कधी मध्येच बॅगा पडतात व अपघात होतात याची काळजी घ्यायला हवी. सर्व साधारण दिवसाच प्रवास करण्याची सवय ठेवा अंधार पडण्यापूर्वी पोहचा व निघताना सुध्दा त्या ठिकाणावरुन अगदी सकाळी निघा, ज्यामुळे आपण अपघात टाळू शकतो. कारण एकदा रात्र झाली की परस्पर हेडलाइटमुळे चालक बिचकतात व त्यांचा वाहनावरील ताबा सुटतो. रात्री आजूबाजूचा रस्ता दिसत नाही. कोठे रस्ता आहे, कोठे दरी आहे, कोठे खड्डे आहेत हे सहसा कळत नाही व पुढील वाहनांच्या मागे मागे आपल्याला गाडी चालवावी लागते कारण आजूबाजूला केवळ झाडी असते त्यामुळे पंचवीस टक्के अपघात केवळ रात्री घडतात व रात्री गाडी चालवित असताना डुलकी लगण्याचाही संभव असतो व आपला वाहनावरील ताबा सुटतो अशा बऱ्याच गोष्टी आपण टाळल्या तर सुरक्षित प्रवास होतो.

जड वाहनांसाठी कडक नियम करायला हवेत एक

तर त्यांना डाव्या बाजुने म्हणजे डाव्या बाजुनेच जाण्याची सक्ती करावी, कारण एक तर ती जड असतात त्यामुळे त्यांचा वेग कमी असतो. दुसरे म्हणजे त्यांनी लेन तोडण्यामुळे इतर वाहनांना हळू जावे लागते व केवळ यामुळे ट्रेफीक जॅम होते. बहुतेक वेळा या वाहनांमध्ये लादलेले सामान व्यवस्थित बांधलेले नसते व केवळ ते सामान रोडवर पडल्यामुळे अपघात होतात. गाडीमधील सामान मागच्या बाजुला बाहेर आलेले असेल. उदा. शिगा, पाइप यास लाल कपडा बांधणे सक्तीचे करावे व रात्रीच्या वेळी त्यास लाल दिवा लावावा. रात्रीच्या वेळी डाव्या बाजुला गाडी उभी असेल तर त्यास लाल इंडीकेटर देणे गरजेचे आहे. जड वाहन जर मध्येच बिघडले असेल तर एक दोन माणसांनी लाल टॉर्च लावून इतर वाहनांना इशारा द्यावा. कंटेनर कॅरीयर वर व्यवस्थित बसविलेले आहे किंवा नाही याची शहानिशा चालकाने व किंन्नरने करणे ही त्यांची जबाबदारी आहे. कंटेनर केवळ वर ठेवून जाणाऱ्या वाहनांवर वाहतुक पोलिसांनी लक्ष ठेवायला हवे व तशी त्यांना समज देवून त्यांना दंड ठोठावणे. कारण बरेच वेळा धडक लागल्याने कंटेनर पडल्याची दृष्ये रोड वर नेहमीच दिसतात. त्यामुळे मोठे अपघात तर होतातच पण ट्रॅफीक जॅमची डोकेदुखी सर्वांनाच सहन करावी लागते.



या सर्व गोष्टींसाठी महत्वाची भुमिका वाहतुक पोलिस विभागाची आहे. जेथे चार रस्ते असतात तेथे सिग्नल किंवा पोलिसांची व्यवस्था असावी. सिग्नल तोडणाऱ्यावर कारवाई करावी. प्रत्येक आठवड्याला एकातरी नाक्यावर वाहन चालकांसाठी व पादचाऱ्यांसाठी जनजागृती अभियान ठेवावे, याने फार फरक पडेल. पामबीचसारख्या रोडवर जेथे नेहमीच अपघात घडतात, तेथे खास वाहतुक बुथ उभारुन दोन्ही बाजूने सतत पोलिसांची गस्त वाहन फिरवावी, ज्याने इतर वाहने आपल्या वाहनांवरील वेगमर्यादेकडे लक्ष देतील व कोणीही चुकीच्या मार्गाने ओव्हरटेकींग करणार नाही, लेनची शिस्त पाळतील. या सर्व गोष्टी वाढणाऱ्या वाहनांमुळे व होणाऱ्या अपघातांवर बराच अंकुश ठेवू शकतील. शासनाने वाहतूकीचे नियम लोकांनी पाळावयाची शिस्त व जनतेला दुरदर्शन वरुन वेळोवेळी कार्यक्रम, घोषणावाक्य व मार्गदर्शन पर परिसंवाद ठेवून लोकांमध्ये अपघात कसे टाळले जाऊ शकतात या सर्व गोष्टींवर एखादा तरी कार्यक्रम प्रत्येक आठवड्याला ठेवून त्याचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे अपघात होणार नाहीत याची प्रत्येक वाहन चालकाने काळजी घेणे ही त्याची नैतिक जबाबदारी आहे, याची स्वतःला सवय लावून घेणे जरुरीचे आहे.

अशा बऱ्याच गोष्टी आपण आपले कर्तव्य आहे, असे समजून केले तर रस्ते अपघात टाळू शकतात.


*With Best Compliments From :*

**S.K. WHEELS PVT.LTD**



# रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात

**सुहास सावंत**

रस्ता हा आपल्या सर्वांच्याच जिवनातील एक अविभाज्य घटक आहे. यामुळे दुरची कानाकोपऱ्यातील गावे एकमेकांशी जोडली जाऊन जनजीवनाचा उत्कर्ष साधला जातो. मानवाने आपल्याला लाभलेल्या बुद्धिच्या जोरावर रस्ता आणि त्यावरील वाहनांमध्ये निरनिराळे, वैविध्यपूर्ण असे उपयुक्त बदल घडवून आपले जीवन जास्त गतिमान करत आहे. असे असले तरी आपल्या आयुष्याची दोरी या गतिमानतेतून बाजूला होत आहे. आज आपला दिवस कुठेतरी रस्ता अपघाताच्या बातमीने उजाडतो. अशा अपघातात मृत झालेल्या, अपंग व जखमी झालेल्या विषयी थोडीशी हळहळ वाटते पण परत आपणांस या वेगवान जगात शिरणे भाग पडते. आपली मानसिकताच अशी बनत चालली आहे. रस्त्यांवरील अपघातांची आकडेवारी काही लाखांपासून कोटींपर्यंत पोहोचली तरी आपल्यावरील दिलेल्या मानसिकतेत काहीच फरक पडत नाही. परंतु आपल्यासाठी, पुढील पिढीसाठी, अपघातात होणाऱ्या नुकसानीसाठी मोजावी लागणारी आर्थिक, मानसिक व शारीरिक किंमत टाळण्यासाठी हे अपघात कसे टाळले जातील याविषयी गांभीर्या विचार करावयास हवा.



अपघात किंवा तो टाळण्यासाठी लागणारी सुरक्षा हा एक विशाल विषय आहे. मुळात अपघात का होतात ते पाहू. मानव हा सजिव असून जेव्हा यंत्राच्या सानिध्यात येतो तेंव्हा अपघाताची शक्यता असते. या अपघातांस मानव व यंत्र या दोन घटकांवर अंमल (अपघात होण्याच्या दृष्टीने) बजावणारे इतर घटक अपघातांस कारणीभूत असतात. उदा. मानवाची शारिरीक तंदूरूस्ती, रस्त्यावरील भान, मानसिक स्थिती, स्वभाव, त्याला खटकणाऱ्या घरातील, रस्त्यांवरील, नातेसंबंधातील गोष्टी, वाईट सवयी, चढाओढ अशा एक ना अनेक बाबी मानवाच्या संदर्भात घडत असतात. अशावेळी तो मानव जर वाहन (यंत्र) चालवत असेल किंवा रस्त्यावर पायी चालत असेल किंवा अन्य काम करत असेल तर अपघात पोषक स्थिती ओढवून घेतो त्याचा परीणाम अपघातात होणाऱ्या स्वता:च्या, इतरांच्या नुकसानीत होतो. याचप्रमाणे वाहनाबाबतीतल्या गोष्टी म्हणजे वाहनाची स्थिती, तिची कार्यक्षमता (वाहनांबाबतीतली) वाहन रस्त्याच्या बाजूला उभी करण्याची जागा, वाहनात लादलेला व त्याच्या वाहनाबाहेर आलेला भाग, रस्ता जाणाऱ्या भागाची भौगोलिक रचना, चढ-उतार, टोकदार वळणे, हवामानाची स्थिती, त्या स्थितीनुसार वाहनांस आवश्यक असणारी साधने इ. गोष्टींची रांग बरीच लांबत जाईल.

वरील दोन घटक व त्यांवर अंमल करणाऱ्या बाबी

पाहिल्यावर असे दिसून येते की, मानवाचेच सर्वांवर नियंत्रण आहे. अपघात होणाऱ्या गोष्टींमध्ये मानवाकडून होणाऱ्या चूका किंवा त्या चूकीस कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टींवर नियंत्रण मानवाचेच असते. वाहन हे एक निर्जिव साधन आहे ते चालवणारा मानव सजीव आहे म्हणून जसे अपघात मानवामुळे घडतात तसेच अपघात टाळण्यासाठी मानवाकडूनच प्रयत्न होणे गरजेचे आहे. म्हणजेच अपघात टाळण्यासाठी आपणांकडून परिणाम साधने आवश्यक आहे.

मानव हे काही करतो, वागतो त्यामध्ये शिस्त असेल तर आपण अपघातांवर नियंत्रण आणू शकतो. ही शिस्त वाहन चालवताना, वाहनातून प्रवास करताना, रस्त्यावरून चालताना अपेक्षित आहे. रस्ता वाहतुकीचे नियम शिस्तीवरच आधारीत आहे.



नियम हे अपघातांची कारणमिमांसा करून, अनुभवांवर बनविलेले असतात. या नियमांचे मनापासून पालन प्रत्येक नागरिकाने करावे. नियमांचा आदर करावा. नियम जाणून घ्यावे ते जर कालबाह्य असतील तर यज्ञयावत करण्यासाठी शासनाकडे योग्यरीतीने पाठपुरावा करावा जेणे करून त्याचा फायदा सामाजातील रस्त्यावर वापरणाऱ्या सर्व घटकांना मिळावा. आजकाल तरूणवर्ग कॉलेजमध्ये जाण्याअगोदरच वाहन चालवू लागला आहे तर यासाठी शिक्षणक्रमामध्ये वाहनविषयक कायदा अंर्तभूत करावा त्यामुळे त्यांच्या कडून बेफिकिरपणे वाहनाची हाताळणी होणार नाही. आपण आपल्या घरापासून या गोष्टी करू शकतो. जसे लहान मुलांना त्यांच्या समज करून घेण्याच्या क्षमतेनुसार सुरक्षिततेचे धडे देऊ शकतो. उदा. खेळ खेळताना रस्त्यावर भर रहदारीवर येऊ नये, पतंग पकडतांना अथवा ओळखीची व्यक्ती वा आवडती वस्तू रस्त्यावर दिसली तरी चटकन धाव घेऊन पकडू नये. त्याबाबतचे नियम व बरेवाईट घडल्याने परिणाम त्यांना समजून सांगावे. ही लहान पिढी मोठे होऊन सुजाण नागरीक बनेल आणि रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी पण मोठी फौज कार्यरत होईल.

बऱ्याच अपघातांमध्ये 'घाई' या घटकाने मोठी आघाडी घेतली आहे. मुळांत 'घाई' करणे हे मानसिक लक्षण आहे. जर वेळ होत असेल तर नको तिथे घाई करून म्हणजे वाहतुकीतून आपण आपले प्राण संकटात आणतो. जर रस्त्यावरून आपणास जायचे असेल तर अगोदर निघून संयमाने प्रवास करण्याची सवय अंगी बाणवावी. सुरूवातीस चांगली सवय लागणे कठीणच असते परंतु प्रयत्न चालू ठेवावा.

रस्ता वापरताना आपणामळे इतरांना त्रास किंवा संकटात पाडू नये याची काळजी घ्यावी. जसे लहान मुलांची काळजी मोठे घेतात तसेच लहान दुचाकी वाहनांची काळजी मोठ्या वाहनांच्या चालकांनी घ्यावी. 'हे विश्वची माझे घर' या उक्तीनुसार जर आपण दुसऱ्याची काळजी घेतली तर सर्वच जण सुरक्षित, सुखरूप राहतील.

आपण वाहन चालविण्यास घेतो त्यावेळी ते सुस्थितीत असेल याची दक्षता घ्यावी. तसे नसेल तर इतर सार्वजनिक वाहनाचा वेळेस उपयोग करावा. मग वाहनाची दुरूस्ती करून वेळेवर वाहन तंदूरूस्त राहील हे पहावे. वाहनाच्या सामग्री जसे दिवे (lights), वायपर, टायर इ. गोष्टी नियमितपणे तपासून घ्याव्यात.

मालवाहतूक करताना वाहनाच्या क्षमतेपेक्षा माल वाहनावर लादला न जावा. तसेच वाहनाच्या आकारापेक्षा जास्त माल असल्यास त्याच्या बाहेरील भागावर नजरेत येईल अशा रितीने चमकदार लाल रंग अथवा वेष्टण, कपडा लावावा तसेच रात्रीच्या वेळेसाठी दिव्यांची व्यवस्था व्हावी. असा माल वाहतूक करताना

शासनाची परवानगी घ्यावी जेणे करून संबंधीत अधिकारी ज्या वेळेस वाहतूकीची वर्दळ कमी असेल त्या वेळी परवानगी देऊ शकेल. अशा रीतीने वाहतुकीवर ताण येणार नाही. जड वाहनासाठी रस्त्याची वजन घेण्याची पात्रता लक्षात घ्यावी त्यामुळे रस्ता दबल्याचे, माल कलंडण्याचे व खचण्याचे प्रकारचे टळतील. माल वाहतूकीसाठी माल योग्य रितीने वाहनावर बांधला गेल्यास तो कलंडणार किंवा पडणार नाही याची निश्चिती होईल.

रस्ता बांधकाम करतांना पुढील ५ ते १० वर्षाचा अगोदर आढावा घेऊन व त्याही पुढील कालावधीसाठी नियोजन करून त्याप्रमाणे रूंद व जड वाहन पेलणारा करावा. ठराविक अंतरावर वाहने उभे करण्याची (Parking) सोय ठेवावी. तसेच तेथे आरामगृह, उपहारगृह व स्वच्छतागृह असल्यास वाहनचालक ताजातवाना होऊन अपघात टाळण्यास मदतच करील. रस्त्यावर दिशा दर्शक ठळकपणे दाखवावेत. जेणेकरून मोक्याच्या ठिकाणी अथवा वळणावर वाहनांचा खोळंबा होणार नाही.

आज विज्ञान युग आहे. या तंत्रज्ञानाचा फायदा रस्ता अपघातांची आकडेवारी, वाहनचालकांची संपूर्ण माहिती, जागेबद्दल (अपघाताच्या) माहिती, वाहनाचे प्रकार अपघातानंतर केले गेलेले बदल त्यांचे परिणाम अशी माहिती बोटाच्या कळीवर मिळू शकेल, यासाठी प्रयत्न करावयास हवा. त्यात अपघातांची कारणे, त्यांचे पोषक असे इतर घटक, त्यांची वारंवारता, भयानक होणाऱ्या इजा, नुकसान, जास्त अपघात करणारी व्यक्ती यांची माहिती ही पुढे उपयुक्त ठरू शकते. अपघात होऊ नयेत यासाठी वाहनात तंत्रज्ञानाच्या आधारे बदल करणे व ते करण्यास आर्थिक पाठबळ मिळावे.

शहरी भागात वाहनांची गर्दी असले ती नियंत्रणात ठेवण्यासाठी वेगवेगळे उपाय करुन पहाणे जसे, रस्त्याच्या लांबीनुसार वाहने उभी करण्याच्या जागेनुसार, वाहन किती वेळासाठी त्या भागात वावरेल यानुसार परवानगी दिली जावी. पण अग्निशमन, हॉस्पिटल, अतिमहत्वाच्या व्यक्ती वगळता अशी वाहने सोडली तर सार्वजनिक वाहनांची परिणामकारकता वाढेल आणि त्याचा लाभ सर्वांना होईल.

वाहन चालविण्याचा परवाना देताना योग्य त्या नियमांचे ज्ञान त्या व्यक्तिस असणे बंधनकारक असावे. तसेच त्या व्यक्तिने वाहन चालण्याच्या कालावधीत किती अपघात केलेत वा त्यानुसार कठोर कारवाई किंवा शिफारस व्हावी अशा रितीने कायद्याचा धाक किंवा अपघात व केल्याबद्दल उत्तेजन मिळेल.

रस्ता सुरक्षेचे अभियान, आठवडा आखताना पथनाट्य परिणामकारक मजकूर असलेले घातक, नादुरूस्त वाहनांना आडकाठी, सुरक्षित वाहनचालकाचा गौरव, प्रचार आणि प्रसारासाठी समाजातील लहान थोर व्यक्तिंचा समावेश केला तर आपण बऱ्याच अंशी रस्त्यावरील अपघात टाळू शकतो.

*With Best Compliments From :*

**Automotive Manufactures Pvt.Ltd.**

# रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात

**जनार्दन जोशी**

रस्ते अपघात ही नित्याचीच समस्या झाल्याचे आढळून येते. रोजचे वर्तमानपत्र उघडल्यार रस्ते अपघाताची एक तरी बातमी असतेच. मुंबई महानगरी काय, ठाणे शहर काय किंवा अन्य महामार्गांवर विविध प्रकारचे अपघात घडतच असतात. या रस्ते अपघातात जास्त अपघात, चार चाकी (four wheelers) वाहनांचे, स्कुटर-मोटर सायकल्स, टेम्पो, अवजड वाहने, यांचेही अपघात होतात. यांत अनेक वाहन चालक, प्रवासी मृत्यूमुखी पडतात, रस्ते क्रॉस करणाऱ्यांचाही यात मृत्यू ओढवतो, ही फार दुःखद घटना आहे. नाहक बळी पडणाऱ्यांचीच संख्या जास्त असते. यात कित्येकजण जखमी होऊन अपंग होतात. याची आकडेवारी पहिल्यावर अपघातांची तीव्रता प्रकर्षाने जाणवते. रात्रीच्या वेळेस होणाऱ्या अपघातांचे प्रमाण जास्त दिसून येते. याला कारणेही खूप आहेत.



'गाव तेथे रस्ता' या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी गावागावांतून झाली. त्यामुळे सामान्य कष्टकरी गरीब व शेतकरी-अशिक्षित लोक, विद्यार्थी, जेष्ठ नागरीक यांची खूप सोय झाली. गावांचा विकास झाला. ग्रामीण जनता एकमेकांच्या जवळ आली खेड्डुयापाड्यातून छोटे-मोठे उद्योग सुरू झाले. रोजगार निर्मिती झाली. रस्त्यारस्त्यातून एस.टी.ची वर्दळ चालू झाली. हे सर्व झाले तरी बांधलेल्या रस्त्यांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. एकदा रस्ता बांधून झाला की, शासनाचे काम झाले मग तो रस्ता रहदारीस अगदीच योग्य राहिला. नाहीतर जनतेची बोंबाबोंब झाल्यावर स्थानिक पुढारी, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, शासकीय अधिकारी, ठेकेदार हे सर्व आपला खिसा कसा व किती भरेल याकडे जास्त लक्ष देतात. परिणामी रस्ते चांगले होऊ शकत नाहीत व अपघात घडतात. तसेच अशा कामात स्थानिक पुढाऱ्यांचा राजकरणी लोकांचा हस्तक्षेप झाल्यास चांगल्या कामात अडथळे निर्माण होतात हे वास्तव आहे. म्हणून हा हस्तक्षेप टाळला पाहिजे.

याचे एक उदाहरण मी मुद्दाम उधृत करतो. ठाणे महानगरपालिकेचे माजी आयुक्त टी.चंद्रशेखर या एका कर्तव्यदक्ष प्रामाणिक अधिकाऱ्यास त्यावेळच्या नगरसेवकांचा व अन्य प्रतिष्ठित राजकारण्यांचा, कांही आपमतलबी स्वार्थी अधिकाऱ्यांचा रोष पत्करावा लागला तरीही त्याही परिस्थितीत रोष पत्करून चंद्रशेखर यांनी न्याय व कर्तव्यपालनात कसूर केली नाही. म्हणूनच आजचे ठाणे सुशोभित दिसते आहे. शासकीय यंत्रणा राबवून रात्रीचा दिवस करून त्यांनी ठाण्यातील अनधिकृत बांधकामे भुईसपाट करून त्यांनी ठाण्यातील बरेचसे महत्वाचे रस्ते रूंद केले. त्यामुळेच रहदारीच्या दृष्टीने त्यांनी केलेले काम

सर्वांच्या स्मरणात राहिले. असेच कर्तव्यदक्ष प्रामाणिक अधिकारी जेथे असतील तेथे कोणत्याही वाईट गोष्टी घडणार नाही, लाचलुचपत होणार नाही. आर. टी. ओ. सारख्या कार्यालयात भ्रष्टाचार होणार नाही व वाहनांचे अपघातही आपोआप टळतील त्याला जरब बसेल. पण असे होताना दिसत नाही. मतलबी नगरसेवक राजकारणी पुढारी अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांना टिकू देत नाहीत. याचा परिणाम टी.चंद्रशेखर यांची ठाण्यातून नागपूर का कोठेतरी बदली झाली. त्यानंतर मात्र ठाणे शहरात बेशिस्त माजली, विकास थोड्याफार प्रमाणांत खुंटला.

या सबंधात (रस्ते अपघात) माझी भूमिका मी एक ८१ वर्षाचा जेष्ठ नागरिक स्पष्टपणे मांडण्याचे धाडस करत आहे. ठाणे शहरात मुंबईमध्ये अनेक ठिकाणी श्री. गडकरी यांनी चांगले उड्डाणपूल-सॅटिसपूल बांधले व रहदारीचा मोठा प्रश्न सोडविला. अजूनही अशी कामे चालूच आहेत. त्यामुळे वाहतुकीला फार मोठा आधार प्राप्त झाला. पण चांगल्या कामात वाईट वृत्तीच्या माणसांचा नेहमीच हस्तक्षेप असतो; परिणामी विकास थांबतो व अपघात होतच राहतात.



दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक विकासाच्या कामात शासकीय क्षेत्रात आज भ्रष्टाचार खूपच बोकाळला आहे. विविध भ्रष्टाचार उघडकीस आले आहेत. भ्रष्टाचार करण्याची चढाओढ लागलेली दिसते. प्रत्येक जण आपल्या क्षेत्रात मग तो आमदार असो, मंत्री असो व साधा नवनिर्वाचित नगरसेवक असो, तलाठी, ग्रामसेवक, आर.टी.ओ. अधिकारी, कारकुनापासून ते शिपायापर्यंत, पुढाऱ्यापासून ते साध्या गणवेषातील शिपायापर्यंत प्रत्येकजण आपले हात ओले कसे होतील, याकडे जास्त लक्ष असते. कामाकडे दुर्लक्ष अशा परिस्थितीत रस्ते अपघात टाळण्यासाठी पोलिसांकडून कुचराई होते यात वाद नाही. यामुळेच अपघात होऊन आपलेच बांधव, आया-बहिणी मृत्यूमुखी पडतात यांचे अशा लोकांना सोयरसुतक नसते.

म्हणूनच वाहतुक यंत्रणेतील भ्रष्टाचारातील कीड प्रथम नेस्तनाबूत केली पाहिजे. जो भ्रष्टाचारी सिध्द होईल त्याला जबर शिक्षा झाली पाहिजे. तुरूंगवास झाला पाहिजे तरच ही कीड थोड्याफार प्रमाणात कमी होईल. वाहतुकीच्या दृष्टीने, रहदारीच्या दृष्टीने अपघात टाळण्याच्या दृष्टीने आर.टी.ओ. पासून प्रारंभ झाला पाहिजे. सर्वच काही भ्रष्टाची नाहीत पण जे आहेत त्यांना जरब बसेल अशी यंत्रणा शासनाने राबवली पाहिजे. शासनाकडून वाहतुक यंत्रणेकडून वाहतुकीसंबंधात जे नियम बनवले जातात. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी वाहतुक पोलिसांकडून झाली तर रस्ते अपघात बऱ्याच प्रमाणात कमी होतील.

रस्ते अपघात टाळण्यासाठी वाहन चालकांनी स्वयंशिस्तलावून घेतली पाहिजे. वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात शिस्त निर्माण करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. ही शिस्त वेळप्रसंगी कायद्याच्या बडग्यातून लादली पाहिजे.

तिसरी भूमिका रस्ते अपघातासंबंधी शासन यंत्रणेकडून केलेल्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. नियमांच्या अंमलबजावणीत शिस्तीची जोड नसल्यामुळे नियम कागदावरच राहतात हे राहणे गरजेचे आहे.

समाजाची मानसिकता बदलली पाहिजे. यासाठी समाजिक बांधिलकी या नात्याने प्रत्येकाने आपली

वाहने सावकाश चालवून आपल्या बांधवांचे प्राण वाचवले पाहिजेत ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. समाजजागृती म्हणजे रहदारीच्या नियमांची वेळोवेळी पत्रके काढून ती दरमहा रहदारीच्या मोक्याच्या ठिकाणी वाटली पाहिजेत.

शाळा कॉलेजेस्मध्येही, स्वयंसेवी संस्थांनी महिन्यांतून एकदातरी तेथे जाऊन नियमासंबंधी जागरूकता निर्माण केली पाहिजे. असे वारंवार केल्यास, लोकांच्या मनात बिंबवल्यास (मनावर) रस्ते अपघात टाळण्यास खूप मदत होईल.

**एक महत्वाची भूमिकावजा सूचना मांडीत आहे ती अशी,**



रस्ते अपघात टाळण्यासाठी, मनुष्यहानी टाळण्यासाठी, (१)मोटर सायकल स्कुटर्स (२) अवजड वाहने मोठे ट्रक्स-तेलाचे टँकर्स व शेवटी (३) चारचाकी वाहने म्हणजे अल्टो, मसिर्डिज, टाटा सुझुकी अशा प्रकारची वाहने यासाठी तीन वेगवेगळे रस्ते असावेत Lanes असाव्यात, जाण्यासाठी तीन व परतण्यासाठी तीन रस्ते ठेवले तर रस्ते अपघात नगण्य होतील याची खात्री आहे. अर्थात हे जागेच्या अभावी शक्य होणार नाही तरी द्रुतगती मार्गावर अशा वेगवेगळ्या लेन्स ठेवण्यास काही अडचण येणार नाही असे वाटते. हे शक्य झाले तर व तसे प्रयत्न शासनाकडून झाल्यास तुमच्या अभियानाची व तुमच्या प्रयत्नांची नक्कीच पूर्तता होईल असा विश्र्वास आहे. स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब यांच्या माध्यमांतून आपले प्रयत्न चालू ठेवावेत व यासाठी आपल्याला सर्वांकडून उत्तम प्रतिसाद मिळेल ही खात्री आहे. कमीजास्त लिहिले असल्यास या जेष्ठ नागरिकास क्षमा असावी, ही नम्र विनंती.

**रस्ते अपघात असे टाळले जाऊ शकतात.**

(१)शासनाच्या वाहतूक शाखेने (RTO) वळोवळी जे वाहतुकीचे नियम केले आहेत त्याची प्रत्येक वाहनधारकांनी काटेकोर अंमलबजावणी केली तर अपघात टाळले जाऊ शकतात.

(२)प्रत्येक वाहनधारकाने आपल्या गाडीचे नुकसान होऊ नये तसेच जिवितहानी टाळण्यासाठी, स्वतःच्या जीवासाठी तरी डोके व मन शांत ठेऊन गाडी चालवली तर अपघात नक्कीच टळतील.

(३)गाडी चालविण्यापूर्वी, गाडीचा वाहनाचा प्रत्येक भाग विशेषतः ब्रेक्स, स्टिअरिंग, गिअर्स, हेडलाइट्स, हॉर्न, साईड लाईट्स, चाके व्हायपर्स आदि सुस्थितीत आहेत का हे पाहुनच गाडी चालवावी म्हणजे खुपसे अपघात टळतील.

(४)गाडी स्वतःची असली तरी, दारू पऊन कधीही चालवता कामा नये. तसेच अन्य ड्रायव्हर ठेवल्यास त्यानेही नशापाणी करून गाडी चालवू नये. याची गाडीच्या मालकाने खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण रस्ते अपघात विशेषतः रात्रीचे वाहन अपघात नशापणी केल्यामुळेच होतात असे निष्पन्न झाले आहे म्हणून काळजी घेतल्यास अपघात टाळता येतील.

(५)वाहनचालक नियमांचे उल्लंघन करून दोषी आढळल्यास वाहतूक पोलिसांनी त्याचा वाहन परवाना तात्काळ जप्त करावा. तसेच पैशाच्या अमिषाला बळी न पडता कारवाई केली तर अपघाताना आळा बसेल व वाहनचालकांना जरब बसेल व अपघात टळतील.

(६)वाहनचलकांनी, दोन वाहनांचेमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे. द्रुतगती मार्गावर लेनची शिस्त पाळावी तसेच रस्त्यातील वाहतुकीसाठी जे लाल-हिरवे-पिवळे सिग्नल्स असतात. त्याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष

ठेवले पाहिजे. यामुळे अपघात टळतील.

(७)वाहनचालकांनी शाळा-कॉलेजस्च्या ठिकाणी असलेल्या स्पीड ब्रेकरचे उल्लंघन करू नये. मुलामुलींना Zebra Crossing वर सुखरूपपणे रस्ता ओलांडून द्यावा. पादचारी, जेष्ठ नागरिक यांचा मान राखुन त्यांना रस्ता ओलांडण्यास प्रथम मुभा द्यावी. म्हणजे अपघात टळतील.

(८)वाहनचालकाने आपल्या गाडीवर वेगाचे नियंत्रण ठेवल्यास अपघात होणार नाहीत.

(९)वाहनचालकाने वाहन चालवितांना (Seat Belt) पट्टा अडकविणे गरजेचे आहे.

(१०)विशेषता पावसाळ्यात गाडीच्या पुढील बाजूस काचेवर असणारे व्हायपर्स चांगल्या अवस्थेत आहेत की नाही हे पाहणे गरजेचे आहे.

अपघात टाळण्याच्या दृष्टीने महत्वाच्या बाबींचा पुन्हा एकदा परामर्श घेऊन त्यापुढे मांडत आहे : -

वाहनचालकाने स्वयंशिस्त लावून घेतली तर पुष्कळसे अपघात टळतील. कोणतेही वाहन चालविण्यापूर्वी त्याचे सर्व भाग सुस्थितीत आहेत की नाहीत हे पाहुनच गाडीचा, वाहनाचा वापर करावा.

द्रुतगती मार्गावर लेनची व वेगाची मर्यादा (शिस्त) सांभाळीच पाहिजे. वाहनचालकाने पूर्ण विश्रांती घेऊनच वाहन चालवावे म्हणजे अपघात टळतील.

समाजाची बांधिलकी या नात्याने वाहतूक नियमांची माहिती वेळोवेळी स्वयंसेवी संस्था सामाजिक! कार्यकर्ते या मार्फत पत्रकांद्वारे वाटली पाहिजे.

समाजाची मानसिकता बदलली पाहिजे, जागरूकता निर्माण केली तर अपघात टाळण्यास मदत होईल. वाहन चालकाने आपला गाडीचा परवाना नेहमी जवळ ठेवावा तसेच रिक्षा चालक-मोटरसायकलवाले यांनी जनतेचे सेवक या नात्याने सभ्यतेची वर्तणुक ठेवावी. सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास नशापाणी न केल्यास अपघात नक्कीच टाळता येतील.

*With Best Compliments From :*



Shreeji Autoworld Pvt. Ltd.

*With Best Compliments From :*



Arangassery Johny Joseph

# रस्ते अपघात आणि माझी भूमिका

निकीता सुधाकर तुंगारे

'प्रवास' हा सर्वांनाच न चुकणारा आहे. आपण सर्वच 'जीवन' नामक मार्गावरील प्रवासी आहोत. प्रत्येक जण प्रवासाचा आनंद घेत असतो. त्याकरीता विविध मार्गांचा अवलंब केला जातो. मुंबईसारख्या वेगवान शहरात तर प्रत्येक जण वेगाने पुढे जाण्याच्या प्रयत्नात असतो. करोडो लोकांची ही 'स्वप्ननगरी', या स्वप्ननगरीत प्रत्येकाला आपल्या स्वप्नांची पुर्ती करण्यांची घाई असते. या घाईतच स्वतःचे अतोनात नुकसान करून घेतात.

केवळ मुंबईच नव्हे भारतात सर्व ठिकाणी प्रगतीचे निर्देशक म्हणून पक्के रस्ते, लोहमार्ग, महामार्ग, द्रुतगती मार्ग यांची निर्मिती झालेली दिसते. ह्या मार्गांची निर्मिती म्हणजे मानवी विकासाचा आधार. रस्त्यांद्वारे आज अनेक दुरवर असलेली गावे, शहरे, विकास प्रकल्प, उद्योग यांना जोडण्यात आले. हा विकास मानवी जीवन अधिक सुलभ आणि सुखकर होण्यासाठी केला गेला. परंतु दुर्दैवाने आज सुखाच्या सोईच मानवी हानीचे कारण ठरत आहेत.



मानवानेच निर्माण केलेल्या या सोई, मानवी जीवनाच्या दुःखाचे कारण ठरत आहेत. परंतु या दुःखाचे कारण या सुविधा नसुन त्यांचा अयोग्य, अनियमित वापर करणारे आपल्यासारखे 'सुजाण नागरिकच' आहे. आपण विस्तृत, प्रगत ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या भारत देशाचे नागरिक आहोत. अनेक विक्रमांची नोंद करणाऱ्या भारत देशाचे नागरिक आहोत. अनेक विक्रमांची नोंद करणारा हा भारत आज रस्ते अपघात यातही नाव गाजवू लागला आहे. भारताची ही प्रतिमा मलीन होण्याचे कारण आपण सारे भारतीयच आहोत. एवढा विस्तृत भारत त्या भव्य जागा, त्याकरीता रस्ते निर्माण केले, त्या संपर्कासाठी; परंतु आज ते मृत्यूचे कारण ठरत आहे.

वाहतुकीचे महत्व, वाहतुकीचे नियम यांचे शिस्तीने पालन अनेक परदेशी देशांत होते; परंतु आपल्या देशात मात्र केवळ वाहतुकीचा वापर होतो त्याचे नियम, त्याचे महत्व याविषयाकडे सर्वाधिक दुर्लक्ष करतो. रस्ते अपघाताची कारणे विचारल्यास आपण रस्त्यावरील खड्डे, सिग्नल यंत्रणातील दोष, रस्त्यांची लांबी रूंदी अशा अनेक सबबी सांगतो, परंतु आपण स्वतःला यात कधीच दोष देत नाही. ज्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीचे श्रेय आपण स्वतःला देतो; परंतु वाईट गोष्टींकरता लोकांकडे बोट दाखवितो! अपघात होतात त्याकरीता इतर घटकांप्रमाणे स्वतः वाहनचालक व वाहन तितकेच जबाबदार आहे. इतर घटकांआधी आपण आपल्यातील दोषांचा विचार करावा.

रस्ते अपघात टाळणे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे. अपघात झाल्यानंतर होणाऱ्या नुकसान भरपाईसाठी लाखो रूपयांचा 'विमा' काढणारे नागरीक

मात्र गाडी व्यवस्थित रहावी म्हणून खर्च करताना किती विचार करतात. आपण आपल्या वाहनांची डागडुजी किती नियमितपणे करतो ? महिन्यातून एकदा हॉटेलात जायचेच असा हट्ट करणारे लोक वाहनांची डागडुजी झालीच पाहिजे असे हट्ट का करत नाही. नागरीक म्हणून प्रत्येकाची ही भूमिका आहे.

महागडे मोबाईल, आयपॅड, आयपॉड किंबहुना महागड्या गाड्या यांची खरेदी करताना हेल्मेटचा विचार फारच नंतर केला जातो. 'हेल्मेट वापरणे' हे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे त्याकरिता तात्काळ भूमिका बजावणे गरजेचे आहे. रस्ते अपघात हा ज्वलंत विषय आहे. त्यावर उपाय शोधण्यासाठी विचार करत देखील असताना आपण त्यापेक्षा माझी भूमिका काय ? हा विचार का करत नाही !



अनेकदा प्रौढव्यक्ती चालताना देखिल मध्यभागी अथवा विरूध्द बाजूने चालतात; त्यांचे हेच अवलंबन पुढील पिढी करते व त्यामुळे भरधाव वेगाने आलेली वाहने व अशा नागरीकांचा अपघात होतो. सर्व नागरिकांनी डाव्या बाजूने चालावे हा सर्वसामान्य वाहतुक नियम देखील सारे विसरतात. त्यामुळेच रहदारी नसलेल्या रस्त्यांवर देखील अपघातांचे प्रमाण वाढत आहे. साधारण नियमांचे पालन करणे इतके सहकार्य तरी देऊन प्रत्येकाने आपली भूमिका चोख बजावावी.

भारताची तरूण पिढी सुशिक्षित आहे. उच्चभ्रू, सुसज्ज अशा कुटुंबातील मुले गाड्या वेगाने चालवण्यात आपले कतुत्व मानतात व अपघाताचे बळी ठरतात. सुशिक्षित व्यक्तींसारख्या व्यक्तींनी तरी वेगाचे नियमन समजून घ्यावे. खरे कतुत्व वाहन योग्यरीत्या चालवून उत्तम नागरिक होण्यातच आहे, ही बाब ते का विसरतात ? अपघात टाळण्यासाठी या तरूण पिढीने सजग होऊन स्वतःची भूमिका मांडण्याची गरज आहे. त्यांच्या कृतीतून त्यांनी इतरांना शिकविले पाहिजे व जनजागृती करण्यास मदत केली पाहिजे.

परदेशातील विविध गोष्टींचे आपण अनुकरण करत असतो. तिकडचे विविध उपक्रम अंमलात आणतो; परंतु गरजेच्या गोष्टींकडे मात्र पुर्णतः दुर्लक्ष करतो. ज्याप्रमाणे त्यांच्या सर्वच गोष्टींचे अनुकरण का नाही ? त्यांचे वाहतुकीचे नियम, शिस्तपालन याबाबतीत आपण मागे राहिलो आहे. याच कारणांमुळे भारतीय वाहतुकव्यवस्था याविषयी कुणासही विशेष कौतुक नाही. परदेशांत सिग्नल यंत्रणेचे पालन, पादचारी पुलांचा वापर यांमुळे अपघातांचे प्रमाण भारताच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे आपण आपली भूमिका पार पाडतना परदेशी नियमावली, त्यांचे व्यवस्थापन यांचा आदर्श समोर ठेवावा.

रस्ते अपघात टाळण्यासाठी केवळ एकट्याने प्रयत्न करून नाही चालणार; कारण एकाच व्यक्तीने नियमन करून दुसऱ्या व्यक्तींनी तसे न केल्यास नियम पालन करणाऱ्यांचे नुकसान व न पालन करणाऱ्यांचेही नुकसान ! त्यामुळे हे अपघात टाळण्यासाठी आपली स्वतःची भूमिका ठामपणे व जबाबदारीने पाडणे फार गरजेचे आहे. विविध नशा, व्यसने करून वाहने चालविणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे. कायद्याने या प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा ही मिळतेच; परंतु रस्ते अपघातातील जे घटक विनाकारण आपले नुकसान, आपली हानी सहन करतात, ज्यांना शारिरीक अपंगत्व येते, त्यांचे काय ? काही पैसे मोजून आपण त्यांचे आयुष्य अथवा जिवंतपणी सोसलेले मृत्यूचे हाल भरून देऊ शकतो का ? तर नाही ! त्यामुळेच अशा घटना

टाळाव्यात. कोणाचे आयुष्य आपल्या वेगाने कमी करणारे आपण कोण? त्यामुळे सुरक्षितरीत्या वाहनांचा, प्रवासाचा आनंद घ्यावा, व्यसनांच्या आहारी जाऊन होणारे नुकसान टाळा.

प्रवासादरम्यान अनेकदा दोन व्यक्तींचे संवाद चालू असतात. त्यामुळे वाहनचालकाचे मन दुर्लक्षित होते. रस्त्यांवरून, दुचाकीवरून, गाडीमधून प्रवास करताना रस्त्याने चालताना कुणाशीही संवाद साधताना एकाग्रता भंग होते व त्यामुळे अपघात घडतात. त्यामुळे आपल्या जीवलगांच्या जीवनासाठीच संवाद साधताना परिस्थितीचे गांभीर्य बाळगावे. त्यामुळे प्रवास सुखकर होतो. तसेच कालांतराने संवाद साधल्यास संवादाचा देखील परिपूर्ण आनंद घेता येतो. आधुनिक सुविधांचा लाभ हा अनेकदा प्रवासात त्यायोगे रस्त्यात घेतला जातो. मोबाईलवरून मेसेज करणे, फोन लावणे, गाणे ऐकणे, टॅबवरून गेम खेळणे अशा अनेक कृती रस्त्याने जात असताना आपण चालत अथवा वाहनांतून जात असताना करतो. परंतु यामुळे रस्त्याकडील चौकस गोष्टींकडे लक्ष न जाता अपघातात त्याचे रूपांतर होते. त्यामुळे काळ व वेळ पाहून गोष्टींचा आनंद घ्यावा. रस्ते अपघातास आपल्या अनेक सवयी कारणीभूत ठरतात. त्यामुळे आपल्या या सवयी मोडाव्यात व त्याऐवजी वाहतुक व्यवस्थेस योग्य सहकार्य द्यावे.



मानवी कारणांव्यतिरिक्त बाहय घटक देखील रस्ते अपघातास कारणीभूत असण्याचा वाटा आहे. पारंपरिक वाहतुकव्यवस्था, सिग्नल यंत्रणातील दोष, सरकारी योजनांची दिरंगाई, रस्त्यातील खड्डे यांमुळे देखील वाहतुकीची गैरसोय, अपघात घडतात. आपल्यातील दोष, आपल्या सवयी यांप्रमाणे या गोष्टीदेखील बदलणे गरजेचे आहे. परंतु या गोष्ट बदलणे यांस अनेक वर्षांचा काळ लागू शकतो. त्या तुलनेत व्यक्तीबद्दल सहजशक्य व सोईस्कर आहे. आपल्याला मानवी जीवन जगण्याची मिळालेली अमूल्य संधी न गमावता, ह्या जीवनाचे महत्व समजून घेऊन रस्ते अपघात टाळा. मागे नमूद केलेल्या अनेक सवयी टाळल्यास, शक्य त्या सुयोग्य गोष्टींचा स्वीकार केल्यास अनेक सवयी टाळल्यास, शक्य त्या सुयोग्य गोष्टींचा स्वीकार केल्यास लवकरच भारत अपघातमुक्त होईल. व आपण आपली भूमिका या कार्यात मनोभावे पार पाडली याचे समाधान बाळगावे. सर्वांनीच स्वतःची भूमिका मांडून अनेक निष्पापांचे जीव वाचवावे व भारताचे नाव अपघातमुक्त देशांत गौरवाने घ्यावे.

*With Best Compliments From :*

**Bhavna Automobiles Pvt.Ltd.**



# रस्ते अपघात आणि माझी भूमिका

विद्या अशोक परब

रोज सकाळी वर्तमानपत्र हातात घेतल्यावर पहिल्या पानावर एकतरी अपघाताची बातमी ही असणारच, इतकचं नाही तर पावसाळा जवळ आला की रस्त्यांच्या बातम्यांचे पेव फुटलेले असते. ठळक बातमी म्हणून नेहमी वाचनात येणारी 'रस्त्यातील खड्डे की खड्डयातील रस्ते' आणि त्यामुळे होणारे अपघात. रस्ते, खड्डे आणि अपघात यांची सांगड कधीही न संपणारीच आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याकडून मग नोटीस पाठविली जाते. ठराविक तासांमध्ये रस्त्यातील खड्डे बुजवण्याचं काम पूर्ण झालं नाही तर त्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. त्याप्रमाणे कर्मचारी कामे करतात. खडीचे, डांबराचे पॅचेस लावले जातात. तात्पुरती मलमपट्टी केली जाते. पण काही अवधीतच रस्त्यातील खड्डे पुन्हा 'आ' वासून असतात.



खरं तर सरकार प्रत्येक नागरिकाकडून प्रत्येक गोष्टींचा करवसूल करते. त्यामुळे पुरेसा पैसा सरकारी कोट्यात जमा असूनही, रस्ता सुरक्षिततेसाठी त्याचा उपयोग का करत नाही? मुंबईसारख्या शहरामध्ये रात्रंदिवस लोकांची वाहनांची एवढी वर्दळ, असते की त्या रस्त्यांना क्षणभर मोकळा श्वासही घेता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये 'अपघात' हा शब्द घासुनघासून गुळगुळीत झाल्यासारखा वाटतो. याला कारण दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, वाढणारे वाहनांचे प्रमाण आणि दिवसेंदिवस होणारी रस्त्यांची दुर्दशा. रस्त्यांवरून जाणारा प्रत्येक नागरीक हा खड्डयातून जाणाऱ्या वाहनांतून प्रवास करताना अथवा खड्डयातील रस्त्यांवरून चालताना अनेक वेदना सहन करत असतो आणि आजाराला आमंत्रण देत असतो. कधी मानेचं दुखणं तर कधी मणक्याचं दुखणं, तर कधी गुडघेदुखी हे सगळे आजार नित्याचेच झालेले आहेत. त्यामुळे 'रोज मरे त्याला कोण रडे' असे हे नित्याचे व्यवहार तसेच चालूच राहतात.

तसं पाहिलं तर रस्ते हे सर्वांगिण विकासाचं पायाभूत सुविधांच एक महत्वाचं पाऊल समजलं जातं. इंग्रज आपल्या देशात व्यापारासाठी आले, हळूहळू दळणवळणासाठी, वाहतुकीसाठी रस्ते तयार केले. त्यामुळे व्यापार करणं त्यांना सहज सुलभ झाले. काही वर्षांपूर्वी दळणवळणाच्या, वाहतुकीच्या काहीच सोयी सुविधा नव्हत्या त्यावेळी सगळे व्यवहार पायी चालत जाऊन करावा लागत होते. त्यामुळे ते कष्टदायकही होत होते. पण रस्त्यांमुळे ती सोय झाली. आजही आपण या टोकांपासून त्या टोकांपर्यंत सहज प्रवास करू शकतो.

रस्त्यांचं हे जाळं खेड्यापाड्यांतून, गावातून, शहरामध्येही पसरत चालले आहे. पण आज २१ व्या शतकांही रस्त्यांची सोय झाली पण त्याचा दर्जा सुधारला गेला नाही. तसं पाहिलं तर रस्ते हे आपल्या

आयुष्याचा एक जणू घटक बनून राहीले आहेत. कारण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत काही मालगाडया तर बाहेरच जातात. रस्त्यांचा प्रवास चुकवायचा म्हटला तरी चुकवू शकत नाही. ते खाजगी वाहन असो वा सरकारी वाहन असो. रस्ते एकच.

एकदा मी माझ्या फॅमिलीसोबत दूर पर्यटनाला निघाले होते. बसचाच प्रवास होता. थंडगार वाऱ्याने मन प्रसन्न झालं होतं, कारण गाडीसुध्दा सुसाट पळत होती. मनाला आनंद मिळत होता. कारण गाडीला धक्के बसत नव्हते. सहज बाहेर डोकावून पाहिलं. सिमेंट कॉक्रीटचे रस्ते होते छान गुळगुळीत पाहता पाहता केव्हा डोळा लागला समजलाच नाही. पण झोपेतही जाणवत होते, गाडीला मंद, हळूवार धक्के बसत होते. डोळे किलकिले करून पाहिले डांबरी रस्त्यावरून गाडी जात होती. साखर झोपेची वेळ होती ती. पण आपण जणूकाही उंटावर बसल्यासारखे वाटत होते. तेव्हा लक्षात आलं सावधपणा बाळगणे गरजेचे होतं. एखादा अवयव निघून यायचा भीति वाटत होती. बाहेर पाहिल तर पेव्हरब्लॉक बसविलेला रस्ता होता.



खरं तर रहदारीच्या रस्त्यावर पेव्हरब्लॉक बसविणे हेच मुळात चुकीचे होते. ते पेव्हरब्लॉक उडालं तर, दात पडलेल्या म्हाताऱ्यासारखी तिथल्या रस्त्याची अवस्था वाटत होती. अशा या रस्त्यांमुळे प्रवासाची मजाच घालवली. कुठे, केव्हा, कसा रस्ता लागेल सांगता येत नव्हते. मे महिन्याच्या सुट्टीचे दिवस होते. रस्त्यावर दुर्तफा गाड्यांची गर्दी झाली होती. गाड्या खोळंबल्या होत्या बराच वेळ झाला, काय झालं ते समजेना. किती तास जातील तेही सांगता येईना. काही वेळानंतर समजलं, चिंचोळा रस्ता, रस्त्याच्या कडेला ना कठडा होता, ना रेलिंग होते. त्यामुळे गाडी रस्ता सोडून बाजूच्या झाडीत घुसली होती. प्रवाशांचे हालहाल झाले होते. त्यामुळे पूर्ण रात्र त्या रस्त्यातच गेली. रस्त्यावर दिवे नव्हते त्यामुळे कोणता भाग आहे ते समजेना, सगळीकडेच ट्रॅफीक जाम!

पोलिसांचा फौजफाटा होताच, पण तरीही छोट्या छोट्या गाड्या जागा मिळेल तशा वाट काढून हळूहळू कासवगतीने पुढे सरकत होत्या, मध्ये डिव्हायडर नव्हता. गाड्या उलटसुलट घुसखोरी करून जात होत्या. कोणती गाडी कोणत्या दिशेने जात होती हेच समजंत नव्हतं. पोलिसांनाही हा गुंता सोडवता सोडवता नाकीनऊ आली. बऱ्याच तासांच्या प्रयासाने गाड्या रांगेत सोडण्यास त्यांना यश आले, तेव्हा कुठे मोकळा श्वास घेता आला. तेव्हा खरी परिस्थिती जाणवली, याला जबाबदार कोण ?

सार्वजनिक बांधकाम खाते, चिंचोळा रस्ता, बेदरकारपणे, बेशिस्तपणे गाड्या चालवणारे वाहन चालक की प्रवास करणारे सामान्य नागरीक! आमची गाडी मार्गाला लागली, रात्रीची वेळ होती. थंडगार वारा मनाला उल्हासित करीत होता. मी खिडकीबाहेर निसर्ग पहात होते. रात्रीची वेळ होती. तरीही बाहेर रेडियमचे पट्टे चमकताना दिसले. काही सूचना फलकही मी वाचू लागले. 'अति घाई, संकटात नेई', 'जो वाढवी वेगाला तो आवडे यमाला' यांसारखे बरेचसे, फलक वाचतानाही मनात विचार आला, एवढे समयसूचकतेचे सावधगिरिचे फलक ठिकठीकाणी लावलेले असतानाही अपघात होतातच कसे ? याला जबाबदार कोण ?

ओव्हरटेक करणे, वेगाने गाडी पळविणे, लेन सोडून गाडी चालविणे. यामुळे काहीजण स्वतः बरोबर व्यवस्थित वाहन चालवणाऱ्यांचा नाहक जीव घालवतात. याल जबाबदार कोण ? मी बाहेत पहात होते ठिकठिकाणी एखादे ठिकाण, त्याचे नाव, कोणत्या मार्गाने जायचा त्याप्रमाणे बाण (ॲरो) दाखविलेले होते,

किलोमीटरची नोंद फलकही होते. खूप काही चांगल्या गोष्टी दृष्टीस पडल्या.

आमची गाडी आता शहराच्या दिशेने जात होती. रस्ते रूंद होते, पण रस्त्यावर दिवे नव्हते, त्यामुळे प्रत्येक गाडीवाला फूल अप्परची लाईट लावून चालवत होता. डिव्हायडर नव्हता, कुठे वळण घ्यायचे, उजव्या बाजूला,डाव्या बाजूला वळण घेण्याचे मार्गदर्शक फलक नव्हते, त्यामुळे गाड्या कशाही चालवत होते. आता रात्र संपून पहाट झाली होती. आमची गाडी आमच्या हॉटेलजवळ येत हाती. काही मिनिटांच अंतर होतं. तरीही गाडी बराच वेळ थांबली होती. बाहेर पाहिलं तर सिग्नल यंत्रणा न जुमानता काहीजण गाड्या वळवत होते. काही ठिकाणी स्पीडब्रेकर होते. काही ठिकाणी रेलिंग स्टीप्स होत्या. पण तरीही वेगमर्यादा सुसाट होती. सूचना फलक होते. 'पुढे गाव आहे, वाहने सावकाश चालवा,' तरीही गाडी वेगाने पुढे दामटत होते. अशाने अपघात होणार नाहीत तर काय होणार ?



शहर, गाव करत करत आमची गाडी नॅशनल हायवेवरून जात होती. नॅशनल हायवेसारख्या रस्त्यामुळे प्रवास फार लवकर, सुलभ आणि सोयीचा झाला आहे. चौपदरी दुर्तफा रस्ते त्यामुळे प्रवास आरामदायी, विमानातून प्रवास केल्यासारखं जाणवत होतं. हायवेवरही ताशी वेगमर्यादा लिहिलेली होती. तरीही ती वेगमर्यादा टाळून स्वतःच्या मालकीचा हायवे असल्याप्रमाणे गाड्या पळवतात, तिथेही अपघात होतात.

नॅशनल हायवेवरून गाडी छोट्या रस्त्यावर आली. नेहमीचा रहदारीचा रस्ता वाटत होता, तिथेही गाड्या रेंगाळत चालल्या होत्या खिडकीतून बाहेर पाहिलं तर रस्त्यावरच कचऱ्याच्या पिंपातून कचरा ओसंडून वाहत होता. सगळा रस्ता कचरामय झाला होता. कचऱ्याचं साम्राज्य पसरलं होतं. ओला कचरा, सुका कचरा, त्यातच गाय, बैल, कुत्रे त्याचा आनंद घेत होते, कचरा गोळा करणारेही त्यातच कचरा वेचत होते. प्रत्येक जण आपल्या कामात गर्क असलेला दिसत होता. यात पादचारी, वाहनचालक यांची मात्र तारेवरची कसरत चाललेली दिसली. क्षणभर मनात शंका आली हा रस्ता रहदारीचा आहे की कचऱ्याचं डंम्पिंग ग्राऊंड आहे ? पादचाऱ्यांना चालण्यासाठी फूटपाथ नाही. हे या सगळ्या गैरसोयी असूनही जनजीवन सुरळीत चाललं होतं. या सगळ्या प्रवासात मी खूप गोष्टी अनुभवल्या.

गेल्या २० वर्ष मी आमच्या स्वतःच्या वाहनात मिस्टरांच्या बाजूला बसून प्रवास करतेय. आज मी स्वतः वाहन चालविते. त्यातून निर्माण होणारे प्रश्न हे मला प्रकर्षाने जाणवायला लागले. पण अपघात घडून यायला खूप साऱ्या (वरील) गोष्टी कारणीभूत असतात. हेही मला जाणवलं.

१)सार्वजनिक बांधकाम खात्याने नागरिकांकडून केलेल्या करवसूलीचा पैसा नागरिकांच्या रस्ता सुरक्षिततेसाठी वापरावा.

२)सुरक्षित रस्ते, सुरक्षित आरोग्य

३)सिमेंट कॉंक्रीटचेच रस्ते बनवावेत. ते सर्व दृष्टीने सुरक्षित असतात, मजबूत असतात, डांबरी रस्ते, पॅच मारलेले नसावेत. वाहतुकीसाठी पेव्हरब्लॉक वापरू नयेत. ते हानीकारक असतात. फक्त फूटपाथसाठीच वापरावेत.

४)पेव्हरब्लॉकमुळे गाडीचे पार्ट्स खराब होतात. इंधन जास्त वाया जाते.

५)गाड्यांचा वेग मयादित ठेवण्यासाठी स्पीड ब्रेकर असतात. ते ठराविक अंतरावर, ठराविक उंचीचेच

असावेत. त्यावर पट्टे मारलेले (काळे पांढरे) असावेत. जेणेकरून स्पीड ब्रेकर आहे हे लक्षात येईल.

६)रेडियमचे पट्टे लावलेले असतात.

७)रस्त्यांवर दिवे असणे अत्यंत आवश्यक आहेत. शहरांसारख्या ठिकाणीही रस्त्यांवर दिवे नसतात. त्यामुळे अप्पर लाईट मारून वाहन चालवले जाते. विरूध्द दिशेने येणाऱ्या वाहन चालकाला त्याचा त्रास होतो.

८)डिव्हाडर असणे आवश्यक, ते सुध्दा ठराविक उंचीचे असावेत. अन्यथा छोट्या डिव्हायडरवरूनही गाड्या वळवल्या जातात.

९)वाहनांच्या दृष्टीने रस्त्यांच्या कडेला सुरक्षिततेसाठी कठडा, अथवा रेलिंग असणे आवश्यक.



१०)फूटपाथ हे पादचाऱ्यांना चालण्यासाठीच असावेत, माल विक्रेत्यांसाठी नसावेत.

११)कचऱ्याच्या कुंड्या रस्त्याच्या कडेला असाव्यात. सगळा रस्ता कचरामय होतो. प्रदूषण वाढते, जंतूचा प्रचार जास्त होतो. जंतू वाढतात, दुर्गंधी पसरते.

१२)घाटातील वळणे तीव्र नसावीत. घाटातही सुरक्षिततेस रेलिंग असावेत. जाणाऱ्या, येणाऱ्या वाहनांसाठी वेगळे रस्ते असावेत.

१३)वाढती लोकसंख्या आणि वाढते वाहनांचे प्रमाण यांचा विचार करता अपुऱ्या जागेअभावी आपण रस्त्यांची रूंदीकरण जास्त प्रमाणात करू शकत नाही. याचा विचार करता, अपघाताच्या दृष्टीने प्रत्येक वाहनांसाठी वेगवेगळी लेन असावी.

१४)टू व्हिलर साठी वेगळी लेन, फोरव्हिलरसाठी वेगळी लेन आणि त्याच लेनमधून गाडी जाणे सक्तीचे करणे आवश्यक. अपघात टळतील, ट्रॅफीक वाढवणार नाही.

१५)बऱ्याच वेळा रस्त्याचे खोदकाम चालू असते. कधी पाईपलाईन टाकण्यासाठी तर कधी, एम.टी.एन.एल. च्या कनेक्शन्स टाकण्यासाठी, रस्ते खोदले जातात, पण व्यवस्थित बुजविले जात नाही यांमुळे खड्ड्यांचा त्रास होतो.

१६)बऱ्याच वेळा ड्रेनेज उघडे ठेवल्यामुळे अपघात झालेले आपण ऐकतो. ते उघडे ड्रेनेज वेळेवर बंद करणे आवश्यक.

१७)टू व्हिलर गाड्यांसाठी डोक्यात हेल्मेट वापरणे सक्तीचे. तसेच फोरव्हिलर वाहनचालकांनी पट्टा लावणे (सीटबेल्ट) आवश्यक.

१८)गाडी चालवताना मोबाईलवर बोलणे,सक्तीचे बंधनकारक ठेवणे गरजेचे.

१९)रस्त्यातील सिग्नल यंत्रणा पाहणे आवश्यक आहे. सिग्नल तोडल्यास दंड आकारावा. ह्या गोष्टी काही ठिकाणी होतात. पण बऱ्याच ठिकाणी सिग्नल यंत्रणा पाळली जात नाही. त्यासाठी मीरा भाईंदर शहरांमध्ये सध्या (दक्षिण-कोरीयानी या कंपनीने पाठविले) कॅमेरे बसविले आहेत. त्यामुळे सिग्नल तोडणाऱ्या वाहनांचा नंबर टिपता येणार आहे. त्यामुळे तेथे काम करण्याचा पोलिस प्रादेशिक परिवहन विभागातून संबंधित वाहन चालकाचा पत्ता मिळवून त्याचा दंडाचे बील पाठविता येणार आहे. असे कॅमेरे बसविणे अत्यंत गरजेचे आहे. (संदर्भः वृत्त सामना-मंगळवार ४ डिसेंबर)

२०)प्रत्येक ठिकाणची सिग्नल यंत्रणा कार्यरत असावी.

२१)अतिक्रमणे टाळावीत. गाडी पार्कीगसाठी ठरवून दिलेल्या बाजूलाच गाड्या पार्क कराव्यात, तसे न केल्यास दंड आकारण्यात येतो. तरीही दुकानासमोर, तर कधी कधी रस्त्यात उभी केली जाते. त्यामुळे ट्रॅफीक जाम होते.

२२)चुकीच्या दिशेने गाडी पार्क केल्यास त्याच्याकडून दंड वसूल केला जातो. ते सक्तीचे असावे.

२३)रस्ते ही सरकारी मालमत्ता आहे हे लक्षात ठेवूनच प्रत्येक वाहन चालकाने गाडी चालवावी.

२४)सार्वजनिक बांधकाम खात्याने दरवर्षी टेंडर पास करताना प्रत्येक वेळी वेग वेगळ्या कॉन्ट्रॅक्टरचे टेंडर पास करावे. अन्यथा रस्ते बांधकामाच्या सामानामध्ये भेसळ केली जाते, आणि रस्ते खच्चीकरण हाते.

२५)सरकारने वाढत्या वाहनांना बंदी घातली पाहिजे. उदा. एका नागरिकांच्या तीन ते चार गाड्या रस्त्यांवर धावत असतील तर प्रत्येकाच्या गाड्या किती धावतील, आणि किती धावत आहेत. त्यामुळे त्याला आळा बसणे गरजेचे आहे. एका नागरिकामध्ये एवढ्या गाड्या असा नियम करणे सक्तीचे आहे, त्यामुळे गाड्यांची संख्या वाढते, इंधन विभागल जाते.

२६)वाहन चालकाला वयोमर्यादा असणे अत्यंत निकडीची गोष्ट आहे. कारण आजकाल दहा, बारा वर्षापासूनच मुलेमुली वाहन चालवितात आणि मुलांची होणारी गैरसाय पाहून गाड्या हाताळायला दिल्या जातात.

२७)वाहन चालवितांना योग्य त्या वेळी योग्य सिग्नल देऊन गाडी चालविणे आवश्यक.

एक जबाबदार नागरीक म्हणून प्रत्येकाने रस्ता सुरक्षिततेसाठी स्वतःच्या संरक्षणासाठी वाहन चालवितांना काळजी घेणे आवश्यक आहे. खरं सांगायचं तर आपल्या देशातील कायदे हे फक्त कागदोपत्रीच केले जातात. कायदयाचे कडक पालन केल्यास, अपघातांना आळा बसेल. सार्वजनिक बांधकाम खाते, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे गरजेचे आहे. परदेशातील नियम आणि आपल्या देशातील नियम यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. आपल्या इथे कायदे धाब्यावर बनविले जातात. सध्याच्या परिस्थितीत वाढणारा चंगळवाद, चैन करण्याची प्रवृत्ती, बेफिकीरपणा, बेशिस्तपणा यांच्या दिवसेंदिवस वाढण्याच्या प्रमाणामुळे अपघात होतात. नाहक जीव यात मारले जातात. एका बोटाने कधी मुठ वळत नाही तर पाच बोटांनी मुठ घट्ट बांधली जाते. म्हणजे प्रत्येक घटक अपघातास कारणीभूत असला तरी एक सुरक्षित आणि जबाबदार नागरीक म्हणून समाजामध्ये वावरताना, समाजातील घटकांना आपल्याकडून कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. मी आणि माझे कुटुंब जसे सुरक्षित राहिले पाहिजे, तसेच इतरांचेही कुटुंब सुरक्षित राहिले पाहिजे ही जबाबदारी प्रत्येक नागरीकाची आहे. मी माझ्याकडून रहदारीचे सर्व नियम पाळते. पण समोरून येणारे वाहन नियम तोडून सुसाट जाते. त्यावेळी जाणवतं की कायदे हे एवढे कडक असावेत की त्याचक्षणी त्या वाहनाला शिक्षा झाली पाहिजे. आपल्याकडे असलेल्या सोयी-सुविधा अजिबात कमी नाहीत. फक्त त्याची योग्यरितीने उपयोजना करणे हे आपल्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मग उशीर कशाला करायचा.

**'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे'**


***With Best Compliments From :***

**PRATAP TRAVELS**



Bus on Contract
School, Factory, Buses & Picnics

**M. :** 9821143090 / 9969071906

Shop No.2, Nitin Company Junction, Sable Wadi, Panch Phakadi, Near Highway Signal, Thane (W.) - 400 601.

**Emal :** pjadhav.travels@gmail.com

# रस्ते अपघात आणि माझी भूमिका

अशोक पाडुरंग धुमाळ

आजकाल सर्वांचेच दैनंदिन जीवन अत्यंत धावपळीचे, धकाधकीचे भीतियुक्त बनलेले आहे. ह्यात भरीस भर पडते ती 'या रस्त्यावरील अपघातांची'. या बाबतीत एकूणच परिस्थिती लक्षात घेता हे रस्त्यांवरील अपघात ही एक चिंतेची बाब आहे व दिवसेंदिवस ते वाढतच आहे. याला कारणे अनेक असतील पण ही वस्तुस्थिती नजरेआड करता येत नाही. म्हणूनच प्रत्येकानेच सतर्क राहून आपापली भूमिका (समाज जीवनातील आपला रोल) नीट समजून-उमजून घेतला तर होणारे अपघातच नव्हे तर सदृश्य असे अनेक अनर्थही टाळता येतील. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने योग्य ती काळजी घेऊन रस्त्यावर वावरताना सावधानता बाळगली पाहिजे. रस्त्यावरील नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. आज लोकसंख्येची बेसुमार वाढ झालेली आहे. लोकसंख्येचा प्रचंड विस्फोटच झालेला आहे. त्याचा परिणाम (दुष्परिणाम) सर्वच क्षेत्रांवर झालेला दिसून येत आहे. अर्थात रस्ते व त्यावरील वाहतूकही त्याला अपवाद राहिलेली नाही. अर्थात त्यावरील नियंत्रणासाठी सर्वतोपरीने प्रयत्नही होताना दिसतात. तसेच रस्त्यावरील दाट गर्दीतून योग्य तो मार्ग काढण्यासाठी अनेक उपाययोजना अंमलात आणल्या जात आहेत. तरीही रस्त्यावरील अपघात होतच आहेत.



रस्त्यावरील अपघात हे सर्वसामान्यपणे चार घटकांमार्फत होत असतात. त्यात (१) वाहनचालक (२)पादचारी (३) फेरीवाले (Hawkers) (४) रस्ता बांधणारे किंवा रस्त्यांची दुरूस्ती करणारे अभियंता किंवा ठेकेदार या घटकांचा प्रामुख्याने समावेश होत असतो. या घटकांच्या कळत नकळत घडणाऱ्या अयोग्य वर्तनातून रस्त्यावरील अपघात घडून येत असतात. या सर्वात अपघाताला जास्त कारणीभूत ठरणारा घटक म्हणजे वाहनचालक होय. मग तो खाजगी वाहनचालक असेल किंवा सरकारी वाहनचालक कर्मचारी असेल! त्यांची रस्ते अपघातातील अक्षम्य अशी भूमिकाच त्याला कारणीभूत ठरते. थोड्या अधिक आर्थिक लाभासाठी कांही वाहनचालक अविश्रांत कार्यमग्न असतात. सततची ड्युटी करीत राहतात. अशावेळी त्यांच्या हाती असणारे वाहन जरी इंजिनप्रमाणे असेल तरी ते चालविणारे हात मात्र मानवी शरीराचे असतात व हे मानवी शरीर थकूनच जाते. त्यावर एक अघोरी उपाय म्हणून हे वाहनचालक नशापाणी करून वाहनावर आरूढ होत असतात. साहजिकच त्यांच्याकडून अगदी नकळतच बेदरकारपणे गाडी चालविली जाते आणि त्यामुळे त्यांच्या हातून घडू नये असा भयानक अपघात घडला जातो. त्यामुळे त्यांच्या जिवाला जसा धोका संभवतो तसाच तो इतरांच्याही जीवाला संभवत असतो. आपल्याबरोबर तो इतरांनाही दुःखाच्या खाईत लोटत असतो. याशिवाय आपल्यावर आपल्या कुटुंबाची तसेच इतरांचीही जबाबदारी आहे. याचे भान त्या क्षणी त्याला नसते. इतरवेळी मात्र त्याला हे सारे

ज्ञात असते. सारे कळते पण ऐनवेळी वळतेच असे नाही. हीच तर खरी शोकांतिका आहे! या भयाण वास्तवाची जाण, प्रसंगांचे गांभीर्य ज्यादिवशी या साऱ्या वाहनचालकांना होईल तो दिवस सोनियाचाच मानला पाहिजे! कांही वाहनचालक आपल्या वाहन चालविण्याच्या कौशल्याचा नको तितका आत्मविश्वास, अभिमान बाळगत असतात आणि त्या धुंदीत अगदी बेछूटपणे गाडी चालवितात. कित्येकदा असेही होताना दिसते की, एखादा वाहनचालक, 'कधी एकदाची ड्युटी संपते आणि कधी आपल्या घरी जातोय!' अशी घरी जाण्याची घाई आणि अशी ही घाईच त्याला दाखविते दु:खाची खाई! मोठाच अपघात घडला जातो. एकंदरीत काय तर अशा पूर्णपणे दुर्लक्षित गोष्टींमुळे वाहन चालकांकडून अगदी नेहमीच नसले तरी वरच्या वर रस्त्यांवरील अपघात होत असतात. एक अगदी साधा नियम. 'वाहन चालवित असताना ड्रायव्हरने कुणाबरोबर बोलू नये!' पण याबाबतीतही अगदी पूर्णपणे नियमबाह्य वर्तनच दिसून येते. एस.टी. ड्रायव्हर कंडक्टरबरोबर तर खाजगी वाहनचालक गाडीतील इतर व्यक्तींशी अगदी सुखनेव वार्तालाप करीत असतो. याविषयी त्याला योग्य तो सल्ला दयावा ; तर उलट तोच आपल्याला चार गोष्टी अधिक सुनावतो. 'अहो काही होणार नाही. काय होणार, एकदा कधीतरी मरायचेच आहे ना ?' असेच काहीसे निराशाजनक, औदासिन्य आल्यासारखे बोलत असतो.



खरं तर वाहनचालकाने आपल्याला उपलब्ध असलेल्या सोयी- सुविधांचा योग्य तऱ्हेने वापर केला तर कितीतरी अपघात तो टाळू शकतो. उदा. वाहनचालकाने आपल्या वाहनाच्या दुतर्फा बसविलेल्या आरशांचा सुयोग्य वापर, उपयोग केला पाहिजे. एखाद्या ठिकाणी वाहन थांबवून, चहापानासाठी खाली उतरताना वाहन यंत्राला लावलेली चावी तशीच न ठेवता, ती काढून घेतली पाहिजे. निर्गम स्थानावरून वाहन घेऊन निघताना त्याची योग्य ती तपासणी केली पाहिजे. आपले वाहन इंजिनप्रणित असल्यामुळे त्यातील पेट्रोल-डिझेल कितपत आहे. चाकातील हवा इंजिनमधील पाणी इ. साऱ्या गोष्टी नीट तपासून मगच आपले वाहन हाती घ्यावे म्हणजे रस्त्यात मध्येच गाडी बंद पडणार नाही वा अन्य काही अनर्थ उद्भवणार नाही, साऱ्यांचीच गैरसोय अडचण होणार नाही. तसेच सुरक्षा यंत्रणेने ठिकठिकाणी (विशेषतः घाटमाथ्यावर, धोक्याच्या वळणांवर) लावलेले बोर्ड, हे तर सावधानतेचे इशारेच असतात. पण त्याही बाबतीत लक्षात कोण घेतो ? अशीच स्थिती आढळून येते. या सर्वच बाबतीत वाहन चालक सतर्क राहून आपली भूमिका योग्य पार पाडील, तर निश्चितच रस्ते अपघात बऱ्याचशा प्रमाणात कमी होतील किंबहुना होणारच नाहीत.

रस्ते अपघाताशी निगडीत असा दुसरा घटक म्हणजे रस्त्यावरून पायी-पायी चालणारे पादचारी! 'पादचारी सडकपर!' रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे. रस्ता ओलांडतना झेब्रा-क्रॉसिंग वरूनच रस्ता ओलांडा या व अशा अनेक सूचनांचे फलक लावलेले असले तरी त्यांच्याकडे पूर्णपणे डोळेझांकच केलेली दिसून येते. कित्येक पादचारी आपल्याच मस्तीत मुख्य रस्त्यावरूनच चालताना दिसतात. रस्ता हा फक्त आपला आणि आपल्याच मालकीचा आहे, अशाच अविर्भावात त्यांचा प्रवास सुरू असतो. मोठमोठ्या शहरातून रस्त्यावरून भरधाव वेगाने वाहणाऱ्या वाहनांची वर्दळ सतत चालू असते. तरीही कसलीही पर्वा न करता पादचारी रस्त्यावरून निर्धास्तपणे चालत असतात. वाट्टेल तिथे आणि वाट्टेल तसा रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करीत

असतात  आणि त्यामुळेच रस्त्यावरील अपघात घडून येतात.  अशावेळी त्या संबंधीत वाहनचालकाचा काहीच दोष वा अपराध नसतांना तो मात्र साऱ्यांच्याच दोषास पात्र ठरतो.  पण इथे खरोखरच, आम्ही पादचारी जबाबदारीने वागतो कां? आमची भूमिका नीटपणे पार पाडीत असतो कां? मोठा अंतर्मुख होऊन विचार करावयास लावणारा प्रश्न आहे  आणि त्याचे उत्तरही सरळ साधेच आहे.  मुळीच नाही! आम्ही पादचारी आमची भूमिका नीट पार पाडत नाही , खरं तर पादचारीपथ (फूटपाथ) हा पायी पायी चालणाऱ्या प्रवाशांसाठी असतो.  सातत्याने त्याचाच वापर करावयास हवा. एकमार्गी पथ,द्विमार्गी पथ, पादचारी पथ, पथदिवे, सिग्नलस व वळणावरील वाहतूक अशी सारी व्यवस्था, सुरक्षा यंत्रणेने केलेली असते. पण आपण मात्र त्यांचा पुरेपूर लाभ उठवित नाहीत.  उलटपक्षी नको त्याच गोष्टी करीत असतो. भर स्त्यावरून आपण पादचारी (कधी कधी रस्त्याच्या मधोमध ही) चालण्याचा द्राविडी प्राणायाम करीत असतो.  अगदी बागेत फिरायला जावे तसे गप्पाटप्पा करीत चालत असतो.  साहजिकच त्याचा परिणाम व्हायचा तोच होतो.  रस्त्यावरील अपघात अटळ होऊन बसतात. पादचारी फूटपाथचा वापर कां करीत नाहीत, तेच कळत नाही. वास्तविक त्यांच्यासाठी तोच खरा राजमार्ग असतो.  त्यांच्यावरून मार्गक्रमण करण्यात कसलाच धोका संभवत नाही.  कांही पादचारी मात्र याबाबतची आपली भूमिका व्यवस्थितपणे पार पाडीत असतात. त्यात अगदी वयोवृध्द मंडळीही असतात.  अशाच एक आजी  एका शहरवजा खेड्यात, बालवाडीतील मुलांचे दाईत्व (मुलांना शाळेत ने -आण) करणाऱ्या साठ-सत्तर वर्षाच्या आजी मी पाहिल्या. रस्त्यावरून चालण्याविषयी आजी त्या लहानग्यांना सांगत होत्या, 'मुलांनो, मोठ्या रस्त्यावरून नाही चालायचं, त्याच्या बाजूच्या वाटेने चालायचं... मातीचा रस्ता आपला आहे.'  आणि काय आश्चर्य ती सारी चिमुरड्यांची पलटण एका रांगेत आजीच्या पाठोपाठ चालत होती. अशा प्रकारे रस्त्यावरून पायी पायी चालताना कोणत्या मार्गाने कसे चालावे यांची यथायोग्य भूमिका बजावणाऱ्या प्रात्यक्षिक त्या लहानग्यांना दाखविण्याचा त्या आजींना मी मनापासून धन्यवादच दिले.  रस्त्यावरील प्रवासाचा हा संस्कार त्या चिमुरड्यांना किती बरे प्रेरणादायी ठरणारा आहे. भविष्यात ही मुले रस्त्यावरील चालण्याची आपली भूमिका निश्चितच उत्तमपणे पार पाडतील व त्यामुळे अपघातही घटतील. म्हणूनच या लहानग्यांप्रमाणे प्रत्येक पादचारी व्यक्तीने आपली भूमिका पार पाडली तर रस्ते अपघात घडणारच नाहीत.  पण या उलट स्थिती दिसून येते ती कॉलेज युवक-युवतींमध्ये! पादचारी म्हणून चालताना रस्त्यावरील नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे, त्याबाबतची आपली भूमिका आदार्शवत असावी. अशी अपेक्षा ज्यांच्याकडून करतो तो युवा वर्गच अगदी स्वैरपणे रस्त्यावरून हिंडता फिरतांना दिसतो. घोळक्या घोळक्याने गप्पा मौजमजामस्ती करीत जाणाऱ्या या मंडळींना कसलाच धरबंदच राहत नाही. मग यातूनच रस्त्यावर अपघात घडतात. हे सारे टाळावयाचे असेल तर प्रत्येक पादचारी व्यक्तीने मग ती वृध्द, प्रौढ वा युवक-युवती असो.  प्रवासाच्या योग्य त्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. आपापली भूमिका नीटपणे पार पाडलीच पाहिजे. तरच 'रस्ते अपघातावर'  नियंत्रण येईल.



यानंतरचा,रस्ते अपघात ज्यांच्यामुळे घडून येतात तो घटक म्हणजे फेरीवाले विक्रेते! फेरीवाल्यांचाही वर्ग फार मोठ्या प्रमाणात रस्त्यावरील अपघात घडवितात. रस्ते मग ते छोटे मोठे असोत ते केवळ वाहतुकीसाठी वाहनांसाठी व प्रवाशांसाठीच असतात.  पण तेच रस्ते,

या फेरीवाल्यांसाठी दुकानांची जागा म्हणून वापरण्यात येणाऱ्या रस्त्यावरच ही मंडळी मोठ्या दिमाखात आपली दुकाने थाटतात. परिणामी वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन रस्त्यावर अपघात घडतात. त्यांच्या दुकानांनी व्यापलेली रस्त्यांची जागा, प्रवाशांची जा-ये, वाहनांची वर्दळ या साऱ्यांमुळेच धोकादायक स्थिती निर्माण होत जाते व त्याचे पुर्नवसन एखाद्या मोठ्या अपघातात होते. या फेरीवाल्यांचा हा व्यवसाय हा त्यांच्या पोटापाण्याचा व्यवसाय असला तरी अशा तऱ्हेने रस्त्यावरच हातपाय पसरीत असेल तर ते मात्र बिलकुल समर्थनीय नाही. ते अयोग्यच आहे, फेरीवाल्यांना ती आपला हक्क (विक्रेत्यांचा कोणताही व्यवसाय करण्याचा) बजावताना आपल्यावरील कर्तव्याचीही जाण ठेवावयास हवी. त्यांनी आपला व्यवसाय हातगाडीच्या माध्यमातून वा डोईवर पाटी घेऊन दारोदार हिंडून करावयास हवा. फेरीवाल्यांचा हा रस्त्यावरील व्यवसाय अगदी राजरोसपणे चालू असतो. करण त्यास उत्तम साथ मिळते ती रस्त्यावरून जा-ये करणाऱ्या ग्राहकांची! हे खरेदी करणारे ग्राहक सर्वसामान्यच नव्हे तर अगदी उच्चभ्रू वर्गातील नागरीकच असतात आणि त्यामुळे रस्त्यावरील अपघाताही हे फेरीवाले जितके जबाबदार तितकेच हे सर्वसामान्य नागरीकही जबाबदार असतात अशा फेरीवाल्यांकडून माल खरेदी केलाच नाही तर त्यांची दुकाने आपोआपच बंद होतील व रस्ता प्रवाशांसाठी नेहमीच मोकळा राहील. फेरीवाल्यांनीही याबाबतचे निश्चित धोरण स्विकारून योग्य ती भूमिका घ्यावी म्हणजे 'रस्ते अपघात' त्यांच्यामुळे होणार नाहीत.

रस्ते अपघात घडवून आणणारा आणखी एक घटक म्हणजे रस्त्यांचे बांधकाम करणारे किंवा त्यांची डागडुजी करणारे बांधकाम अभियंता किंवा ठेकेदार (कॉन्ट्राक्टर) होय. सार्वजनिक बांधकाम खाते त्या त्या ठिकाणच्या रस्त्यांच्या आवश्यक मागणीप्रमाणे पुरवठा करीत असते. संबंधीत अभियंताकडून टेंडर मागवून ते पास करताना त्यांना रस्ता बांधण्यासाठी किंवा दुरूस्ती करण्यासाठी परवाना दिला जातो. एकदा कां असा परवाना मिळाला की संबंधित कॉन्ट्रॅक्टर्स आपल्या मर्जीनुसार बांधकामाला सुरूवात करतो. मग कित्येकदा त्यासाठी लागणारे मटेरीयल (दगड, वाळू, सिमेंट, डांबर) अगदी निकृष्ट दर्जाचे वापरण्यात येते किंवा सिमेंट डांबराचा वापर अत्यल्प वापर केला जातो.




अशा तऱ्हेने बनविलेले हे रस्ते अगदी अल्पावधीतच खराब होऊन जातात. असे रस्ते मध्येच खचतात. जागोजागी खड्डे पडतात, ते वाढतच जातात आणि मग पावसाळ्यात पावसाच्या माऱ्याने या खड्डेमय रस्त्यांची अक्षरशः चाळणच होत जाते, पार दुर्दशाच होऊन जाते. रस्त्यावरील खड्ड्यात पाणी साचून त्यांची डबकी, तळीच बनतात. अशा खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यावर एक प्रकारे अपघातांची मालिकाच सुरू होते. कधी एखादी माणसांनी खचाखच भरलेली एस.टी. बसच उलटली जाते तर कुठे गॅस सिलेंडर्सनी भरलेला ट्रक उलटून प्रचंड स्वरूपात आगही लागते. तर कुठे खड्ड्यांमुळे रस्त्यांच्या अस्तित्वाचा अचूक अंदाज न आल्यामुळे एखादी मोठी बसच खोल दरीत कोसळते. अशा या अपघातात प्रचंड वित्तहानी, जिवितहानीही होत असते. या सर्वच गोष्टीमागे रस्त्यांचे कच्चे बांधकाम व ते करणारे ठेकेदार किंवा अभियंताच जबाबदार नाहीत कां? त्यांच्या अयोग्य वर्तनामुळे, हलगर्जीपणामुळे किंवा अधिक आर्थिक लाभ उठविण्याच्या लोभापायी हे सारे घडत असते. इथे या संबंधीत मंडळींनी

समाजहिताच्या दृष्टीने थोडा जरी विचार केला तरी कितीतरी असले हे अपघात, अनर्थ टाळता येतील. आपला व्यवसाय करताना तो किफायतशीर व्हावा अशी इच्छा बाळगणे यात काहींच गैर नाही पण अधिकाधिक आर्थिक लाभ उठविण्यासाठी, निकृष्ट दर्जाचे मटेरीयल वापरून आपला कार्यभार कसा तरी आटोपून देणे हे सर्वस्वी चूकीचेच नव्हे तर ती नैतिकदृष्टया चोरीच आहे. म्हणूनच रस्त्यांची कामे करणाऱ्या या मंडळीनी केवळ नफ्यातोट्याचा विचार न करता लोकहिताची भूमिकाही घेतली पाहिजे. खड्ड्यामुळे रस्त्यावरील अपघात होणार नाहीत याची पुरेपूर दक्षता घेतली तर आपण केलेल्या कामाचे आणि श्रमांचेही सार्थकच होईल.  आपणही त्याच समाजाचे एक अत्यावश्यक घटक आहोत. त्यामुळे आपण समाजविरोधी भूमिका घेऊन चालणार नाही. रस्त्यांवरील अपघात हे रस्त्यांच्या निकृष्ट बांधकामांमुळे होणार नाहीत याची योग्य ती खबरदारी कॉन्ीक्टर्स, इंजिनियर्सनी घेतली तर त्याची योग्य ती दाद समाजाकडूनही मिळतेच आणि म्हणूनच या संदर्भात रस्ते अपघातांना आपण दुरान्वयेही कारणीभूत होणार नाहीत हीच भूमिका या संबंधितांनी घेतली पाहिजे.

एकंदरीत काय तर रस्ते अपघात किंवा रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकानेच आपली यथायोग्य भूमिका बजावली पाहिजे.  त्यासाठी केवळ वर उल्लेख केलेल्या घटकांचाच समावेश आहे असे नव्हे तर अगदी सामान्य नागरीकापासून ते उच्चवर्गीयांकडूनही आपली भूमिका नागरी जीवनाला परिपोषकच असावी. त्यासाठी हक्कांबरोबरच कर्तव्याची जाण ठेवली तर किती तरी अप्रिय गोष्टी टाळता येतील. रस्त्यावरील अपघातही त्यातीलच एक बाब आहे.  योग्य निर्णय, योग्य भूमिका घेऊन तीही आपल्याला टाळता येऊ शकते.


***With Best Compliments From :***




**Merin Joseph**
**& Anand Rayban**





**सुरक्षा अभियान ट्रस्टने** आयोजित केलेल्या निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेच्या सर्व प्रायोजकांचे आभार त्याचबरोबर निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून पत्रकार विद्या राणे सराफ यांनी काम पाहिले तर ठाणे भारत स्काऊटस् आणि गाईडस् ठाणे विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेसाठी जिल्हा चिटणीस श्री. सतीश कोल्हे यांनी काम पाहिले. या सर्व परीक्षक तसेच, स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे आभार

# कविता

## सायकलची कथा, वाहनांची व्यथा

*होऊनी सुसाट, बेदरकार, बेभान। करूनी मद्यपान ।*
*न पाळता वेगाचे भान । वाहन कोणी चालवू नये ।।१।।*

*नियम तोडून वागू नये। ओव्हरटेक कधींच करू नये ।*
*रस्त्यात उजवीकडे उतरू नये। उतारू प्रवाशांनी ।।२।।*
*गाडीत काडेपेटी पेटवू नये। गाडीत लाईटर पेटवू नये ।*
*गाडीत धुम्रपान करू नये। पेट्रोल आहे ज्वलनशील ।।३।।*
*सतत ब्रेक दाबू नका। क्लच सारखा दाबू नका ।*
*इंधन फुकट घालवू नका। इंधन झाले महाग ।।४।।*

*वाहने उगाच चालवू नका। प्रदूषण वाढेल विसरू नका।*
*श्वास मोकळा गमवू नका । शहरांत रस्त्यावर ।।५।।*
*गाडी भरधाव चालवू नये । अचानक ब्रेक लावू नये ।*
*मोबाईलवर बोलू नये । सुरक्षित चालवा वाहने ।।६।।*
*दुचाकीवर वापरा हेल्मेट । चार चाकीत लावावा बेल्ट ।*
*गाडी नियमाने चालवा नीट । सर्वांच्या सुरक्षेसाठी ।।७।।*

*गाडी भरधाव चालवू नये । रस्त्यात तेल सांडू नये ।*
*तेलावर गाडी चालवू नये । घसरण्याची असते भीति ।।८।।*
*रस्त्यात खड्डे खणू नका । रस्त्यात काचा टाकू नका ।*
*रस्त्यात खिळे टाकू नका । गाडीचा टायर फुटतो ।।९।।*
*शहरात सायकल चालवावी । सायकलची महती सांगावी ।*
*पर्यावरणाची काळजी घ्यावी । सायकल चालवून ।।१०।।*

*वायू, ध्वनी प्रदूषण वाढले । प्रदूषणाने आजार वाढले ।*
*औषधांचे व्यापार वाढले । आपल्या भारत देशामध्ये ।।११।।*
*सायकलचा विचार व्हावा । सायकलचा प्रचार करावा ।*
*सायकलसाठी आग्रह धरावा । प्रदूषण रोखण्यासाठी ।।१२।।*
*चीनमध्ये सायकलसाठी रस्ते । जपानमध्ये सायकलसाठी रस्ते ।*
*भारतामध्ये सायकलसाठी रस्ते । कधी निर्माण होणार? ।।१३।।*

*चीन पेट्रोलचे महत्व जाणतो । जर्मनी इंधनाचे महत्व देतो ।*
*भारतीय माणूस उधळण करतो । परकीय चलनाची ।।१४।।*
*इंधन आता स्वस्त नाही । पार्किंगला जागा शिल्लक नाही ।*
*सायकलला इथे प्राधान्य नाही । ह्या भारत देशांमध्ये ।।१५।।*
*चीनचे परकीय चलन वाचते । जपानचे परकीय चलन वाचते ।*
*भारताचे चलन वाया जाते । वारेमाप इंधन आयातीवर ।।१६।।*

*सायकलचा अभ्यास व्हावा सखोल । शुध्द हवेचे जाणावे मोल ।*
*सुखी करावे जीवन अनमोल । आपले आणि भावी पिढीचे ।।१७।।*

**सुरेश रघुनाथ पित्रे**

# *मी रस्ता बोलतोय*

मी रस्ता बोलतोय, होय मी रस्ता बोलतोय
अंगावरल्या जखमांनी, मी विव्हळतोय
माझ्याकडे लक्ष द्यायला , इथे कुणालाच वेळ नाही
तरी तुमची साथ सोडायला, मी मात्र तयार नाही

सकाळपासून सुरू होते, तुमचे गाड्यांवरून जाणे-येणे
कोणाचे असते भराभर चालणे तर कोणाचे पळत पळत जाणे
तुमचे आणि माझे आहे, युगायुगाचे नाते
आनंद आणि दुःखातही , जनता रस्त्यावरच येते

तुमच्यांपैकी काहीजण, काहीजण खूपच वाईट वागतात
घाण टाकून माझ्या अंगावर, मागच्या मागे पळतात
कचराकुंडी असताना, ते असे का वागतात
पिचकारी मारून माझ्यावर, मलाच नावे ठेवतात

मला फोडून, खणून वेळोवेळी, अपघात माझ्यावर करतात
खड्डे पाडून माझ्यावरती, बुजवायचे मात्र विसरतात
या खड्ड्यात मग पडल्यावर,मलाच नावे ठेवतात
स्वतःच्या चुकीचे खापर, माझ्यावर फोडतात

हा रस्ता खराब की चांगला, वाद यावर घालतात
सकाळी उठून माझ्या कडेला प्रातविधीला बसतात
कुणी जर विचारले तुम्हाला, अहो राव असे का वागता
तुम्ही म्हणता मग त्याला, तुझ्या बापाचा आहे का रस्ता

नसेल रस्ता त्याच्या बापाचा, म्हणून काय झाले
त्याच रस्त्यावरून जातात ना, तुमची बायका-मुले
लांब-रूंद, स्वच्छ-सुंदर रस्ता, सर्वांनाच आवडे
भांडण तेच कशाला करता, आनंदाने जा घराकडे।।

**सुरेश गोविंद देहेरकर**

# मानव आणि रस्ता

एकदा एका निर्मनुष्य रस्त्याला मनापासून वाटले
आजूबाजूला एखादे हॉटेल असते तर बरे झाले असते

माझ्या एकाकी जीवनात आनंदाचे क्षण आले असते
मानवालाही इथे थांबण्यात चांगले वाटले असते.

रस्त्याचे मनोगत जणूकाही एका बिल्डरने जाणले
हॉटेल बरोबरच त्यानी सेकंड होम बांधले

बोल बोलता तिथे बरेच जण आले आणि
सुंदर, निसर्गरम्य जागेचे त्यांनी वाटोळे केले

दाट झाडी तोडून त्यांनी जंगल भूईसपाट केले
पर्यावरणाचा समतोल बिघडवून प्रदुषण वाढवले

त्या सुंदर, स्वच्छ रस्त्याला खूप खूप वाईट वाटले
मानवाच्या लोभीपणापुढे त्याचे काही नाही चालले।।

**सुरेश गोविंद देहेरकर**

*With Best Compliments From :*

RPS

**Infraprojects Pvt. Ltd.**

(Formerly M/s. R. P. Shah)

**Vipul Jain**

Executive Director

------------------------------

**Office Address**

113-C, Shyam Kamal, Agarwal Market, 27 - Tejpal Road, Vile Parle (E), Mumbai - 400 057

**Tel. :** + 91 22-26120223

**Fax :** + 91 22-26120225

**Mo. :** 98210 53259

**E-mail :** vipuljain1966@gmail.com

**Web :** www.rpsinfra.com

*With Best Compliments From :*

**ILIYAS NOORMOHD KHAN**




*With Best Compliments From :*

**Shaman Cars Pvt. Ltd.**



*With Best Compliments From :*

*Spectra Motors Ltd*



WITH BEST COMPLIMENTS FROM

**M/S. P. L. Oswal & Construction.**

---

WITH BEST COMPLIMENTS FROM

**Sourabh Construction**

---

WITH BEST COMPLIMENTS FROM

**Kshatriya**

infrastructure Pvt. Ltd.

# WITH BEST COMPLIMENTS FROM

## सुप्रिम

द पॉवर ऑफ एक्सलेन्स

---

सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स इंडिया प्रा.लि.

## जगातले मंद गतिने चालणारे हे दोघे ...





## परंतु ते सुद्धा सुरक्षा कवच बरोबर घेऊन चालतात.



## मग आपल्याला डोक्यावर हेल्मेट
## घ्यायला काय हरकत आहे?

सुरक्षा अभियानात सामील व्हा